पुणे, बुधवार, ८ जानेवारी २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 43 • वर्ष ४ थे, अंक ४३ • किंमत ₹ ६ • पाने : १२



पुरंदर विमानतळाचे 'टेकऑफ'..! P3

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



बुमराहला पर्याय कोण ? १२

## At a Glance

### नेपाळमध्ये पुन्हा भूकंप

**काठमांडू :** दक्षिण तिबेट आणि नेपाळच्या सीमेलगतच्या भागात मंगळवार दिनांक ७ जानेवारी रोजी सकाळी भूकंप झाला. या भूकंपाचे धक्के उत्तर भारतात सुद्धा जाणवले. या भूकंपाची तीव्रता ७.१ रिश्टर स्केल इतकी असल्याची माहिती माध्यमांना मिळाली आहे. या भूकंपामुळे आतापर्यंत तब्बल ५३ माणसांना आपला जीव गमवावा लागला असून, ६० लोकं गंभीररित्या जखमी झाले आहेत. इमारतींना तडे गेले » पान ७ वर

### आ. अमित गोरखे यांची नियुक्ती!

**पुणे :** भाजपा महाराष्ट्र प्रदेश संविधान अभियान समितीच्या संयोजकपदी आ. अमित गोरखे यांची नियुक्ती झाली आहे. तर धर्मपाल मेश्राम, भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश महामंत्री शशिकांत कांबळे, प्रेरणाताई होनराव तसेच अमित घुगे यांची या समितीच्या सहसंयोजकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महसूल मंत्री आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही नियुक्ती केली.

# आता रणसंग्राम दिल्लीचे

## विधानसभा निवडणुकीची घोषणा : ५ फेब्रुवारीला मतदान; ८ तारखेला निकाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**नवी दिल्ली :** महाराष्ट्रानंतर संपूर्ण देशाचं लक्ष असलेल्या राजधानी दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगाने केली. त्यानुसार, दिल्लीत ५ फेब्रुवारी रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार असून निकाल ८ फेब्रुवारी रोजी जाहीर होणार आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पत्रकार परिषदेत ही घोषणा करण्यात आली. त्यानुसार, दिल्लीतील ७० विधानसभा मतदारसंघात ५ फेब्रुवारी रोजी एकाच दिवशी मतदान होईल. निवडणूक आयोगाने नुकतीच निवडणुकीची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली होती. त्यानंतरच दुसऱ्याच दिवशी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला. राष्ट्रीय राजधानीत १ कोटी ५५ लाख २४ हजार ८५८ नोंदणीकृत मतदार असून, त्यात १.०९ टक्क्यांची वाढ झाली आहे.

'भारताने निवडणुकांचा एक सुवर्ण मानदंड स्थापित केला आहे. हा आमचा सामायिक वारसा आहे. निवडणूक आयोगाच्या प्रक्रियेत कोणत्याही प्रकारच्या गैरव्यवहाराला वाव नाही. आयोगाची कार्यपद्धती इतकी स्पष्ट आहे. व्यक्तिगत काही चूक झाल्यास योग्य ती शिक्षा देण्यास आयोग सक्षम आहे, असे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

आरोप करताना हवेत गोळीबार करण्याची गरज नाही. तुम्ही पुरावा दाखवा, या ठिकाणी असं घडून येतं आहे हे सांगा आम्ही कारवाई करु. मागच्या म्हणजेच महाराष्ट्राच्या निवडणुकीच्या दरम्यान एक हल्ला पाहण्यास मिळाला. तो म्हणजे आमचं हेलिकॉप्टर तपासत आहात, त्यांचं का नाही तपासलं? यांचं का नाही तपासलं? घाणेरड्या भाषेचा उपयोगही केला गेला. आम्ही उत्तर दिलं नाही संयम ठेवला. मतदानाच्या ठिकाणी असलेल्या अधिकाऱ्यांना धमक्या देण्यापर्यंत काहींची मजल गेली. मात्र आम्ही शांत बसलो. स्टार प्रचारक आणि राजकीय नेते यांनी शिष्टाचार आणि सभ्यता पाळली पाहिजे. महिलांच्या विरोधात बोलू नका, मुलांच्या विरोधातही काहींनी भाष्य केलं. अशा लोकांना आमची हात जोडून विनंती आहे की प्रचाराची पातळी एवढी घसरु देऊ नका की त्यामुळे मतदानाला येण्याची नव्या पिढीची इच्छाच निघून जाईल. प्रचाराच्या वेळी शालीनता ठेवली पाहिजे. असं म्हणत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी उद्धव ठाकरेंचं नाव न घेता त्यांना खडे बोल सुनावले आहेत. तसंच ज्या नेत्यांनी महिलांचं नाव घेऊन आक्षेपार्ह वाक्ये वापरली त्यांनाही सुनावले आहे. » पान ७ वर



> आम आदमी पक्षाच्या आरोपांनाही उत्तरं दिली. मतदार यादीतून नावं वगळण्यात आल्याचा आरोप त्यांनी खोडून काढला. मतदार यादीतून नावं वगळताना किंवा त्यात भर घालताना योग्य ती प्रक्रिया काटेकोरपणे पार पाडण्यात आली असून, कोणत्याही प्रकारच्या फेरफाराला वाव नाही. ईव्हीएममध्ये फेरफार केल्याचा आरोप मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी फेटाळला. 'ईव्हीएममध्ये कोणतीही कमतरता असल्याचा कोणताही पुरावा नाही. ईव्हीएममध्ये व्हायरस किंवा बग आणण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. ईव्हीएममध्ये अवैध मतांचा प्रश्नच उद्भवत नाही. कोणताही घोटाळा शक्य नाही. उच्च न्यायालयं आणि सर्वोच्च न्यायालय सातत्यानं वेगवेगळ्या निकालांमध्ये हे सांगत असतात... आणखी काय म्हणता येईल? मतमोजणीसाठी ईव्हीएम हे फुलप्रूफ साधन आहे. छेडछाडीचे आरोप निराधार आहेत. **— राजीव कुमार** (मुख्य निवडणूक आयुक्त)

# एक एप्रिलपासून वाहनांसाठी फास्ट टॅग होणार अनिवार्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. यात राज्य सरकारने मोठा निर्णय घेत १ एप्रिल २०२५ पासून सर्व वाहनांसाठी फास्ट टॅग सक्तीचे केले आहे.

टोलनाका पार करण्यासाठी सर्व वाहनांवर फास्ट टॅग लावणे अनिवार्य झाले आहे. सरकारच्या या निर्णयामुळे आता टोलनाक्यावरील वाहनांची गर्दी कमी होण्यास मदत मिळणार आहे. राज्यातील चारचाकी वाहनधारकांसाठी हा खूप मोठा निर्णय आहे.

**अंमलबजावणी**

टोल नाक्यांवर गाड्यांसाठी लागणारा वेळ आणि ट्रॅफिकची समस्या टाळण्यासाठी हा निर्णय सक्तीचा करण्यात आला आहे. नियमांनुसार, जर तुमच्याकडे FASTag नसेल, तर तुम्हाला टोल दराच्या दुप्पट रक्कम भरावी लागेल. सध्या काही जण फास्ट टॅग स्टीकर गाडीवर न लावता टोल नाका आल्यावर काचेवर धरायचे, मात्र तसे आता चालणार नाही.

या नियमाचे आता १ एप्रिलपासून कठोरपणे पालन केले जाणार आहे.

फास्ट टॅग प्रोग्राम रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटीफिकेशन तंत्रज्ञानावर चालतो.

फास्ट टॅग स्टीकर वाहनावर लावल्यानंतर वाहन धारकाला टोल नाक्यावर थांबून टोल न देता फास्ट टॅगचा कोड स्कॅन करून थेट अकाऊंट मधून पैसे देता येतात. यासाठी फास्ट टॅगसोबत बँक अकाऊंट लिंक केलेले असले पाहिजे.

बँक वॉलेटमधून डिजिटली पैसे कापले जातात. फास्ट टॅगची वैधता ५ वर्षांची असते. बँक अकाऊंटमधून पैसे कापले जात असल्याने पैसे देण्यासाठी थांबावे लागत नाही, परिणामी टोल नाक्यांवर गर्दी कमी टाळता येते.

# पुण्यात उबाठा गटाला सुरुंग

## नगरसेवक आणि विभागप्रमुखांचा भाजपमध्ये प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** उबाठा गटाच्या पुण्यातील पाच नगरसेवकांसह विभागप्रमुखांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने पक्षात मोठे खिंडार पडले आहे. मंगळवार, ७ जानेवारी रोजी महसूल मंत्री आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई भाजप प्रदेश कार्यालयात हा जाहीर पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

यावेळी मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, भाजपच्या प्रदेश संघटनपर्व समितीचे प्रदेश प्रभारी रवींद्र चव्हाण यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. याप्रसंगी नगरसेवक विशाल धनावडे, नगरसेवक बाळासाहेब ओसवाल, नगरसेविका पल्लवी जावळे, नगरसेविका प्राची आल्हाट, नगरसेविका संगिता ठोसर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. तसेच उबाठा शिवसेनेचे विभागप्रमुख संतोष सोनावणे आणि उपविभागप्रमुख » पान ७ वर



# अखेर आसाराम बापूला जामीन!

**मुंबई :** बलात्कार व लैंगिक शोषण केल्याप्रकरणी तुरुंगात असलेल्या आसाराम बापूला सुप्रीम कोर्टाने दिलासा दिला आहे. त्याचा अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला आहे. वैद्यकीय कारणास्तव त्याला हा जामीन देण्यात आला आहे. जामिनाची मुदत ३१ मार्चपर्यंत आहे. अंतरिम जामिनावर सुटल्यानंतर आसारामला त्याच्या अनुयायांना भेटण्यास सुप्रीम कोर्टाने मनाई देखील » पान ७ वर

# मी काहीही राजीनामा वगैरे दिलेला नाही- ना. मुंडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे वादाच्या भोवऱ्यात अडकलेले राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधी व सत्ताधारी आमदारांकडून केली जात आहे. आमदार सुरेश धस यांच्याकडून मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर वारंवार आरोप करण्यात येत आहेत. यासंदर्भात आमदार धसांकडून होणाऱ्या आरोपांवर मंत्री मुंडेंनी प्रतिक्रिया दिली आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी धनंजय मुंडे मुंबईत दाखल झाले आहेत. यावेळी माध्यमांनी आमदार सुरेश धस यांनी केलेल्या आरोपांविषयी प्रश्न विचारल्यावर, "योग्य वेळी योग्य उत्तर देणार" अशी संकेतात्मक प्रतिक्रिया दिली आहे. तसेच धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्याच्या चर्चा सुरु झाल्या होत्या. मात्र धनंजय मुंडेंनी प्रसारमाध्यमांना दिलेल्या प्रतिक्रियेनंतर राजीनामा दिल्याच्या चर्चांना पुर्णविराम मिळाला आहे. यावेळी माध्यमांनी राजीनामाबाबत प्रश्न विचारल्यावर, "मी काहीही राजीनामा वगैरे दिलेला नाही", असे धनंजय मुंडे यांनी स्पष्टपणे सांगितले.

संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात राज्य मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या जवळचे वाल्मिक कराड यांचा सहभाग असल्याची तेथील गावकऱ्यांना शंका असल्याची माहिती अंबादास दानवे यांनी सभागृहात दिली होती. दरम्यान वाल्मिक कराड ३१ डिसेंबरला पोलिसांना शरण आला. त्यावरुनही बरेच आरोप प्रत्यारोप झाले. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली होती.






# सात पिढ्यांची आठवण होईल अशी कारवाई !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अवैध धंद्याविरोधातील मोहिमेस आमचे प्राधान्य आहे. मद्य-गांजा विक्री, बेकायदा हुक्का पार्लर, बार उशिरापर्यंत सुरू असतील अथवा गैरकृत्य दिसल्यास नागरिकांनी पोलिसांशी तातडीने संपर्क करावा. एकदा निराकरण झाले नाही तर पुन्हा पुन्हा संपर्क करावा. बेकायदेशीर धंदे केले, गँग चालवून खंडणी मागितली आणि बळाच्या जोरावर जमीन खाली करावयाला लावत असाल, तर हे शहर सोडून जा. नाही तर तुम्हाला तुमच्या सात पिढ्यांची आठवण होईल अशी कारवाई करण्यात येईल, असा सज्जड दम पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुन्हेगारांना दिला.

पोलीस उपायुक्त परिमंडळ-५, पुणे शहरच्यावतीने सोमवारी किंमती मुद्देमाल वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त प्रवीणकुमार पाटील, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) शैलेश बलकवडे, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, उप आयुक्त (गुन्हे) निखील पिंगळे आदी उपस्थित होते.

पोलीस आयुक्त म्हणाले, "पोलीस ठाण्यात बऱ्याच वर्षांपासून पडलेल्या बेवारस मुद्देमालाबाबतही अधिकाऱ्यांना सूचना केल्या होत्या. जे मुद्देमाल चोरीला जातात, त्या वस्तूंमागे संबंधितांच्या भावना असतात. कधीकधी आम्ही संवेदना विसरतो, काही महिलांचे मंगळसूत्र असतात, काही जणांची वाहने असतात. प्रत्येकाला ते परत मिळेल अशी अपेक्षा असते. » पान ७ वर

# पूर्ववैमनस्यातून एकावर कोयत्याने वार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वादातून दोन तरुणावर कोयत्याने वार करण्यात आल्याची घटना बिबवेवाडी भागात घडली. खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली. गौरव राजेश मरकड (वय २४, रा. अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी सक्षम बगाडे, सागर सरोज यांना अटक करण्यात आली आहे. याबाबत गौरव मरकड याने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गौरव याचा आरोपी सक्षम आणि सागर यांच्याशी वाद झाला होता. वाद मिटवण्याचा बहाणा करुन आरोपींनी गौरव आणि त्याच्या मित्राला सोमवारी दुपारी साडेचारच्या सुमारास अप्पर इंदिरानगर येथील शिवतेज » पान ७ वर

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी

# पुण्यात उभारणार सोलर पार्क

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर या राज्यातील चार जिल्ह्यांमध्ये एसजेव्हीएन ग्रीन एनर्जी तब्बल १,३५२ मेगावॅटचे सोलर पार्क उभारणार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेतंर्गत दोन ते दहा मेगावॅट क्षमतेचे १०२ सौरऊर्जा प्रकल्प उभारले जाणार आहेत.ग्रीडने जोडलेल्या या प्रकल्पांमध्ये तयार होणारी वीज शेतकऱ्यांच्या कृषी पंपाला पुरवली जाणार आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध व्हावी, म्हणून ग्रामीण भागात सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत कमी क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प उभारले जाणार आहेत.

**कुठे होणार प्रकल्प?**

| | |
|---|---|
| पुणे : ९ ठिकाणी | एकूण १५४ मेगावॅट |
| नाशिक : २२ ठिकाणी | ३०४ मेगावॅट |
| छ. संभाजीनगर : १९ ठिकाणी | ३१५ मेगावॅट |
| सोलापूर : ५२ ठिकाणी | ५७९ मेगावॅट |

तेथे तयार होणारी वीज महावितरणच्या वीज उपकेंद्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पुरविली जाणार आहे.

त्यानुसार एसजेव्हीएन ग्रीन एनर्जीकडून राज्यात पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि सोलापूर या चार जिल्ह्यांमध्ये सौरऊर्जा प्रकल्प उभारणे, त्याची देखभाल-दुरुस्ती आणि संचलनासाठी निविदा काढल्या आहेत. या प्रकल्पातून पुढील २५ वर्षे वीजपुरवठा होऊ शकणार आहे. सौर कृषी वाहिनी योजनेतंर्गत उभारल्या जाणाऱ्या सौर प्रकल्पांमुळे सध्या वीज केंद्रांवर येत असलेला भार कमी होणार आहे.

#रा

# लोकसंख्या १ कोटी; 'हवाहवाई' ४ शहरांचे...!

## नागरिकांचा प्रवास 'वळणावळणा'चा; अन्य साधनांचा नाईलाजाने वापर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशातील महत्वाचे शहर समजल्या जात असलेल्या आणि पुरेशा सुविधा उपलब्ध असतानाही राज्यातील अवघी चार शहरे पुण्याला जोडली आहेत; त्यामुळे पुणेकर आणि राज्यातील अन्य नागरिकांचा ' प्रवास' आता ' वळणावळणा' चा झाला असून त्यांना रेल्वे अथवा अन्य साधनांचा आधार घ्यावा लागत आहे. परिणामी हे टेकऑफ आणखी वाढण्याची मागणी आता जोर धरु लागली आहे, त्यातूनच प्रवाशांच्या वेळेची बचत होणार आहे.

पुणे विमानतळावर प्रवाशांसाठी दोन टर्मिनल उपलब्ध आहेत. शिवाय धावपट्टी विस्तारण्याचाही प्रस्ताव आहे. येत्या काळात पुणे विमानतळावरून उड्डाण होणाऱ्या विमानांच्या संख्येत वाढही होणार आहे. असे असले, तरीही पुणे विमानतळ राज्यातील केवळ मोजक्याच शहरांशी विमानाने जोडले आहे. राज्याच्या विविध शहरांतून दररोज अनेक नागरिक विविध कामांसाठी दाखल होतात. कोणी रात्रभर प्रवास करून येतो, तर कोणी पूर्ण दिवस प्रवासातच घालवतो. ज्या शहरांत विमानतळ पूर्ण क्षमतेने कार्यान्वित आहे, त्या शहरांतून पुण्यासाठी विमानसेवा सुरू होणे प्रवाशांच्यादृष्टीने आवश्यक आहे. यामुळे केवळ प्रवाशांच्या वेळेतच बचत होणार नाही, तर त्या शहरांच्या विकासालादेखील हातभार लागणार आहे. त्यामुळे स्थानिक नेत्यांपासून ते राज्याच्या वरिष्ठ नेत्यांपर्यंत सर्वांनीच प्रयत्न करणे गरजेचे आहे.

पुणे हे देशातील महत्त्वाचे शहर आहे. देशातील ३५ शहरे विमानसेवेने जोडली आहेत. तीन आंतरराष्ट्रीय विमानांच्या माध्यमातून परदेशातील तीन शहरे पुण्याशी जोडले आहेत. मात्र, राज्याचा विचार करता केवळ चार शहरे पुण्याला विमानसेवेने जोडली आहेत. अनेकांना पुणे गाठण्यासाठी रस्ते, रेल्वेचा आधार घ्यावा लागतो. ती शहरे विमानसेवेने पुण्याशी जोडल्यास त्या शहरांचाही विकास होण्यास मदत होईल. प्रवाशांच्या वेळेतही बचत होईल.

देशात हवाई वाहतूक क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहेत. त्यानुसार येणाऱ्या काळात विमानतळ आणि विमानांच्या संख्येतही वाढ होणार आहे. येत्या चार ते पाच वर्षांत विमानांची संख्या १६०० होण्याची शक्यता आहे. असे झाल्यास एवढ्या विमानांचे पार्किंग कुठे करायचे? असा प्रश्न निर्माण होईल. पुणे, मुंबईसारख्या मोठ्या शहरात विमान पार्किंगला जागा नाही. तेव्हा अशी विमाने पार्किंगसाठी छोट्या विमानतळावर ठेवावे, असा विचार हवाई वाहतूक मंत्रालयाकडून सुरू आहे.




**येथे विमानतळ कार्यान्वित :**
- मुंबई, पुणे, कोल्हापूर, शिर्डी, रत्नागिरी, जळगाव, नाशिक, सिंधुदुर्ग, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, बारामती, नागपूर.


**पुण्याशी जोडलेली शहरे :**
- नांदेड, सिंधुदुर्ग, जळगाव, नागपूर.

**विमानतळ आहे, सेवा नाही**
- सोलापूर, अकोला (शिवणे), यवतमाळ, लातूर, चंद्रपूर, गोंदिया, धाराशिव, धुळे.

> केवळ पुण्याच्या प्रगतीसाठी नाही, तर राज्यातील अन्य छोट्या शहरांच्या विकासासाठीदेखील विमानसेवेने जोडणे आवश्यक आहे. विमानसेवा सुरू झाल्यानंतर त्या शहराचा आर्थिक विकास होईलच. शिवाय पायाभूत सुविधादेखील उपलब्ध होतील."- "
> **— धैर्यशील वंडेकर,** हवाई वाहतूक तज्ज्ञ

## पुण्यात काय घडतंय...

### हस्तलिखितांच्या प्रदर्शनाचे आयोजन



- **आयोजक :** आनंदाश्रम, बीज पब्लिकेशन्स आणि सुनिधी पब्लिशर्स
- **उदघाटक:** राज्यसभा खासदार डॉ.मेधा कुलकर्णी आणि ज्येष्ठ मूर्तीशास्त्र अभ्यासक डॉ. गो.बं. देगलुरकर
- **प्रदर्शनात काय पाहाल:** भास्कराचार्य, कालिदास, पाणिनी, पतंजलि आणि व्यास आदी महनीय व्यक्तींची वेद, वेदांग, ज्योतिष, गणित, आयुर्वेद, शिल्प, वास्तूशास्त्र, उपनिषदे, काव्य, याज्ञिक धर्मशास्त्र अशा विविध विषयांवरील दुर्मिळ संस्कृत हस्तलिखिते

- **कुठे :** आनंदाश्रम, नूमवि हायस्कूल शेजारी, आप्पा बळवंत चौक
- **कधी :** शुक्रवार दिनांक १० ते रविवार दिनांक १२ जानेवारी २०२५ या कालावधीत सकाळी १०.०० ते संध्याकाळी ८.००
- **शुल्क :** प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य खुला

### गांधी दर्शन शिबीर



- **आयोजक :** युवक क्रांती दल
- **प्रमुख वक्ते:** माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण,मानवाधिकार कार्यकर्तेआनंद तेलतुंबडे(गांधी,आंबेडकर आणि संविधान),आणि प्रा. नितीश नवसागरे(वन नेशन,वन इलेक्शन)
- **अधिक माहितीसाठी संपर्क:** अधिक माहितीसाठी अॅड.स्वप्नील तोंडे (९९२३५२३२५४) तेजस भालेराव (९१७२४८७०१९),सचिन पांडुळे (९०९६३१३०२२)

- **कुठे :** गांधी भवन, कोथरुड
- **कधी :** रविवार दि. १२ जानेवारी, सांयकाळी ५.३०
- **शुल्क :** प्रवेश शुल्क प्रत्येकी २०० रुपये

# अभिजात साहित्याला ए. आय.चा धोका नाही

## साहित्य संमेलनात रंगला परिसंवाद



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आपल्या जगण्यातील प्रत्येक क्षेत्रात ए.आय.चा (कृत्रिम बुद्धिमत्ता) प्रवेश झाला आहे. साहित्याक्षेत्रातही ए.आय.चा मोठ्या प्रमाणात वापर वाढला आहे; पण तो मर्यादित कारणांसाठीच होतो आहे. जोपर्यंत अभिजात साहित्याची निर्मिती होत आहे आणि ए.आय.च्या क्षेत्रात भाव-भावनांचा प्रवेश होत नाही तोपर्यंत ए.आय.चा धोका साहित्य क्षेत्राला नाही. ए.आय.च्या अतिवापराने मानवाने उपजत बुद्धिमत्तेचा वापर कमी केला तर मात्र तो नैतिकता आणि अध्यात्मापासून दूर जाईल. साहित्यक्षेत्रात नैतिकता आणि आध्यात्मिकता याचे मोल खूप आहे, असा सूर परिसंवादात उमटला.

पहिल्या रोटरी मराठी साहित्य संमेलनात ए.आय.चा साहित्यावर परिणाम होईल का? या विषयावर रविवारी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात ज्येष्ठ गझलकार प्रदीप निफाडकर, ए.आय. तज्ज्ञ कुलदीप देशपांडे, महिती तंत्रज्ञान व ए.आय. तज्ज्ञ महेश बोंद्रे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता, संगणक तंत्रज्ञ डॉ. आदित्य अभ्यंकर याचा सहभाग होता. ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ, लेखक दीपक शिकारपूर परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी होते.

दीपक शिकारपूर म्हणाले, साहित्य क्षेत्रात ए.आय.चा वापर जरूर करावा पण या तंत्रज्ञानाचा अतिवापर घातक ठरू शकतो. जो पर्यंत भावभावनांची मदत घेऊन ए.आय. तंत्र विकसित केले जात नाही तो पर्यंत साहित्य क्षेत्राला ए. आय. पासून धोका नाही.

> अभिजात साहित्य परंपरा पुढे नेण्याची जबाबदारी आजच्या साहित्यिकांचीच आहे. आज साहित्य क्षेत्रात ए.आय. म्हणजे कागदी फूल आहे. या क्षेत्रात जोपर्यंत भावभावनांचा शिरकाव होत नाही तोपर्यंत साहित्यक्षेत्राला ए.आय.चा धोका नाही. ए.आय.कडे वाईट नजरेने पहायला नको कारण साहित्यिकांना त्याच्या माध्यमातून आपल्या साहित्यकृती सहजतेने इतर भाषांत रूपांतरित करता येतील. नव साहित्यिकांनी ए.आय.चा वापर डोळसपणे करावा."
> **— प्रदीप निफाडकर,** ज्येष्ठ गझलकार

# बिल्डरच्या खूनाचा प्रयत्न; दोघांना दंडासह सक्तमजुरी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गणेशोत्सवातील वर्गणी गोळा करणाऱ्या दोघांनी बांधकाम व्यावसायिकाच्या डोक्यात कुऱ्हाडीने वार करुन खुनाचा प्रयत्न केल्याची घटना घडली होती. याप्रकरणात अतिरिक्त सत्र न्यायाधीश पी. पी. जाधव यांनी एकाला दोषी ठरवून पाच लाख रुपयांचा दंड, तसेच दहा वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावली.

जीवन सुरेश पवार (वय २०, रा. भिकोबा मोरे चाळ, सदगुरू कृपा हाईट्स, उत्तमनगर) असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत बांधकाम व्यावसायिक चंद्रकांत रामचंद्र मोरे (वय ४४, प्रचिती अपार्टमेंट, कीर्ती नगर, वडगाव बुद्रुक) यांनी उत्तमनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. याप्रकरणी आरोपी पवार, तसेच त्याच्या अल्पवयीन भावाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. शिवणे परिसरात एक सप्टेंबर २०२० रोजी ही घटना घडली होती. मोरे हे एक बांधकाम व्यावसायिक आहेत. त्यांचा शिवणे परिसरात मोरे यांच्याकडून गृहप्रकल्प बांधणीचे काम सुरू होते. या भागातील एका सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते मोरे यांच्याकडे वर्गणी मागण्यासाठी आले होते. वर्गणीवरु मोरे आणि मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली.

आरोपींनी मोरे यांच्या डोक्यात कुऱ्हाडीने वार केले, तसेच त्यांना दगडाने मारहाण केली. आरोपींनी केलेल्या हल्ल्यात मोरे हे गंभीर जखमी झाले होते. या खटल्यात सरकार पक्षाकडून अॅड. नामदेव तरळगट्टी यांनी बाजू मांडली. उत्तमनगर पोलिस ठाण्याचे तत्कालिन वरिष्ठ पोलिस निरीक्षक मोहन खांदरे, पोलिस निरीक्षक अर्जुन बोत्रे , सहायक पोलिस निरीक्षक चवरे, हवालदार विनायक करंजावणे, प्रियांका रासकर यांनी खटल्याच्या कामकाजात सहाय केले. साक्ष, तसेच पुरावे ग्राह्य धरुन न्यायालयाने आरोपी पवारला दोषी ठरवून पाच लाख रुपये दंड आाणि दहा वर्ष सक्तमजुरीची शिक्षा सुनावली.

## जमिनीच्या वादातून खुनाचा प्रयत्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जमिनीच्या मालकी हक्काच्या वादातून तरुणाला गजाने मारहाण करुन खूनाचा प्रयत्न केल्याची घटना मांजरी परिसरात घडली. याप्रकरणी ३३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत महेश रामदास घुले (वय ३६,रा. आई बिल्डींग, मांजरी बुद्रुक) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ३३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घुले आणि त्यांच्या नात्यातील काही जणांचा जमिनीच्या मालकी हक्कावरुन वाद झाला होता.

### हनुमान टेकडीवर महाविद्यालयीन युवतीबाबत प्रकार

# कोयत्याचा धाक दाखवून लुटले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हनुमान टेकडीवर महाविद्यालयीन युवतीला कोयत्याचा धाक दाखवून चोरट्यांनी एक लाख रुपयांची सोनसाखळी चोरुन नेल्याची घटना घडली. हनुमान टेकडी परिसरात घडलेली लूटमारीची ही तिसरी घटना आहे. याबाबत एका महाविद्यालयीन युवतीने डेक्कन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार युवती एका महाविद्यालयात आहे. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी (४ जानेवारी) दुपारी दोनच्या सुमारास युवती आणि तिचा मित्र सेनापती बापट रस्त्यावरील हनुमान टेकडी परिसरात फिरायला गेले होते. त्यावेळी चोरट्यांनी युवती आणि तिच्याबरोबर असलेल्या मित्राला धमकावून शिवीगाळ केली. त्यांना कोयत्याचा धाक दाखविला. युवतीला मारहाण करुन चोरट्यांनी युवतीच्या गळ्यातील एक लाख रुपयांची सोनसाखळी चोरून नेली. घाबरलेली युवती आणि तिचा मित्र तेथून घरी गेले. युवती घाबरली होती. त्यानंतर तिने सोमवारी (६ जानेवारी) डेक्कन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीषा निंबाळकर यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलीस उपनिरीक्षक सावंत तपास करत आहेत. हनुमान टेकडी परिसरात गेल्या दोन महिन्यात टेकडीवर फिरायला आलेल्या महाविद्यालयीन युवकांना लुटल्याच्या तीन घटना घडल्या आहेत. बाणेर-पाषाण रस्त्यावरील टेकडीवर फिरायला आलेल्या महाविद्यालयीन युवकांना लुटण्यात आल्याची घटना घडली होती. चतु:शृंगी पोलिसांनी चोरट्यांना अटक केली होती. टेकड्यांवरील लुटमारीच्या घटना घडल्याने नागरिक दहशतीखाली आहेत. बोपदेव घाटात युवतीवर बलात्कार करण्यात आल्याची घटना घडली होती.

## Selected

### शहरातील विकासकामे लवकर सुरू करून पूर्ण करा - मानकर



**पुणे :** शहरातील अनेक प्रलंबित प्रश्नांबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी पुणे महानगरपालिका आयुक्तांची भेट घेऊन चर्चा केली. विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे पुणे शहरातील विकासकामे किंवा प्रभागातील मूलभूत कामे ठप्प झाली होती. ती लवकरात लवकर सुरू करून पूर्ण करावीत. त्यामध्ये प्रामुख्याने कचरा व्यवस्थापन, विद्युत खांब बसविणे, ड्रेनेज, पाणी पुरवठा, विविध रस्ते, वाहतुकीचे प्रश्न यांसह विविध प्रमुख विभागामध्ये असलेली नागरिकांची दैनंदिन कामे याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी आयुक्त राजेंद्र भोसले यांनी यासंदर्भात सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने कार्यवाही करण्याचे संबधित विभाग प्रमुखांना निर्देश दिले. सदरप्रसंगी शहराध्यक्ष दीपक मानकर, मा.विरोधी पक्षनेते दत्ता सागरे,राहुल कांबळे, पदाधिकारी आदी उपस्थित होते. मानकर म्हणाले, गेल्या अनेक दिवसांपासून पुणे शहरातील अनेक कामे प्रलंबित आहेत. यामध्ये विकास कामे आणि मूलभूत प्रश्न प्रलंबित आहेत. त्यामूळे या विषया बाबत महापालिका आयुक्तांसोबत बैठक घेऊन चर्चा केली. आयुक्तांनी देखील सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने हि कामे मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

### महाध्यान शिबिराचे १२ जानेवारीला आयोजन

**पुणे :** स्वामी विवेकानंद, विश्वशांतिदूत महर्षी विनोद यांची जयंती आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे आत्मयोग-गुरू डॉ. संप्रसाद विनोद यांच्या सुवर्णसाधनेच्या अमृतयोग वर्षानिमित्त येत्या १२ जानेवारीला 'महा-ध्यान शिबिर' हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा मंच येथे सकाळी नऊ ते एक या वेळेत हा कार्यक्रम होणार आहे. या महाध्यान शिबिरात ध्यानाचे स्वरूप, त्याचा दैनंदिन जीवनाशी संबंध, मानसिक ताणाचे नियोजन, अशा विविध विषयांची ओळख करून देण्यात येणार आहे. या वेळी खासदार मेधा कुलकर्णी, पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, माजी मंत्री दिवाकर रावते, ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. येथे सर्वांना मुक्त प्रवेश आहे. https://forms.gle/iZ6qNQ 552dN CuS1z7. या लिंकवर नोंदणी करणे आवश्यक आहे.

### चंद्रभागा ढोरे पाटील यांचे निधन



**पुणे :** हवेली तालुक्यातील केसनंद येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या चंद्रभागा निवृत्ती ढोरे पाटील यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले, त्या ७८ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात सून, नातू, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते विजयराव हरगुडे यांच्या त्या सासू तर स्वप्निल ढोरे पाटील, अक्षय आणि गणेश हरगुडे यांच्या त्या आजी होत. प्रसिद्ध उद्योगपती पंडित गावडे हे त्यांचे नातजावई होत

# एफआरपीच्या थकीत रकमेसाठी ऊस उत्पादक वेटिंगवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 30 नोव्हेंबरअखेर गाळप झालेल्या उसाची रास्त आणि किफायतशीर किमतीबाबतचा (एफआरपी) अहवाल साखर आयुक्तालयाने तयार केला आहे. म्हणजेच हंगाम सुरू झाल्यापासूनच्या पहिल्या पंधरवड्याचा हा अहवाल 15 डिसेंबरअखेरचा आहे. त्यातून ही माहिती मिळाली आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी एफआरपीची थकीत रक्कम केव्हा मिळणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

राज्यातील यंदाच्या 2024-25 च्या ऊस गाळप हंगामात 122 साखर कारखान्यांकडे ऊस तोडणी वाहतूक खर्चासह 1 हजार 685 कोटी रुपये थकीत आहेत. शेतकऱ्यांना 1 हजार 163 कोटी रुपये मिळाले आहेत. तर 30 कारखान्यांनी एफआरपीची शंभर टक्के रक्कम दिली. साखर आयुक्तालयाच्या ताज्या अहवालातून ही बाब स्पष्ट झाली आहे.



राज्यातील यंदाच्या ऊस गाळप हंगामास १५ नोव्हेंबरपासून सुरुवात झाली. विधानसभा निवडणुकीची धामधुम सुरू असल्याने नोव्हेंबर महिन्यात कारखाने सुरू होण्याचे प्रमाण तसे कमी राहिले. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून कारखाने सुरू होण्याचे प्रमाण वाढले. साखर आयुक्तालयाच्या 15 डिसेंबरअखेरच्या पंधरवडा अहवालानुसार राज्यात 152 साखर कारखान्यांचा ऊस गाळप हंगाम सुरू होता. त्यांनी सुमारे 85.13 लाख मेट्रिक टन उसाचे गाळप पूर्ण केले.

ऊस तोडणी वाहतूक खर्चासह देय एफआरपीची रक्कम २ हजार ८४८ कोटी रुपये होती. त्यापैकी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर कारखान्यांनी १हजार १६३ कोटी रुपये जमा केलेले आहेत. म्हणजेच देय एफआरपीच्या सुमारे ४०.८४ टक्के रक्कम शेतकऱ्यांना मिळाली आहे. मात्र, अद्यापही १ हजार ६८५ कोटी रुपये थकीत असल्याचे साखर आयुक्तालयाच्या ताज्या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

ऊस गाळप झाल्यानंतर १४ दिवसांत एफआरपी देण्याचे बंधन आहे. तसेच ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखान्यांमध्ये झालेल्या संयुक्त करारानुसार एफआरपीची रक्कम द्यायला हवी.

# सावित्रीबाई फुलेंच्या विचारांचा जागर आवश्यक

## दिलीप बराटे यांचे प्रतिपादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वारजे :** सावित्रीबाईंचा वसा आणि वारसा सर्व भारतीय स्त्री पुरुषांनी घ्यायला हवा. संत,समाजसुधारक, विचारवंत, साहित्यिक यांनी महाराष्ट्र घडवला आहे. सावित्रीबाई या आद्य शिक्षिका, समाजसुधारक, कवयित्री म्हणून त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. सावित्रीबाईंच्या विचारांचा जागर सामाजिक समतेसाठी आवश्यक आहे असे प्रतिपादन संस्कार मंदिर संस्थेचे अध्यक्ष माजी उपमहापौर दिलीप बराटे यांनी केले.



संस्कार मंदिर संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय, वारजे माळवाडी, राष्ट्रीय सेवा योजना आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९३ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात बराटे बोलत होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.धनंजय त्रिमुखे, उपप्राचार्य प्रा.आशुतोष कसबेकर, प्राध्यापक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

### माजी विद्यार्थ्यांचा राष्ट्र उभारणीसाठी सक्रिय योगदान देण्याचा निर्धार

# एमआयटी-एडीटी विद्यापीठात माजी विद्यार्थी मेळावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** येथील एमआयटी आर्ट, डिजाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे येथे नवीन वर्षाची सुरुवात एकात्मता आणि प्रेरणादायी ऊर्जेसह माजी विद्यार्थी मेळाव्याने करण्यात आली. या मेळाव्याच्या निमित्ताने 100 हून अधिक माजी विद्यार्थी आपल्या मातृसंस्थेत परतले. एलुमनाई असोसिएशन (एमएए) यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश "विकसित भारत २०४७" या संकल्पनेवर आधारित होता. या प्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी राष्ट्र उभारणीसाठी सक्रिय योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला.

या मेळाव्याचे उद्घाटन एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या कार्यकारी संचालक प्रा.डॉ. सुनीता कराड, प्र.कुलगुरू, डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. मोहित दुबे, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, एमआयटी स्कूल ऑफ इंजिनिअरिंगचे संचालक डॉ. वीरेंद्र व्ही. शेटे, डॉ.सुराज भोयर, प्रा. हर्षित देसाई, डॉ. संकेत बापट, डॉ. संदीप गायकवाड आणि डॉ. रीना पगारे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.



**माजी विद्यार्थी आमच्या मुल्यांचे प्रतीक**
- कार्यक्रमात माजी विद्यार्थी व सध्याचे विद्यार्थी यांच्यात संवाद झाला, ज्यामुळे भविष्यात प्रभावी प्रकल्पांसाठी सहकार्याचा मार्ग तयार झाला. या मेळाव्याच्या अखेरीस सर्व माजी विद्यार्थ्यांनी राष्ट्र उभारणीसाठी समर्पणाची शपथ घेतली आणि आत्मनिर्भर भारताच्या निर्माणासाठी आपली सामूहिक बांधिलकी पुन्हा जाहीर केली.

> आमचे माजी विद्यार्थी एमआयटी-एडीटी विद्यापीठाच्या मुख्य मूल्यांचे प्रतीक आहेत आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणा आहेत. त्यांच्या यशामुळे हे सिद्ध होते की, आमचे विद्यापीठ समाजात बदल घडवून आणनारे व राष्ट्राच्या प्रगतीस हातभार लावणारे नेतृत्व घडवत आहे"
> **— प्रा. डॉ. सुनिता कराड,** कार्यकारी संचालक, एमआयटी एडीटी विद्यापीठ

उभारणीसाठी सक्रिय योगदान

#रा

At a Glance

## विमानतळावर 'एचएमपीव्ही' तपासणी यंत्रणाच नाही



**पुणे :** पुण्यातील लोहगाव विमानतळावर ज्या ठिकाणी देशातून आणि विदेशातून अनेक नागरिक ये जा करत असतात, त्या ठिकाणी एचएमपीव्ही व्हायरस ची कोणत्याही प्रकारची तपासणी करण्यात येत नसल्याचं समोर आलं आहे.या व्हायरसविरूद्ध पुणे महानगरपालिका सतर्क असून पुणे महानगरपालिकेने 50 बेडचे विलगीकरण कक्ष तयार केला आहे. मात्र पुणे विमानतळ प्रशासनाला अजून कुठलेही अलर्ट आलं नसल्याने या ठिकाणी तपासणी होत नाही. पुणे महानगरपालिकेचे आरोग्य विभागाची बैठक झाली. मात्र लोहगाव विमानतळावर प्रवाशाची तपासणी सुरू केलेली नाही. याबाबतचा निर्णय पुढच्या बैठकीत घेतला जाईल अस महापालिका अधिकारी यांनी सांगितलं आहे.

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या प्रमुख डॉ. नीना बोराडे यांनी सांगितलं की, विमानतळावर अद्याप महापालिकेनं स्क्रीनिंग किंवा तपासणी सुरु केलेली नाही. राज्य सरकारच्या सुचनेनुसार विमानतळावर स्क्रीनिंग सुरु करण्यात येणार आहे. कोरोनाची लागण लहान मुलांना सहज होत नव्हती मात्र या विषाणूची लागण लहान मुलांनाही होताना दिसते. हा विषाणू २००१ मध्येच नेदरलँडमध्ये आढळून आला होता.

# पुरंदर विमानतळाचे 'टेकऑफ'...!

## भूसंपादन प्रक्रिया लवकरच सुरु; मार्च २०२९ पर्यंत साकारणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेली काही वर्षे प्रतिक्षेत असणाऱ्या पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाला गती येणार असून केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकाराने पुढील प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. येत्या सप्टेंबरपर्यंत डीपीआर अंतिम करण्यात येणार असून भूसंपादनाची प्रक्रिया एमआयडीसीला सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. त्यामुळे विमानतळाच्या कामाचे लवकरात 'टेक ऑफ' होणार आहे. तसेच मार्च २०२९ पर्यंत हे आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील सर्व विमानतळाच्या विमानसेवा आणि विकासकामांसदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय नागरीक हवाई वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यात मुंबईतील सह्याद्री अतिथिगृहात झालेल्या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले. विमानतळाच्या विकासकामांना आणखी वेग देण्यासंदर्भात आणि विमानसेवा आणखी सक्षम करण्याबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. या बैठकीस भारतीय विमानतळ प्राधिकरण, सैन्य दल, महाराष्ट्र विमानतळ महामंडळाचे, सरकारचे वरिष्ठ अधिकारी आणि विविध प्राधिकरणांचे अधिकारी उपस्थित होते.

याबाबत माहिती देताना केंद्रीय मंत्री मोहोळ म्हणाले, 'विमान वाहतूक हे सर्वात वेगाने वाढणारे क्षेत्र असून या क्षेत्रातील वाढ विचारात घेऊन पायाभूत सुविधांचा विस्तार करावा लागणार आहे. पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी जमिनी अधिग्रहण प्रक्रिया लवकर सुरू करण्यात येणार असून विमानतळाचा डिपीआर सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. शिवाय मार्च २०२९ पर्यंत विमानतळ कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.'

'पुणे आणि परिसराचा विकास झपाट्याने होत असून विमान प्रवाशांची आणि हवाई वाहतुकीचे प्रमाण वाढत आहे. या पार्श्वभूमीवर पुण्याचे सध्याचे विमानतळ सुसज्ज आणि अत्याधुनिक सोईसुविधांसह सज्ज केलेले आहे. तरीही पुणे शहर आणि परिसराच्या भवितव्याचा विचार करता पुरंदर विमानतळ पूर्णत्वास नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे', असेही केंद्रीय मंत्री मोहोळ म्हणाले.



पुणे विमानतळाच्या विमानसेवा आणि विकासकामांसदर्भात मुख्यमंत्री फडणवीस व केंद्रीय नागरीक हवाई वाहतूकमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यात झालेल्या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले.

### बैठकीत चर्चा झालेले मुद्दे...

- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम नियोजित वेळेत अर्थात मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करणे.
- मार्च २०२५ ला देशांतर्गत आणि एप्रिलला २०२५ आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरु करण्याते नियोजन
- नागपूर आणि शिर्डी विमानतळाचे रि-कार्पेटिंगचे काम गतीने करून दिलेल्या मुदतीत म्हणजेच ३१ मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करावे.
- अमरावती विमानतळ येथे नाईट लॅंडिंगची सुविधा वेगाने पूर्ण करुन दक्षिण आशियातील सर्वात मोठा FTO जुलै २०२५ पर्यंत पूर्ण करणे.
- सोलापूर विमानसेवा लवकर सुरु करणे आणि कोल्हापूर विमानतळ येथे धावपट्टी विस्तारिकरण करण्यासाठी लवकरात लवकर भू-संपादन करणे.
- दोन्ही विमानतळांवर नाईट लॅंडिंग सुरु करण्याची प्रक्रिया सुरु करावी.
- जळगाव येथे नवीन टर्मिनल इमारत तयार करण्याचा निर्णय
- गडचिरोलीचे येथे विमानतळ साकारण्यासाठी भूसंपादन सुरु करणे
- रत्नागिरी, गोंदिया, अकोला आणि संभाजीनगर विमानतळांच्या सुविधा आणि विमानसेवा संदर्भात सकारात्मक चर्चा
- पवना, गंगापूर, खिंडसी आदी धरणात Water Aerodrome साठीचे सर्वेक्षण तातडीने करावे.
- आंतरराष्ट्रीय बंदर असलेल्या वाढवण येथील प्रस्तावित विमानतळाबाबत लवकरत निर्णय घेण्यात येईल.
- पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर धावपट्टी वाढवण्यासाठीचा OLS पूर्ण झाले असून भूसंपादन येत्या ६ महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय विमानांची संख्या वाढवण्यात मदत होऊन पुणेकरांना मोठा दिलासा मिळणार आहे.



'विमान वाहतूक हे सर्वात वेगाने वाढणारे क्षेत्र असून या क्षेत्रातील वाढ विचारात घेऊन पायाभूत सुविधांचा विस्तार करावा लागणार आहे. पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी जमिनी अधिग्रहण प्रक्रिया लवकर सुरू करण्यात येणार असून विमानतळाचा डिपीआर सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. शिवाय मार्च २०२९ पर्यंत विमानतळ कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे."
**— मुरलीधर मोहोळ,** केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री

### असा आला विकासाला 'वेग'

- केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकाराने प्रक्रियेला वेग
- मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री मोहोळ यांच्यात आढावा बैठक
- भूसंपादन प्रक्रियेसाठी मुख्यमंत्र्यांकडून एमआयडीसीला भूसंपादनाचे निर्देश

# चार हजार नागरिकांना मिळणार हक्काचा 'निवारा'

## महापालिका देणार स्वस्तात घरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील प्रत्येकाला हक्काचे घर मिळावे, यासाठी पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून धानोरी, हडपसर, बाणेर, कोंढवा, बालेवाडी तसेच वडगाव खुर्द या पाच भागांत ४ हजार १७३ घरे बांधण्याचे नियोजन पुणे महापालिकेने केले आहे. यासाठी इच्छुक नागरिकांची नोंदणी महापालिकेने सुरू केली आहे.

शहरातील आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना कमी खर्चात हक्काचे घर मिळावे, यासाठी केंद्र सरकारने पंतप्रधान आवास योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून पहिल्या टप्प्यात पुणे महापालिकेने वडगाव बुद्रुक, खराडी तसेच हडपसर भागात यापूर्वी २ हजार ९१८ घरे बांधून त्याचे वितरण केले आहे. यासाठीचे अर्ज नागरिकांकडून मागवून त्याची शहानिशा, छाननी करून महापालिकेने घरांचे वाटप करत नागरिकांचे हक्काचे घराचे स्वप्न पूर्ण केले आहे. या ठिकाणी लॉटरी काढून नागरिकांना घराचे वाटप करण्यात आले. २०२२ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या घरांचे लोकार्पण करण्यात आले होते.

पहिल्या टप्प्यानंतर सप्टेंबर २०२४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'पंतप्रधान आवास योजना ०.२' ची घोषणा केली. त्यानंतर राज्य सरकारने आदेश काढत या योजनेसाठी नागरिकांची घरांसाठी नोंदणी करण्याच्या सूचना महापालिकेला केली. मात्र विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू झाल्याने ही प्रक्रिया रखडली होती. मात्र, आता महापालिकेने नागरिकांकडून अर्ज मागविण्यास सुरुवात केली आहे. ऑनलाईन पद्धतीने ही नोंदणी करता येणार आहे. दुसऱ्या टप्प्यात धानोरी, हडपसर, कोंढवा, बालेवाडी, वडगाव खुर्द, बालेवाडी येथे ही घरे उभारण्यात येणार आहेत. या ठिकाणी ४ हजार १७६ घरे बांधण्यासाठी पालिकेला ३०० कोटी रुपये खर्च येणार आहे.



पंतप्रधान आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात खराडी, हडपसर, बाणेर परिसरात घरे बांधली जाणार आहेत. महापालिकेच्या जागेवर घर बांधल्याने जमिनीचा खर्च नाही. त्यामुळे कमी दरात घरे देणे शक्य होते. पहिल्या योजनेनंतर दुसऱ्या योजनेलाही मोठा प्रतिसाद मिळेल. आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांचे घरांचे स्वप्न पूर्ण होणार आहे."
**— प्रशांत वाघमारे,** शहर अभियंता, पुणे मनपा



# शिवरायांच्या 'पुण्यभूमी'तील पुस्तक महोत्सव सातासमुद्रापार - चंद्रकांत पाटील यांचे मत



पुणे — शहरात नुकत्याच संपन्न झालेल्या पुणे पुस्तक महोत्सवाला वाचकांनी आणि पुणेकरांनी ना भूतो ना भविष्यती असा प्रतिसाद दिला, विशेष म्हणजे हा सोहळा जगभर गाजला. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अनोख्या सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गणेशोत्सव, नवरात्रोत्सव अशा विविध उत्सवाच्या माध्यमातून जगभरात ओळख निर्माण केलेल्या पुण्याला आता आणखी एक नवी ओळख मिळाली आहे, नुकताच संपन्न झालेला पुणे पुस्तक महोत्सव' सातासमुद्रपार जाऊन पोचला आहे. विशेष म्हणजे या महोत्सवाला दहा लाखांपेक्षाही अधिक वाचकांनी भेट दिली असून त्यामध्ये तब्बल ४० कोटी रुपयांच्या पुस्तकाची विक्री झाली आहे, त्यामुळे शिवरायांच्या ' पुण्यभूमीत' आणखी एक इतिहास सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला आहे.

राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर पुणे पुस्तक महोत्सव झाला. या महोत्सवाच्या आयोजनासाठी योगदान दिलेल्या विविध व्यक्तींच्या गौरवाचा कार्यक्रम सोमवारी भांडारकर प्राच्यविद्या संस्थेच्या प्रांगणात झाला. त्यावेळी पाटील बोलत होते. एनबीटीचे अध्यक्ष मिलिंद मराठे, मुख्य संयोजक राजेश पांडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, आनंद काटीकर, लेखक दिग्दर्शक प्रवीण तरडे या वेळी उपस्थित होते. पुढील महोत्सव १३ ते २१ डिसेंबर या कालावधीत होणार असल्याचे कार्यक्रमात जाहीर करण्यात आले.

पुणे शहराला उत्सव, महोत्सवांची परंपरा आहे. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि आता पुणे पुस्तक महोत्सव ही महाराष्ट्राची नवी ओळख होत आहे. स्वयंसेवकांच्या जोरावर हा महोत्सव पार पडला. प्रकाशकांच्या चेहऱ्यावरचे हसू मोलाचे होते. ग्रंथांवर उपजीविका करणारी माणसे महत्त्वाची आहेत, असे लेखक दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनी सांगितले.

महोत्सवाला मिळालेल्या प्रतिसादासह समाजमाध्यमांतूनही प्रचंड प्रतिसाद होता. १ कोटीपेक्षा जास्त लोकांनी महोत्सवाच्या चित्रफिती पाहिल्या. ७७ लाख लोकांनी महोत्सवाविषयी 'सर्चिंग' केले. या महोत्सवाच्या आयोजनात ३० खाते प्रमुख होते. तसेच स्वयंसेवकांचेही योगदान महत्त्वाचे होते, असे राजेश पांडे यांनी नमूद केले.



महोत्सवाच्या नऊ दिवसांत पाचशे स्वयंसेवक झटले. कोणत्याही दुर्घटनेविना हा महोत्सव पार पडला. तरूण स्वयंसेवकांना या महोत्सवाने अनेक प्रकारचे अनुभव दिले. त्यातून खूप शिकायला मिळाले. त्याचा पुढील आयुष्यात खूप उपयोग होईल."
**— चंद्रकांत पाटील,** उच्च व तंत्र शिक्षणमंत्री

### विद्यापीठाचे वाचन सर्वेक्षण...

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महोत्सवाच्या काळात वाचनसवयींचे सर्वेक्षण केले.या सर्वेक्षणाची प्राथमिक निरीक्षणे डॉ. गोसावी यांनी मांडली. सर्वेक्षणात २४ ते ५० या वयोगटातील ५५ टक्के पुरुष, ४५ टक्के महिलांचा समावेश होता. महिलांना चरित्र आणि अध्यात्माची पुस्तके वाचायला आवडतात. पदवीधर आणि पदव्युत्तर पदवीधरांना माहितीपर, चरित्र, इतिहासविषयक पुस्तकांमध्ये रस आहे. प्राथमिक शिक्षण झालेल्यांचा अध्यात्म, धार्मिक पुस्तकांकडे कल आहे, तर नोकरदारांना चरित्र, इतिहास, स्वमदत (सेल्फ हेल्प) प्रकारची पुस्तके आवडतात. विद्यार्थ्यांचा कल इतिहास आणि तांत्रिक विषयांच्या पुस्तकांचे असल्याचे दिसते. या सर्वेक्षणाचे सविस्तर निष्कर्ष प्रसिद्ध करण्यात येणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

# महसूलात आघाडीवर; कामात 'पिछाडीवर'

## ऑनलाईन कारभारात पुणे सातव्या क्रमांकावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महसूल विभागाचा ' कारभार' अधिक गतीमान करण्याचा संकल्प राज्य शासनाने सोडला आहे. मात्र; बहुतांशी जिल्ह्यांनी चक्क राज्य शासनाच्या या नियमालाच हरताळ फासल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे महसूल मिळविण्यात ' आघाडी' वर असलेला पुणे जिल्हा ' ऑनलाईन' कारभारात तब्बल सातव्या क्रमांकावर फेकला गेला आहे, धक्कादायक बाब म्हणजे त्यांना सर्व साधन सामुग्री देऊनही केवळ कामात उदासीनता असल्यानेच त्याचा जबरदस्त फटका बसला आहे.

तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी जिल्हा प्रशासनाला अद्ययावत दर्जाचे संगणक, स्कॅनर पुरविले होते. त्यानंतर जिल्हा प्रशासनात ई-ऑफिसच्या कामाला हळूहळू सुरुवात झाली. जिल्हाधिकारी कार्यालयात अडीच हजारांहून अधिक फाइलचे काम 'ऑनलाइन' सुरू झाले आहे. मात्र, जिल्ह्यातील तहसीलदार आणि प्रांतांच्या उदासीनतेमुळे त्यांच्या कार्यालयात अद्याप 'ई-फाइल' सुरू झालेले नाही. ई-ऑफिसमुळे फाइल काही मिनिटांत शोधणे शक्य होणार आहे. मात्र, तहसीलदार, प्रांत कार्यालयांमध्ये ई-ऑफिससाठीचे सर्व साहित्य देऊनही त्याद्वारे अद्याप काम होत नसल्याने याबाबत उदासीनता असल्याचे दिसून येत आहे.

राष्ट्रीय सूचना केंद्राकडून (एनआयसी) ई-ऑफिसची चांगली संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. दरम्यान, पुण्यात लोकसभा आणि त्यापाठोपाठ विधानसभा निवडणुका सुरू झाल्या. त्यामुळे 'ई ऑफिस'कडे जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष झाले. जिल्हा प्रशासनाने 'ई-ऑफिस'द्वारे काम वेगाने सुरू करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र, जिल्ह्यातील नऊ उपविभागीय अधिकारी (प्रांत) आणि १४ तालुक्यांच्या तहसीलदारांच्या कार्यालयात अद्याप ई-ऑफिस सुरूच झाले नाही.

तहसीलदार, प्रांतांनी याकडे फारसे लक्ष दिले नसल्याने कार्यालयांमध्ये ऑनलाइन कामकाज सुरू झाले नाही. जिल्ह्यातील प्रांत, तहसीलदारांना अद्याप लॉगिन आणि पासवर्ड प्राप्त झाले नाही. जिल्हाधिकारी कार्यालयात महिन्याकाठी सुमारे साडेपाच हजारांहून अधिक टपाल येतात. त्यानुसार प्रत्येक तालुक्याच्या तहसीलदार तसेच प्रातांचे टपाल असे मिळून १०ते १२ हजार टपाल येणे अपेक्षित आहे. राज्यात सातारा जिल्ह्यात 'ई-ऑफिस'मध्ये आघाडी घेतली आहे. जिल्ह्यात 13 हजार 512 फाइल ऑनलाइन झाल्या आहेत.

## खूनप्रकरणी माजी उपसरपंचाचा जामीन फेटाळला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पेट्रोल चोरी केल्याच्या संशयावरून एका तरुणाला बेदम मारहाण केल्याने त्याचा मृत्यू झाल्याप्रकरणात नऱ्हेगावच्या माजी उपसरपंचाचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला. सत्र न्यायाधीश पी. पी. जाधव यांनी हा आदेश दिला.

सुशांत सुरेश कुटे (रा. चैतन्य बंगला, मानाजीनगर, नऱ्हे) असे जामीन फेटाळण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. कुटे हा नऱ्हेगावचा माजी उपसरपंच आहे. समर्थ नेताजी भगत (वय २० वर्षे, रा. व्यंकटेश्वरा सोसायटी,अभिनव कॉलेज रोड, नऱ्हे) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.याबाबत नेताजी सोपान भगत यांनी सिंहगड रस्ता पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून या प्रकरणी चौघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अनधिकृत व्यवसायिकांची अतिक्रमण विभागाला धक्काबुक्की

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नामदार गोपाळ कृष्ण गोखले पथ (फर्ग्युसन रस्ता) परिसरातील पदपथावर बेकायदा पथारीवाल्यांविरुद्ध कारवाई करणाऱ्या अतिक्रमण विभागातील पथकाला धक्काबुक्की केल्याप्रकरणी डेक्कन पोलिसांनी महिलेसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. सोमवारी सायंकाळी फर्ग्युसन रस्त्यावरील सागर आर्केड परिसरात महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाई केली होती.

याबाबत महापालिकेच्या अतिक्रमण विभागातील कर्मचारी सचिन घेंगे (वय २९, रा. मांजरी) यांनी डेक्कन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, फर्ग्युसन रस्त्यावरील पदपथावर बेकायदा पथारी थाटण्यात आल्या आहेत. या भागात फेरीवाल्यांकडून बेकायदा व्यवसाय केला जातो. पादचाऱ्यांना पदपथावरुन चालता देखील येत नसल्याने महापालिकेकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या. यापार्श्वभूमीवर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून बेकायदा पथारी व्यावसायिक, फेरीवाल्यांविरुद्ध कारवाई सुरू करण्याथ आली आहे.

सोमवारी सायंकाळी फर्ग्युसन रस्त्यावरील सागर आर्केड परिसरात बेकायदा फेरीवाल्यांविरुद्ध कारवाई करण्यात येत होती. त्यावेळी महिलेसह चौघांनी अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की करुन शिवीगाळ केली. सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.



# शुश्रुषा करणाऱ्या महिलेकडूनच चोरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

फसवणूक

**पुणे :** शुश्रुषा करणाऱ्या महिलेला दागिने चोरल्याप्रकरणी बिबवेवाडी पोलिसांनी अटक केली. महिलेकडून आठ लाख ७० हजार रुपयांची सोन्याची लगड जप्त करण्यात आली. गायत्री सुनील हातेकर (वय २४, रा. चव्हाणनगर, धनकवडी) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. नोव्हेंबर महिन्यात ही घटना घडली होती. याबाबत एका महिलेने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. तक्रारदार महिलेची आई बिबवेवाडी भागात राहायला आहेत. त्यांच्या बंगल्यातून २५ तोळे दागिने चोरीला गेल्याचा प्रकार उघडकीस आला होता.

तक्रारदार महिलेच्या घरी आईची शुश्रुषा करण्यासाठी आरोपी हातेकर यायची. कोणाचे लक्ष नसल्याची संधी साधून तिने कपाटातून दागिने चोरले होते. पोलीस उपनिरीक्षक शशांक जाधव यांना याबाबतची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीत तिने दागिने चोरल्याची कबुली दिली. चोरलेल्या दागिन्यांपैकी साडेआठ लाख रुपयांची सोन्याची लगड जप्त करण्यात आली आहे. पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहायक आयुक्त धन्यकुमार गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी केली.

# दुर्लक्ष भोवणार; 'रेशनपाणी' होणार बंद...!

## पुण्यातील २७ हजाराहून अधिक शिधापत्रिकाधारक रडारवर


रेशनकार्ड

**करोनाच्या काळात वाढलेला रेशनधारकांचा 'टक्का' आता चांगलाच घसरला आहे, ज्या नागरिकांनी त्याकाळात गरज म्हणून शिधा घेण्यासाठी अक्षरश: रांगा लावल्या त्याच नागरिकांनी आता त्याकडे सपशेल पाठ फिरविली असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. त्यामुळे या प्रकाराची आता राज्य शासनाच्या अन्न व पुरवठा विभागाने गंभीर दखल घेतली असून अशा शिधापत्रिकाधारकांची 'कुंडली' च तयार केली आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या सहा महिन्यांत धान्यांची उचल न केलेल्या शिधापत्रिकाधारकांना मोठा फटका बसणार आहे. अशांची संख्या निश्चित करून त्यांना मिळणारे धान्य बंद होणार आहे. सरकारच्या या निर्णयाचा फटका एकट्या पुणे शहरातील जवळपास २७ हजारांहून अधिक शिधापत्रिकाधाकांना बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अन्न व नागरी पुरवठा विभागाचा आढावा नुकताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. त्यानंतर अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत विभागाची बैठक झाली. या बैठकीमध्ये पुढील शंभर दिवसांचे नियोजन करण्यात आले. त्यामध्ये अनेक महत्त्वपूर्ण घेण्यात आले आहेत. त्यानुसार याबाबतच्या सूचना अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.



### अशी आहे स्थिती

- पुणे शहरात जवळपास ३ लाख ६४ हजार लाभार्थी
- त्यापैकी काही लाभार्थी अन्नसुरक्षा योजनेतील, तर काही अंत्योदय योजनेतील
- त्यापैकी सुमारे २७ हजार लाभार्थ्यांनी गेल्या तीन ते सहा महिन्यांपासून धान्याची उचल केली नसल्याचे समोर
- त्यांना पुन्हा एकदा शेवटची संधी देण्यात येणार आहे
- त्यानंतर अशा शिधापत्रिकाधारकांचे धान्य बंद करण्यात येणार आहे

मागील सहा महिन्यांत ज्यांनी धान्याची उचल केली नाही त्यांना पुन्हा एकदा संधी आहे. तसेच या मोहिमेतून जे धान्य वाचणार आहे ते गरजवंतांना वाटप करण्यात येणार आहे. तसेच ज्या शिधापत्रिकाधारकांनी मोबाईल क्रमांक आणि आधार क्रमांक लिंक केला नसेल त्यांनी तातडीने तो करून घ्यावा."—दिनेश तावरे,, सहायक विभागीय पुरवठा अधिकारी

### दृष्टिक्षेपात

- पुणे प्राधान्यक्रम शिधापत्रिकाधारकांची संख्या सुमारे ३ लाख ६४ हजार
- अंत्योदय शिधापत्रिकाधारकांची संख्या ४९ हजार ३०२
- अन्नसुरक्षा योजनेतील शिधापत्रिकाधारकांना अत्यल्प दरात पाच किलो धान्याचे वाटप केले जाते
- अंत्योदय योजनेतील लाभार्थ्यांना ३५ किलो धान्याचे वाटप केले जाते
- *पुणे शहरात गेल्या सहा महिन्यांपासून धान्याची उचल न केलेल्या शिधापत्रिकाधारकांची संख्या सुमारे २७ हजार

## At a Glance

### साई उत्सवानिमित्त रक्तदान शिबीर आणि शालेय साहित्य वाटप



**पुणे :** श्री सद्गुरू साईबाबा सेवा संस्थेच्या वतीने साई उत्सवाच्या १६ व्या वर्धापन दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात एकूण १०८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी संस्थेच्या वतीने १० शालेय विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि रक्तदाते सदाशिव कुंदेन यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तुषार कैलास झेंडे, कुमार लांडे, ओंकार लांडगे, केतन कुदळे, सनी झेंडे, साई धंगेकर, संजय पवळे, वैभव नवसे, उमेश झेंडे, कैलास जाधव, विजय मोरे, योगेश झेंडे, संदीप गवळी, विजय साळवे, दिनेश गालफाडे, अमोल शिंदे, राहुल ढमाले, संकोष वाघमारे, तसेच शिवसाम्राज्य प्रतिष्ठानचे कार्यकर्ते उपस्थित होते. सदाशिव कुंदेन म्हणाले, धार्मिक उत्सव साजरा करताना त्याला सामाजिकतेची जोड देणेही आवश्यक आहे. युवा कार्यकर्ते साई उत्सव साजरा करताना त्यांनी रक्तदान केले. त्याचबरोबर गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत देखील केली, हे कौतुकास्पद आहे.

# अखेर विकासाला 'मुहूर्त' गवसला...!

## समाविष्ट गावांचा होणार विकास आराखडा, नगररचना विभागाची तत्परता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** तब्बल आठ वर्षांच्या कालखंडानंतर समाविष्ट गावांना न्याय मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे; समाविष्ट गावांचा विकास आराखडा तयार करण्यास राज्य शासनाच्या वतीने मान्यता देण्यात आली असून नगरविकास विभागाच्या वतीने प्रत्यक्षात त्याचे काम सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे या गावांचा ' विकास' होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

महापालिकेच्या हद्दीत ३४ गावे टप्प्याटप्प्याने समाविष्ट करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. त्यानुसार पहिल्या टप्प्यात म्हणजे ४ ऑक्टोबर २०१७मध्ये ११ गावे समाविष्ट करण्यात आली. त्यामध्ये लोहगाव आणि मुंढव्यातील उर्वरित भाग, साडेसतरानळी, उत्तमनगर, शिवणे, आंबेगाव खुर्द, उंड्री, धायरी, आंबेगाव बुद्रुक, फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही गावे समाविष्ट करण्यात आली. त्यानंतर जवळपास एक वर्षांनी म्हणजे ४ डिसेंबर २०१८मध्ये या गावांचा विकास आराखडा तयार करण्याचा इरादा महापालिकेकडून प्रसिद्ध करण्यात आला. परंतु २०१९ मधील लोकसभा, विधानसभा तसेच वाढीव हद्दीतील पोटनिवडणुका लागल्या. त्या झाल्यानंतर २०२० फेब्रुवारीपासून राज्यात कोरोनाच्या संसर्ग सुरू झाला.

परिणामी प्रारूप आराखडा तयार करण्याचे काम रखडले. दरम्यानच्या कालवधीत ३० जून २०२० पर्यंत या गावांतील जमीन वापराचे नकाशे व अहवाल महापालिकेकडून तयार करण्यात आले. त्यानंतर आरक्षणाचे निकष निश्चित करणे, पाहणी करून आरक्षणाच्या जागा निश्चित करण्याचे काम राहिले होते. ते देखील पूर्ण झाले आहे. महापालिकेची मागणी ग्राह्य धरून २४ मार्च २०२० पासून ३१ मार्च २०२२ पर्यंतचा लॉकडाऊनचा कालावधी राज्य सरकारने वगळून मुदत वाढ देण्यास मान्यता दिली. त्यामुळे एकूण ७३८ दिवस मुदत वाढ मिळाली. परंतु त्या मुदतीत ही आराखड्याचे काम महापालिकेकडून झाले नाही. डिसेंबर २०२३पर्यंतची मुदत १ मार्च २०२४ पर्यंत महापालिका प्रशासनाने मुदतवाढ मागितली. त्याही मुदतीत आराखडा तयार झाला नाही. पुन्हा मुदतीत वाढी करण्याचा प्रस्ताव महापालिकेने पाठविला. परंतु राज्य सरकारने त्यास अद्याप मान्यता दिली नाही.

गावे समाविष्ट होऊन आणि वारंवार मुदतवाढ देऊनही गेल्या आठ वर्षांत महापालिका प्रशासनाला ११ गावांचा विकास आराखडा तयार करता आला नाही. अखेर या गावांचा विकास आराखडा तयार करण्याचे काम राज्य सरकारच्या नगररचना विभागाने हाती घेतले आहे. त्यासाठीची प्रक्रिया सुरू केली असून, येत्या सहा ते आठ महिन्यांत हा आराखडा प्रसिद्ध करण्यात येणार आहे.



### प्रशासकीय पातळीवर

- महापालिकेस मुदतवाढ न देता तो मुदतीत तयार केला नाही म्हणून तयार केलेला प्रारूप विकास आराखडा राज्य सरकारकडून ऑगस्ट २०२४ मध्ये रद्द
- या गावांसाठी नव्याने आराखडा तयार करण्याचे अधिकारनगर रचना विभागाला दिले
- त्यानंतर लोकसभा निवडणुका आणि पाठोपाठ आलेल्या विधानसभा निवडणुकांमुळे हे काम थांबले होते
- आता नगररचना विभागाने या गावांचा विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे

### घटनाक्रम

- महापालिकेच्या हद्दीत गावे समाविष्ट करण्याचा निर्णय- ४ ऑक्टोबर २०१७
- गावांचा प्रारूप विकास आराखडा तयार करण्यास मुख्य सभेची मान्यता- २१ डिसेंबर २०१७
- प्रारूप आराखड्याच्या इरादा जाहीर करण्यास आणि नगर नियोजन अधिकारी नेमण्यास मुख्य सभेची मान्यता : २८ जून २०१८
- प्रारूप आराखडा तयार करण्यास शासकीय मान्यता : ४ ऑक्टोबर २०१८
- महिने मुदत वाढ मिळण्यासाठी प्रशासनाचा प्रस्ताव - सप्टेंबर २०२१
- आराखड्याचे काम थांबले
- कार्यकाळ वगळून १ मार्च २०२४ पर्यंत पुन्हा मुदत वाढ
- मुदतीतही आराखडा तयार नाही
- आराखडा तयार न केल्यामुळे २२ ऑगस्ट २०२४ रोजी सरकारने ताब्यात घेतला
- गावांचा नव्याने आराखडा तयार करण्याचे काम नगररचना विभागाकडून सुरू

> पुणे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या ११ गावांच्या विकास आराखड्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी महापालिकेकडून या गावांचे बेस मॅप, आतापर्यंत झालेले सर्वेक्षण इत्यादी स्वरूपाची सर्व माहिती मागविली आहे. त्यानंतर सहा ते आठ महिन्यांत आराखड्याचे काम पूर्ण करून तो प्रसिद्ध करण्यात येईल"
>
> **— अभिजित केतकर,** सहायक संचालक, नगररचना विभाग

# विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शन सप्ताह



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नववी ते बारावीचे वर्ग असलेल्या सर्व माध्यमांच्या आणि व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये १४ जानेवारी हा दिवस व्यवसाय मार्गदर्शन दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यंदा हा उपक्रम सप्ताहाच्या माध्यमातून साजरा करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार उपक्रम राबवण्याचे वेळापत्रकही निश्चित करण्यात आले आहे.राज्यातील इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शन सप्ताह साजरा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने १४ ते २१ जानेवारी या कालावधीत उद्योग-व्यवसाय क्षेत्र भेट, माजी विद्यार्थी मार्गदर्शन सत्र, करिअर मार्गदर्शन असे उपक्रम राबवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे (एससीईआरटी) संचालक राहुल रेखावार यांनी याबाबतच्या सूचना जिल्हा परिषदांचे माध्यमिक शिक्षणाधिकारी, महापालिकांचे प्रशासन अधिकारी यांना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत.

**मार्गदर्शन दिन**

विविध करिअर क्षेत्रांतील तज्ज्ञांचे मार्गदर्शन १४ जानेवारी रोजी, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचे सत्र १५ जानेवारी रोजी, व्यवसायाचा मंत्र या विषयावर यशस्वी व्यावसायिकांचे मार्गदर्शन १६ जानेवारी रोजी, एससीईआरटीच्या वेबिनार मालिकेचे प्रसारण १७ जानेवारी रोजी, शाळेनजीकचे उद्योग, कारखाने येथे भेट आयोजित करून भेटीसंदर्भातील अहवाल लेखन १८ जानेवारी रोजी, नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी विद्यार्थ्यांची आवड, त्यांची क्षमता आणि उपलब्ध करिअर याबाबत मार्गदर्शन १९ जानेवारी रोजी, दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर मानसशास्त्र तज्ज्ञांचे परीक्षा आणि ताणतणाव निवारण विषयावर मार्गदर्शन २१ जानेवारी रोजी आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

सर्व व्यवस्थापनांच्या नववी ते बारावीच्या शाळांमध्ये समुपदेशन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. या सप्ताहाचे आयोजन केंद्रामार्फत राबवावे. या सप्ताहाच्या काळात संबंधित अधिकाऱ्यांनी शाळा भेट देऊन अहवाल सादर करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

# मकर संक्रातीच्या दिवशी रंगणार 'तालचक्र' संगीत महोत्सव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** तालवाद्यांना केंद्रस्थानी ठेवून सुरु करण्यात आलेला आणि प्रसिद्ध तबलावादक पद्मश्री विजय घाटे यांच्या संकल्पनेतून साकारलेला 'तालचक्र' हा संगीत महोत्सव मंगळवार दिनांक, १४ जानेवारी २०२५ रोजी म्हणजे संक्रातीच्या दिवशी संध्याकाळी ६:०० वाजता डी. पी. रस्त्यावरील पंडित फार्म्स येथे आयोजित केला जाणार आहे. महोत्सवाचे हे १२ वे वर्ष असून दर वर्षीप्रमाणे या वर्षीही रसिक प्रेक्षकांना नावाजलेल्या दिग्गजांचे सादरीकरण अनुभवायला मिळेल. या वर्षीचा महोत्सव निशुल्क असून महोत्सवाच्या मोफत प्रवेशिका तिकीट खिडकी या संकेत स्थळावर उपलब्ध असल्याची माहिती पद्मश्री विजय घाटे यांनी दिली.

तालचक्र महोत्सवामध्ये अनेक नावाजलेल्या कलाकारांचे सादरीकरण होईल ज्यामध्ये हिंदुस्तानी संगीत शैलीच्या ढंगाने केलेल्या बासरीवादनासाठी ख्यातनाम असलेले बासरीवादक, राकेश चौरासिया यांचे बासरी वादन, सेल्व्हा गणेश यांचे वादन, नितीन शंकर यांचे तालवादय वादन, नवीन शर्मा यांचे ढोलक वादन, निलेश परब यांचे ढोलकी वादन, अनंत यांचे मृदंगम वादन, शिखर नाद कुरेशी यांचे जेंबे, सुरंजन खंडाळकर यांचे गायन, अभिषेक शिनकर यांचे हार्मोनियम वादन, शीतल कोलवलकर यांचे कथक सादरीकरण आणि पद्मश्री पंडित विजय घाटे यांचे तबला वादनाची पर्वणी रसिकांना मिळणार आहे.

# विश्वास कुलकर्णी, जयंत इनामदार यांना जीवनगौरव पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन' (एईएसए) तर्फे दिला जाणारा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ आर्किटेक्ट विश्वास कुलकर्णी (संस्थापक,व्हीके ग्रुप) आणि ज्येष्ठ अभियंता जयंत इनामदार (संस्थापक, स्टर्डकॉम कन्सल्टंट्स) यांना जाहीर झाला आहे.आर. बी. सुर्यवंशी (उपाध्यक्ष व संचालक मंडळ सदस्य, बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि.) यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. स्मिता पाटील (अध्यक्ष, नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल) उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम शुक्रवार, १० जानेवारी रोजी संध्याकाळी ६ वाजता, रॉयल हॉल, गार्डन कोर्ट, एनडीए रस्ता येथे आयोजित केला आहे.या वार्षिक पुरस्काराचे हे १८ वे वर्ष आहे.एईएसए चे प्रेसिडेंट आर्किटेक्ट राजीव राजे, उपाध्यक्ष आर्किटेक्ट संजय तासगांवकर, चेअरमन आर्किटेक्ट महेश बांगड, आर्किटेक्ट निनाद जोग यांनी ही माहिती दिली.

### ५४ वर्षांचे गौरवशाली योगदान

- पुण्यातील 'आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन' (AESA) ची स्थापना १९७० साली झाली. बांधकाम क्षेत्रातील सर्व व्यावसायिकांनी एकत्र येऊन शहराच्या विकासासाठी हातभार लावावा, या उद्देशाने ही संस्था स्थापन झाली. स्वयंसेवी आणि ना-नफा तत्त्वावर आधारित ही संस्था आर्किटेक्ट्स आणि इंजिनिअर्ससाठी उत्कृष्ट व नैतिक कार्यपद्धतीला प्रोत्साहन देत असून, पुणे शहराच्या सामाजिक व नागरी प्रश्नांमध्ये सक्रीय सहभाग घेत आहे.

# साधू वासवानी पुलाचा उर्वरीत भाग दोन दिवसात पाडणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोरेगाव पार्क येथील साधू वासवानी पुलास पन्नास वर्षे पूर्ण झाल्यामुळे हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक असल्याचा निष्कर्ष महापालिकेच्या पाहणीत निघाला होता. त्यानंतर हा पूल पाडून तेथे नवीन पूल उभारणी करण्याचे निश्चित झाले होते. मात्र, वेगवेगळ्या तांत्रिक कारणांमुळे नवीन पुलाच्या कामाचे भूमीपूजन होऊनही प्रत्यक्षात कामाला सुरवात झाली नव्हती. रेल्वे प्रशासनाकडून साधू वासवानी उड्डाणपुलाचा उर्वरित भाग पाडण्यासाठी तत्त्वतः मंजुरी मिळाल्यानंतर आता महापालिका प्रशासनाकडून येत्या दोन ते तीन दिवसांत पुलाचा पुणे कॅन्टोन्मेंटच्या हद्दीतील भाग पाडण्यास सुरवात केली जाणार आहे.त्यापूर्वी पुलाखाली असलेल्या झोपडपट्टीधारकांचे महापालिका प्रशासनाकडून स्थलांतर केले जाणार आहे.

दरम्यान, मे महिन्यात अडथळ्यांची शर्यत पार करून पुलाचा कोरेगाव पार्कच्या बाजूकडील भाग पाडण्याचे काम सुरू झाले होते. तर, पुणे कॅन्टोन्मेंटच्या बाजूकडील पुलाचा भाग पाडण्याच्या कामाला रेल्वेची मंजुरी मिळणे बाकी होते. मागील आठवड्यात रेल्वेने तत्त्वतः मंजुरी दिली.

> पुलाचा पुणे कॅन्टोन्मेंटकडील भाग पाडण्याचे काम तीन दिवसांत होईल. त्यापूर्वी पुलाखाली काही झोपड्या आहेत. या झोपडीधारकांचे स्थलांतर करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. ही प्रक्रिया पार पडल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरवात होईल. संबंधित पुलाचे ४० टक्के पाडकाम झाले आहे. पुलाच्या कामासाठी ८० कोटी रुपये खर्च येणार आहे. या पुलाची लांबी ५४ मीटर इतकी आहे.
>
> **— युवराज देशमुख,** मुख्य अभियंता, विशेष प्रकल्प विभाग

# सदस्य नोंदणीसाठी भाजपाचे १० जानेवारी रोजी 'घर चलो अभियान'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** भारतीय जनता पार्टीच्या सुरु असलेल्या संघटन पर्वा अंतर्गत १० जानेवारी रोजी प्राथमिक सदस्य नोंदणीसाठी घर चलो अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानात पक्षाचे सर्व मंत्री, पंचायती पासून पार्लमेंट पर्यंतचे सर्व लोकप्रतिनिधी, सर्व पदाधिकारी या अभियानात सहभागी होणार आहेत, अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत श्री. बावनकुळे बोलत होते. यावेळी संघटन पर्व प्रभारी आ. रवींद्र चव्हाण, आ. शिवाजी कर्डिले, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन उपस्थित होते. पक्षाचे दीड कोटी प्राथमिक सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट निश्चितच पूर्ण होईल, असा विश्वासही चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केला.

श्री. बावनकुळे यांनी सांगितले की, पक्षाच्या संघटन पर्व अंतर्गत सदस्य नोंदणी अभियानाला राज्यात प्रारंभ झाला आहे. 5 जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व प्रमुख नेत्यांनी, लोकप्रतिनिधींनी, पदाधिकाऱ्यांनी बूथ पातळीवर जाऊन या अभियानात सहभाग घेतला.10 जानेवारी रोजी पक्षाचे सर्व प्रमुख नेते, पदाधिकारी प्रत्येक बुथवर जाऊन प्राथमिक सदस्य नोंदणी करणार आहेत.

# बड्या रद्दी व्यावसायिकाकडे ७० लाखांची खंडणी मागणाऱ्याला अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील एका बड्या रद्दी व्यावसायिकाकडे ७० लाखांची खंडणी मागणाऱ्या एकाला गुन्हे शाखेच्या युनिट एकने अटक केली. या प्रकरणात अटक करण्यात आलेला आरोपी व्यावसायिकाकडे कामगार होता. पगारावरून वाद झाल्याने त्याला कामावरून काढून टाकण्यात आले होते. मालकाला धडा शिकविण्यासाठी त्याने खंडणी मागितल्याचे तपासात उघडकीस आले.

मितीन देवलाल सरोज (वय ३१, सध्या रा. लोहियानगर, गंज पेठ, मूळ रा. बभनपूर, जि. प्रयागराज, उत्तर प्रदेश) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याबाबत एका व्यावसायिकाने खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. तक्रारदाराचा रद्दी व्यवसाय आहे. त्यांच्या मोबाइल क्रमांकावर अनोळखी क्रमांकावरून सरोजने संपर्क साधला होता. सरोजने त्यांच्याकडे ७० लाख रुपयांची खंडणी मागितली. खंडणी न दिल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. घाबरलेल्या व्यावसायिकाने याबाबत पोलिसांकडे तक्रार दिली. तपासात सरोजने पत्नीच्या मोबाइलवरून व्यावसायिकाच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधल्याचे उघडकीस आले.

सरोज किराणा माल दुकानात कामाला असल्याची माहिती पोलीस कर्मचारी शुभम देसाई यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त गणेश इंगळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शब्बीर सय्यद, सहायक निरीक्षक अभिजीत पाटील, पोलीस कर्मचारी शुभम देसाई, नीलेश साबळे, विठ्ठल साळुंखे यांनी ही कामगिरी केली.

# राष्ट्र निर्माण संबंधित चित्रफितीद्वारे संदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सर परशुराम महाविद्यालयात नुकतीच सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. या निमित्त कला शाखेतील विद्यार्थ्यांना राष्ट्र निर्माण संबंधित चित्रफित दाखविण्यात आली. या प्रसंगी संविधानातील अनेक मूल्ये, मानव विकास निर्देशांक (HDI), शाश्वत विकास ध्येये याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. यामधे तरुणाईचा व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हे या कार्यशाळेचे वैशिष्ट्य होते. कार्यक्रमाचे आयोजन एमपॉवर चॅरिटेबल ट्रस्ट पुणे यांच्या तर्फे करण्यात आले. विनय दवे यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रम प्राचार्य डॉ.सुनिल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. उपप्राचार्य प्रा.विद्या अवचट यांनी आभार व्यक्त केले.

# स्वाधार योजनेस १५ जानेवारीपर्यंत मुदत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यार्थ्यांचे उशिरा सुरू होणारे शैक्षणिक सत्र, सद्यस्थितीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेत असलेले तसेच नव्याने या योजनेसाठी अर्ज करणारे विद्यार्थी यांना ऑनलाईन अर्ज करताना तांत्रिक अडचणी येत असल्याने समाज कल्याण विभागाने स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत १५ जानेवारी २०२५ पर्यंत वाढविली आहे.

समाजकल्याण विभागामार्फत शासकीय वसतिगृहाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत आज्ञावली (सॉफ्टवेअर) विकसनाचे काम प्रगतीपथापर असून त्यामध्ये ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याचे मॉड्यूल कार्यरत झाले आहे. त्यानंतर स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत वेळोवेळी ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत वाढविण्यात आलेली होती. तथापि, तांत्रिक अडचणीमुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून समाज कल्याण आयुक्तांनी पुन्हा १५ जानेवारीपर्यंतची मुदत वाढविली आहे. समाज कल्याण विभागाच्या शासकीय वसतिगृहासाठी ऑनलाईन अर्ज केला नाही अशा विद्यार्थ्यांनी वरील पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. देण्यात आलेली मुदतवाढ अंतिम मुदतवाढ असून त्यानंतर कोणत्याही प्रकारे नवीन मुदतवाढ देण्यात येणार नसल्याने वरील अंतिम दिनांकापर्यंत अर्ज करतील अशाच विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

# काही भागात अवकाळी पावसाची शक्यता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्या हवामानामुळे होणारे बदल नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम करत आहेत. आता उत्तर भारतातून येणाऱ्या गार वाऱ्यामुळे राज्यात थंडीचा कडाकाही वाढत आहे. अशातच हवामान विभागाने, पुढील दोन-तीन दिवसांत तापमानात आणखी घसरण होण्याचा अंदाज वर्तवला आहे. तर यासह हवामान विभागाकडून अवकाळी पावसाचा इशारा देखील देण्यात आला आहे.

**हवामान**

हवामानाने बांधलेल्या अंदाजामुळे आता शेतकऱ्यांना अवकाळी पावसाची चिंता सतावू लागली आहे. नुकताच हवामान विभागाने मराठवाडा, मध्य व उत्तर महाराष्ट्रात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा इशारा दिला आहे. यामुळे पडलेल्या थंडीमुळे आणि अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान होण्याची अधिक शक्यता आहे. असे झाल्यास शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसू शकतो.

समोर आलेल्या माहितीनुसार, सोमवारी मुंबईत १३ अंश तर पुण्यात १३.८ अंश तापमानाची नोंद झाली आहे. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील काही भागांत पारा १२ अंशांच्या खाली गेला आहे. विदर्भातील नागपूर (११.२), अमरावती (११.९), गोंदिया (११.४), आणि गडचिरोली (१२.०) येथेही थंडीची तीव्रता जाणवली.

# 'सिंधी प्रीमिअर लीग'चे सहावे पर्व १५ फेब्रुवारीपासून

**प्रीमिअर लीग**

**सिंधी प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धेचे सहावे पर्व यंदा १५ फेब्रुवारी ते ९ मार्च २०२५ या कालावधीत पिंपरी येथे होणार आहे. या स्पर्धेत यंदा १६ पुरुष, तर आठ महिला संघ सहभागी होणार आहेत. पिंपरी येथील एमसीसी, मृणाल क्रिकेट ग्राउंडवर होणाऱ्या या स्पर्धेचे थेट प्रक्षेपण सिंधी प्रीमिअर लीग फेसबुक पेजवरून पाहता येणार आहे, अशी माहिती संयोजन समितीचे कन्वल खियानी, हितेश दादलानी यांनी पत्रकार परिषदेत दिली.**



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पत्रकार परिषदेवेळी उद्योजक डब्बू आसवानी, श्रीचंद आसवानी, सागर तेजवानी यांच्यासह संयोजन समितीतील कमल जेठानी, रोनक पंजाबी, अवि इसरानी, अंकुश मुलचंदानी, नरेश नशा, करण आसवानी, अवि तेजवानी, सोमेश गिडवाणी, कुणाल गुडेला, रितेश आठवानी, मनीष गेरेजा, महिला प्रतिनिधी अवनी तेजवानी, खुशबू पंजाबी, हिना गोगिया, शिखा सेवानी, शीतल पहलानी, रुपाली पंजाबी संघमालक व प्रायोजक उपस्थित होते. महिलांमध्ये ९०, तर पुरुषांमध्ये २५१ खेळाडूंनी सहभाग नोंदवला.

गेल्या पाचही हंगामात या स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. यंदा स्पर्धेला अधिक व्यापक स्वरूप आले असून, खेळाडूंची संख्याही वाढली आहे. पुण्यासह परभणी, जळगाव, नांदेड, बंगळुरू, जयपूर येथूनही खेळाडू सहभागी होत आहेत. आयपीएलच्या धर्तीवर या स्पर्धेची रचना करण्यात आली आहे. महिलांनाही खेळासाठी प्रोत्साहन दिले जात असून, यंदा महिलांचे आठ संघ स्पर्धा खेळणार आहेत. पुरुषांचे १६ संघमालक व महिलांचे आठ संघमालक आपल्या २४ संघांसह स्पर्धेत उतरणार आहेत. पुरुष संघांची नवे सिंधी संस्कृतीवर आधारित, तर महिला संघांची नवे नद्यांवर आधारित आहेतअसे कन्वल खियानी म्हणाले.

> देशभरात विखुरलेला सिंधी समाज एकत्रित यावा, त्यांच्यात तंदुरुस्तीविषयी जागरूकता व्हावी, तसेच मोबाईल-इंटरनेटच्या जाळ्यात न अडकता मैदानावर खेळण्याला प्राधान्य द्यावे आणि खेळातून उभारलेल्या निधीचा समाजासाठी उपयोग व्हावा, या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित केली जाते. सिंधी समाजातील उद्योजक तरुणांनी एकत्र येऊन या क्रिकेट लीगचे आयोजन केले आहे. 'सिंधी प्रीमियर लीग सीजन ६'चे उदघाटन १५ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे. यावेळी माजी क्रिकेटपटू, सिंधी समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, तसेच खेळाडू, संघ मालक व कुटुंबीयांची उपस्थिती असणार आहे. स्पर्धेतून मिळालेला निधी सामाजोपयोगी आणि विधायक कामासाठी देण्यात येतो"
>
> **— हितेश दादलानी**

Selected

## देहूनगर पंचायतीच्या कर्मचाऱ्यांवर चोरट्यांचा हल्ला...




**देहूगाव** देहूगावात इंद्रायणी नदीकाठी असलेल्या नगरपंचायतीच्या रोहित्राची चोरी करण्यासाठी आलेल्या पाच अज्ञात चोरट्यांनी नगरपंचायतीच्या दोन कर्मचाऱ्यांवर हल्ला चढविला. तसेच, चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेरा पळवला. ही घटना शनिवारी (दि. ४) रात्री एकच्या सुमारास घडली. पवन मोरे आणि कुमार काळोखे (रा. देहूगाव) असे किरकोळ जखमी झालेल्या कर्मचाऱ्यांचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नगरपंचायत हद्दीतील इंद्रायणी नदीकाठी देह नगरपंचायतीचे मलशुद्धीकरण केंद्र आहे. येथील रोहित्राची एकाच वर्षात सुमारे चारवेळा चोरी झाली आहे. शनिवारी पहाटे रोहित्र चोरीसाठी पाच अज्ञात चोरटे आले होते. मात्र, त्या ठिकाणी नगरपंचायतीचे दोन कर्मचारी बंदोबस्तावर असल्याने चोरट्यांनी तेथील काचा फोडून कॅबिनचे नुकसान केले आणि त्यांच्यावर हल्ला चढविला. दोघांना मारहाण करून जीवे मारण्याची धमकी अज्ञात चोरट्यांनी दिली.

या वेळी पळून जाताना चोरट्यांनी तेथील सीसीटीव्ही कॅमेरे चोरून नेले. या घटनेची माहिती देहूरोड पोलिस ठाण्याला मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. या प्रकरणी देहूरोड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, तपास देहूरोड पोलिस करीत आहेत.

## संकष्टीनिमित्त विशेष दर्शन बस



**पिंपरी :** संकष्टी चतुर्थीनिमित्त महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) वल्लभनगर, पिंपरी- चिंचवड आगारातून अष्टविनायक दर्शनाकरिता विशेष बस सोडण्यात येणार आहे. त्यासाठी ऑनलाइन आरक्षण सुविधा खुली करण्यात आली आहे. येत्या १७ जानेवारीला ही बस मार्गस्थ होणार असून १८ जानेवारीला पुन्हा बस डेपोत येणार आहे. वल्लभनगर येथील पिंपरी-चिंचवड आगारातून अष्टविनायक दर्शन बस शुक्रवारी (ता. १७) सकाळी सात वाजता सुटणार आहे. या गाडीचे प्रौढ आणि मुलांकरिता तिकीट दर वेगवेगळे असणार आहेत. प्रौढांसाठी ९९० रुपये ते एक हजार पाच रुपये, तर मुलांसाठी पाचशे ते ५०५ रुपयांपर्यंत दर असतील. ओझर (भक्त निवास) येथे राहण्याची व जेवणाची सोय असून, तो खर्च प्रत्येक प्रवाशाने स्वतः करावयाचा आहे, अशी माहिती आगाराच्या वतीने देण्यात आली. महिला सन्मान योजनेअंतर्गत महिलांना आणि अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेअंतर्गत ज्येष्ठांना तिकीट दरात ५० टक्के सवलत देण्यात आली आहे. याशिवाय ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची सवलत देण्यात आली आहे. या सर्व योजनांचा लाभ प्रवाशांना अष्टविनायक दर्शनसाठी घेता येणार आहे. या बससेवेसाठी ऑनलाइन आरक्षण सुरू झाले असून, एसटी महामंडळाच्या www.msrtc. gov.in या संकेतस्थळावर आरक्षण करता येणार आहे.

## गेल्या वर्षभरात ३३ घुसखोर बांगलादेशी, रोहिंग्याना पकडले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये गेल्या वर्षभरात ३३ घुसखोर बांगादेशींना पिंपरी- चिंचवड पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. पिंपरी- चिंचवड शहर हे औद्योगिक नगरी म्हटलं जातं. या शहरात आणि परिसरात अनेक उद्योगधंदे आहेत. यामुळे देशातील अनेक राज्यांमधून विविध धर्माची आणि जातीची लोक शहरात वसलेली आहेत. अशातच घुसखोर बांगादेशीच प्रमाण वाढले आहे. पिंपरी- चिंचवड शहरांमधील म्हाळुंगे, निगडी, पिंपरी, भोसरी, भोसरी एमआयडीसी, सांगवी, दापोडी, चाकण, तळेगाव एमआयडीसी आणि देहूरोड या परिसरात बांगलादेश आणि रोहिंग्ये यांना अटक केली आहे. सर्वाधिक बांगलादेशी हे भोसरी परिसरातून अटक करण्यात आले आहेत. भोसरी मध्ये वर्षभरात बारा बांगलादेशींना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. हे सर्व बांगलादेशी हे बनावट कागदपत्रांद्वारे परिसरात राहत होते. आधार कार्ड, पॅन कार्ड यासह इतर कागदपत्र ही नेहमीच या बांगलादेशकडून जप्त करण्यात आलेले आहेत.या बांगलादेशींना नेमकं बनावट कागदपत्र कोण बनवून देतो. या मुळापर्यंत पोहचणे देखील पोलिसांची जबाबदारी आहे. वर्षभरात पकडण्यात आलेले ३३ बांगलादेशांना आणि रोहिंग्यांपैकी काही जणांचे पासपोर्टदेखील पोलिसांनी रद्द केलेले आहेत. बांगलादेशी आणि रोहिंग्ये यांना शोधण्याची मोहीम अधिक तीव्र करणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त विनयकुमार चौबेंनी दिली.

## वायसीएम रुग्णालय पदव्युत्तर संस्थेत विविध अभ्यासक्रमांच्या जागा वाढविणार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी-** महापालिकेच्या पिंपरी-संत तुकारामनगर येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय पदव्युत्तर संस्थेतील (वायसीएम) काही अभ्यासक्रमांच्या जागा वाढविण्यात येणार आहे. त्याबाबतचा प्रस्ताव मेडिकल काउंसिल ऑफ इंडियाकडे पाठविण्यात आला आहे. त्यामुळे येथील डॉक्टरांची संख्या वाढणार आहे.महापालिकेचे वायसीएम रुग्णालय हे शहरात मध्यवर्ती ठिकाणी आहे. या रुग्णालयामध्ये 750 खाटांची सोय आहे. तसेच, विविध अत्यावश्यक वैद्यकीय सुविधा या रुग्णालयात देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांबरोबरच शहराबाहेरुनदेखील येथे नागरिक उपचारासाठी येत आहेत. त्यामुळे या रुग्णावर अधिकचा ताण आहे.त्या तुलनेत डॉक्टरांची कमतरता जाणवते. ही कमतरता भरून काढण्यासाठी रुग्णालयामध्ये सध्या सुरू असलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या जागा वाढविण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविला आहे. मेडिकल काउंसिल ऑफ इंडियाची त्याला मंजुरी मिळाल्यानंतर आपोआपच या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढेल. त्यामुळे रुग्णालयातील डॉक्टरांची संख्यादेखील वाढणार आहे. या प्रस्तावाला वर्षभरात मंजुरी अपेक्षित आहे, अशी माहिती रुग्णालय प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

**नर्सिंग महाविद्यालयही होणार सुरू-** वायसीएम रुग्णालयामध्ये बीएस्सी नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्यासाठी राज्य सरकारने 2024 मध्ये तत्त्वतः मंजुरी दिली आहे. रुग्णालयाच्या आवारातील नवीन इमारतीत तीन मजल्यांवर महाविद्यालय सुरू होणार आहे. या अभ्यासक्रमासाठी 60 जागा असणार आहेत. नर्सिंग महाविद्यालयामुळे रुग्णालयातील परिचारिकांच्या संख्येत वाढ होणार आहे.

# महिलांना ट्रोलिंग करणे संकुचित मानसिकतेचे प्रतिक

## महापालिकेच्या परिसंवादात वक्त्यांचा उमटला सूर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** प्रतिकूल परिस्थितीमध्ये सावित्रीबाई फुले यांनी निर्भीडपणे विकृत मानसिकतेचा सामना करत आपल्या विचार व भूमिकेवर ठाम राहून सामाजिक क्रांतीचे पाऊल उचलले. सावित्रीबाईंचा हा वारसा प्रत्येक महिलेने अंगीकारायला हवा. महिला अभिव्यक्त होत असताना जाणीवपूर्वक त्यांना ट्रोल करण्याची प्रवृत्ती वाढत असून संकुचित विचारसरणी आणि पुरुषी मानसिकतेचे हे प्रतिक आहे. अशा गोष्टींना महिलांसह समाजातील प्रत्येक घटकांनी ठामपणे प्रतिकार करून आपली भूमिका परखडपणे मांडली पाहिजे, असे विचार महापालिका आयोजित परिसंवादात वक्त्यांनी मांडला.

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपरी येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक येथे विचार प्रबोधनपर्वाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी "सावित्रीबाई फुले यांचे विचार आणि आजच्या महिलांची भूमिका" या विषयावरील परिसंवादात सहभागी वक्ते बोलत होते. यामध्ये उद्योजिका डॉ. तृप्ती धनवटे- रामाने, पत्रकार अश्विनी डोके, शर्मिष्ठा भोसले, प्रा. शीलवंत गायकवाड सहभागी झाले होते.

डॉ. तृप्ती धनवटे- रामाने म्हणाल्या, सावित्रीबाई फुले यांच्या विचारसरणीचा आधुनिक काळातील महिलांच्या सक्षमीकरणाशी थेट संबंध असून समाजात समानतेचा संदेश पसरवण्यासाठी त्यांचे योगदान देखील महत्वपूर्ण आहे. शिक्षण, सामाजिक न्याय, आणि महिलांच्या स्वावलंबनावर तसेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी सावित्रीबाईंचे विचार अंगीकारणे गरजेचे आहे. शिक्षण घेतल्यानंतर त्या शिक्षणाचा उपयोग रोजगार मिळविण्यासाठी केला गेला पाहिजे. आजच्या काळात कौशल्य शिक्षण व व्यावसायिक शिक्षणावर भर देणे अत्यंत गरजेचे आहे, महिला केवळ शिक्षणच नाही तर विविध क्षेत्रात आपली छाप पाडताना दिसत आहेत. विविध क्षेत्रात महिला यशाच्या शिखरावर असताना देखील त्यांना ट्रोलिंगला सामोरे जावे लागते. अशा वेळी महिलांनी न डगमगता आपले कार्य नित्याने केले पाहिजे,असे मत डॉ. तृप्ती धनवटे- रामाने यांनी मांडले.

पत्रकार अश्विनी सातव – डोके म्हणाल्या, उत्तम सहजीवन कसे असावे याचे अप्रतिम उदाहरण म्हणजे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आणि क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले आहे. त्यांच्या काळात त्यांनी अनिष्ठ रूढी व परंपरा झुगारून प्रगतीशील विचार आणि कृतींचा अवलंब केला. त्याबद्दल आपण नेहमी कृतज्ञ असायला हवे. आत्ताच्या काळात देखील असलेल्या रूढी व परंपरांची चिकित्सा करून योग्य काय आहे याचा सर्वांगीण विचार होणे गरजेचे आहे. ट्रोलिंगविरोधी कायदे असले तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी अजूनही अपुरी आहे, त्यामुळे ट्रोल करणाऱ्या व्यक्तींना जबाबदार ठरवणे कठीण जाते. महिलांसह प्रत्येक घटकाला सुरक्षिततेची हमी देणे ही समाजाची आणि व्यवस्थेची जबाबदारी आहे. लिंगसमानता आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांची खरी जाणीव आपल्या कृतीतून दिसली पाहिजे.

> ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आणि क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांनी शिक्षण तसेच समाजात समानतेचा संदेश पसरवण्यासाठी त्यांचे संपूर्ण आयुष वाहून घेतले त्यामुळे आपण आज सुवर्णक्षण जगतो आहोत. सावित्रीबाई फुले आणि जोतीराव फुले यांच्या विचारांना अंगीकारणे आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी समाजातील असमानता, अन्याय, अज्ञान आणि अंधश्रद्धा याविरुद्ध लढा दिला आणि स्त्रियांना व वंचितांना शिक्षणाचे हक्क मिळवून दिले. त्यांनी महिलांसाठी आणि वंचित वर्गासाठी शाळा स्थापन केल्या. त्यांच्या मते, शिक्षण हे व्यक्तीचे जीवन बदलण्याचे आणि समाज सुधारण्याचे प्रभावी साधन आहे. सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांसाठी शिक्षण आणि आत्मनिर्भरतेचे महत्व अधोरेखित केले. त्यांचे कार्य आजच्या स्त्री सक्षमीकरणाच्या चळवळींसाठी प्रेरणादायी आहे.
>
> **—प्रा. शीलवंत गायकवाड**

# इलेक्ट्रिक वाहन खरेदीत घट

## १६,४८८ इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी: सीएनजी असलेल्या ९,०६५ वाहनांची नोंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी- पिंपरी :** पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयात २०२४ या वर्षात १६,४८८ इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी झाली असून २०२३ या वर्षी १७,३८९ इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी झाली होती. त्यामुळे २०२४ मध्ये इलेक्ट्रिक वाहनांच्या खरेदीत घट झाल्याचे दिसून येत आहे. तर फक्त सीएनजी असलेल्या ९,०६५ वाहनांची नोंदणी २०२४ मध्ये झालेली आहे.

दरवर्षी वाहनांच्या नोंदणीत वाढ होत असून पेट्रोल, डिझेल या इंधनावर चालणाऱ्या वाहनांनाही मागणी वाढत आहे. २०२१ या साली ७४,३२३ पेट्रोलवरील वाहनांची नोंदणी झाली होती. तर २०२४ मध्ये पेट्रोलवरील १ लाख १५ हजार ५९५ वाहनांची नोंदणी झालेली आहे. तर डिझेलवर चालणाऱ्या १२,७६२ वाहनांची नोंदणी २०२१ साली झाली होती, तर २०२४ मध्ये डिझेलवरील २२,१३७ वाहनांची नोंदणी झालेली आहे.

तसेच सीएनजी व पेट्रोल इंधन असलेल्या १०,८७३ वाहनांची नोंदणी २०२१ मध्ये झाली होती. तर याच इंधनावरील वाहनांच्या खरेदीत २०२४ मध्ये दुपटीने वाढ झाली असून त्याची नोंदणी २२,६५९ झाली आहे.

### वर्षनिहाय आकडेवारी

| इंधन - | 2024 – 2023 – 2022 – 2021 |
| --- | --- |
| पेट्रोल - | 1,15,595 – 1,07,543 – 93,040 – 74,323 |
| पेट्रोल/सीएनजी - | 22,659 – 19,666 – 15,595 – 10,873 |
| पेट्रोल/हायब्रिड - | 1,787 – 2,685 – 908 – 908 |
| डिझेल वाहने - | 22,137 – 20,528 – 17,316 – 12,762 |
| फक्त सीएनजी | 9,065 – 7,613 – 6,471 – 4,530 |
| इलेक्ट्रिक - | १६,४८८ – 17,389 – 15,879 – 4,390 |
| पेट्रोल/इथेनॉल - | 3,216 – 2,088 |
| डिसेल/हायब्रिड - | 104 – 40 – 14 |
| एलएनजी - | 130 – 129 – 15 |
| स्टॉग हायब्रिड इलेक्ट्रिक | 682 |

# कचरामुक्त पिंपरी-चिंचवडसाठी पुढाकार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** शहरातील कचराकुंड्या हटविल्यानंतर नागरिक मोकळ्या जागेवर कचरा टाकत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आरोग्य विभागाने आठ क्षेत्रीय कार्यालयांतील ८० ठिकाणांची पाहणी करून तेथे लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला आहे. या भागातील घंटागाड्यांची वेळ बदलण्यात येणार असून, या ८० ठिकाणांचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. तसेच उघड्यावर कचरा टाकल्यास दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

केंद्र सरकारच्या वतीने गेल्या काही वर्षांपासून देशभर स्वच्छ सर्वेक्षण राबविण्यात येत आहे. केंद्र सरकारचे एक पथक शहरातील झोपडपट्टी, मंडई, बाजारपेठ, लोकवस्ती, सार्वजनिक शौचालये, रस्ता आदी भागांची पाहणी करून दर वर्षी स्वच्छतेचे क्रमांक जाहीर करते. स्वच्छ सर्वेक्षणासाठी दर वर्षी केंद्राचे पथक फेब्रुवारी महिन्यात येते. त्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने स्वच्छतेसाठी आतापासून पुढाकार घेण्यास सुरुवात केली आहे. शहरात महापालिकेची आठ क्षेत्रीय कार्यालये आहेत. या क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध मोकळ्या जागा, रस्त्याच्या कडेला नागरिक कचरा टाकत आहेत. कोणत्या भागात सर्वाधिक कचरा उघड्यावर टाकला जातो, याची आरोग्य विभागाने पाहणी केली आहे. उघड्यावर कचरा टाकणाऱ्या परिसरातील कारणे जाणून घेऊन घंटागाड्यांची संख्या वाढवून वेळही बदलण्यात येणार आहे. क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या दहा ठिकाणांची जबाबदारी दहा अधिकारी, कर्मचाऱ्यांकडे देण्यात येणार आहे. त्यामुळे संबंधित परिसर स्वच्छ राहण्यासाठी मदत होणार आहे. त्यानंतरही कोणी उघड्यावर कचरा टाकल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाईचा इशारा आरोग्य विभागाने दिला आहे.

> **...तर पेट्रोल पंपचालकांना नोटीस**
>
> शहरातील विविध मुख्य आणि अंतर्गत रस्त्यांवर सार्वजनिक स्वच्छतागृहांची संख्या कमी आहे. कामानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या नागरिक आणि महिलांची स्वच्छतागृहांअभावी मोठी अडचण होते. शहरातील प्रत्येक पेट्रोल पंपावर नागरिकांसाठी स्वच्छतागृहाची व्यवस्था केली जाते. मात्र, अनेक पेट्रोल पंपावरील स्वच्छतागृहे बंद अथवा नादुरुस्त असतात. त्यामुळे आरोग्य विभागाच्या वतीने शहरातील सर्व पेट्रोप पंपचालकांना नागरिकांसाठी स्वच्छतागृहे सुरू ठेवण्याबाबत आवाहन करण्यात येणार आहे. यासाठी पंपचालकांना पत्रही देण्यात येणार आहे. एक महिन्यानंतर सर्व पेट्रोप पंपांवरील स्वच्छतागृहे स्वच्छ आणि वापरण्यायोग्य आहेत का, याची पाहणी केली जाणार आहे. स्वच्छतागृहे सुरू न ठेवणाऱ्या पंपचालकांना नोटीस बजावण्यात येणार आहेत. नागरिक मोकळ्या जागांवर कचरा टाकत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे कचरामुक्त पिंपरी-चिंचवड शहर हा उपक्रम राबविण्यात येत आहे. आठ क्षेत्रीय कार्यालयांतील ८० ठिकाणे निश्चित केली असून, या ठिकाणांवर आरोग्य विभागाने लक्ष केंद्रित केले आहे. या ठिकाणांचे सुशोभीकरण करण्यात येणार असल्याचे -**अजिंक्य येळे** सहायक आयुक्त

# आंतरराष्ट्रीय परिषदेत एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईनचा रिमोट केंद्र म्हणून सहभाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी-** पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँण्ड डिझाइनने तीन आणि चार जानेवारीला आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय शाश्वतता उद्दीष्टे चिंतन परिषदेमध्ये रिमोट केंद्र म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. एकुण १५ रिमोट केंद्रांपैकी पुण्यातून एकमेव केंद्र एस. बी. पाटील आर्किटेक्चर कॉलेज येथे होते.कार्यक्रमाचे उद्घाटन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते करण्यात आले. इंदलकर यांनी १७ शाश्वतता उद्दीष्टे आणि भारतातील त्यांची अंमलबजावणी याविषयी माहिती दिली.प्रभारी प्राचार्य आर्किटेक्ट शिल्पा पाटील यानी संशोधन टीम आणि विद्यार्थी परिषेदेच्या नेतृत्वाखाली महाविद्यालयाने स्वच्छ उर्जा, शाश्वतता शहरे आणि हवामान कृती यासारख्या महत्वाच्या विषयावर केलेले कार्य याबाबत माहिती दिली.

आर्किटेक्चर आणि अभियांत्रिकी विद्यार्थी यांच्या उपस्थितीत या परीषेदेने शाश्वततेच्या दिशेने प्रयत्नशिल पावले उचलण्यावर भर दिला आणि स्थानिक समुदायात जनजागृती केली.पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुत्रसंचालन प्रा. अनुजा सिंग यांनी केले.

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम १० (१) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

**जाहीर नोटीस**

**अर्ज क्र.१२२/२०२४.|४२७२**

**अर्जदार**
नियो.सेलेस्टीन ए विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ता:-स.नं.१९/८,लेन नं. ०२सी, मराठा मंदिरमागे, एचपी पेट्रोल पंपासमोर, बावधन खुर्द, ता. मुळशी, जि. पुणे- ४११ ०२१.
तर्फे
**मुख्य प्रवर्तक, श्री. संकेत माधव कुलकर्णी.**
**विरुद्ध**
**जाब देणार**
१.मे.लोटस कन्सट्रक्शन्स भागीदारी संस्था,
पत्ता:-स.नं.१४७,रंगाली सोसायटी, शॉप नं. ०२,
कर्वेपुतळया समोर,कोथरुड,पुणे-४११ ०२९.
तर्फे भागीदार,
अ.श्री.मुकुंद बबनराव निम्हण.
ब. श्री. अंकुश किसन वेडे.
क. श्री. मंगेश विश्वनाथ वेडे,
ड.सौ.सुजाता मुकुंद निम्हण.
२.उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (१), पुणे.

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. सेलेस्टीन ए विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या.,पत्ता:- स.नं.१९/८,लेन नं.०२सी, मराठा मंदिरमागे,एचपी पेट्रोल पंपासमोर, बावधन खुर्द, ता.मुळशी,जि.पुणे-४११ ०२१ या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र.१२२/२०२४ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०२/०१/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने अॅड.समृध्दी कोठारी हजर. जाब देणार क्र. १क व १ड गैरहजर. सबब जाब देणार क्र. १क व १ड यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि. १६/०१/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १क व १ड यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे, दिनांक: ०६/०१/२०२५.

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
**सक्षम प्राधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**पुणे शहर, पुणे.**

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत)
अधिनियम १९६३ याच्या कलम १० (१) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक ५९२/२०२३/४२६६**

**अर्जदार**
ईलाईट- २७ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
पत्ता: सर्व्हे. नं. १३०, हिस्सा नं. ४ / १बी + ५ए, (प्लॉट नं. ३ ते १५) वाकड, ता. मुळशी, जि. पुणे- ४११०५७.
तर्फे, अध्यक्ष : श्री. ग्रेगरी लोबो, सचिव : श्री. परबीर कुमार पांडा, खजिनदार: श्री. सुमित सहोता.
**विरुद्ध**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
१. मे. निर्मीती बिल्डर्स, नोंदणीकृत भागीदारी संस्था, ऑफिस पत्ता- ८, नामजोशी भवन, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री मार्ग, पुणे- ४११०३०, तर्फे भागीदार, श्री. अरुणकुमार पुरुषोत्तम पंडीत रा. ५, गोपदमा अपार्टमेंट, लेन क्र. ९, प्रभात रोड, पुणे- ४११ ००४, 2. ए. श्री. हरिष रामकृष्णा कोडीयाल, बी. सौ. कालिंदी हरिष कोडीयाल, जाब देणार नं. २ ए आणि बी. रा. १०२, बोरा गांधी- अपार्टमेंट, ३, लॅबर्नम रोड, मुंबई- ४००००७, सी. सौ. रंजना मकरंद गोखले, रा. महादेव निवास, बनाचा पाडा, पांच पाखडी, ठाणे - ४००६०२, डी. सौ. मेघा प्रकाश सरदेसाई रा. कमलाजी भवन, तांडेल बीआरएस च्या समोर, शिवाजी नगर रोड, नौपाडा, ठाणे- ४००६०२. ई. श्री. सुरेश दत्तात्रय माऊस्कर जाब देणार नं. ई रा. बी- १०, आराधना सोसायटी, चेंदणी कोळीवाडा, ठाणे (पुर्व). एफ. श्री. विजय प्रभाकर गायतोंडे जी. श्री. प्रभाकर गंगाधर गायतोंडे जाब देणार नं. एफ आणि जी, रा. ६/७-८, जयकर स्मृती, आरे रोड, गोरेगांव (प.), मुंबई- ४०००६२, एच. श्री. शैलेश प्रभाकर देशमुख आय. श्री. विवेक प्रभाकर देशमुख जे. श्री. अभय प्रभाकर देशमुख जाब देणार नं. एच ते जे, रा. १११, ३३/८ पंत नगर, घाटकोपर, मुंबई-४०० ०७५, के. सौ. प्रतिभा आनंद आठवले, रा. ११ कुबल निवास, ३६, गोखले रोड (उ.), दादर, मुंबई- ४०००२८, एल. सौ. सुधा विलास कुलकर्णी, रा. ३ रा मजला, ४ कृष्णकृपा, गोखले रोड (उ.), दादर, मुंबई - ४०००२८. एम. श्री. सुरेश वामन जोग रा. ३, कौस्तुभ, अनंत पाटील रोड, दादर, मुंबई- ४०० ०२८, एन. श्री. श्रीकांत हरिभाऊ तन्ना ओ. सौ. निलम श्रीकांत तन्ना रा. ५, गोपदमा अपार्टमेंट, लेन क. ९, प्रभात रोड, पुणे- ४०० ००४

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये ईलाईट- २७ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: सर्व्हे. नं. १३०, हिस्सा नं. ४ / १बी + ५ए, (प्लॉट नं. ३ ते १५) वाकड, ता. मुळशी, जि. पुणे- ४११०५७ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ५९२/२०२३ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०१/०१/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे अॅड. समृध्दी कोठारी यांचे वतीने अॅड. भार्गवी हिवाळे हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते २ ( ए ते ओ) गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते २ ( ए ते ओ) यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक २२/०१/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते २ ( ए ते ओ) यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे, दिनांक: ०६/०१/२०२५.

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
**सक्षम प्राधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,**
**पुणे शहर, पुणे.**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (३) व महाराष्ट्र सहकारी संस्थांचा नियम क्रमांक १०७ (५) अन्वये संदर्भ : जा.क्र जिउनिसा / क. १५६ / अधि. प्रधान / बा. वा. सह. पत. फेड / आ. सो. आटोळे / ६२ / २०२४/दि. ०४.०४.२०२४**

**स्थावर मालमत्ता ताबा नोटीस ( नमुना झेड )**

जा.क्र.४४२० वसुली / एसआरओ / मससंका १५६ (३) २०२४
दि. ०३.०१.२०२५ वसुली अधिकारी, यांचे कार्यालय बारामती तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या. बारामती त्रिमुर्ती हाईटस पहीला मजला मार्केट यार्ड रोड बारामती ता. बारामती, जि. पुणे
व्दारा : चैतन्य ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित तांदुळवाडी

**संस्थेच्या थकबाकीदार कर्जदार व जामीनदार व तारण देणार यांच्या जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेणेबाबतची नोटीस**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ मधील सुधारीत नियम क्र.१०० (११) (ड) (१) अन्वये चैतन्य ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित तांदुळवाडी, बारामती ता. बारामती जि. पुणे या संस्थेने आपल्याकडील कर्जाच्या थकबाकी वसुलीसाठी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मे कलम १०१ (१) अन्वये खाली नमूद वसुली दाखला मिळवून अंमलबजावणीसाठी आमच्याकडे पाठविला आहे. २) मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) फेडरेशन वारामती यांनी दिलेल्या वसुली दाखल्यानुसार आपणांस महाराष्ट्र सहकारी संस्थां अधिनियम १९६१ मधील नियम १५६ (३) अन्वये पाठविलेली मागणी नोटीस, जप्ती नोटीस. ज्याअर्थी चैतन्य ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित तांदुळवाडी ता. बारामती जि. पुणे या संस्थेने आपल्याकडील कर्जाच्या धकवाकी वसुलीसाठी वसुली दाखला मिळवून अंमलबजावणीसाठी आमच्याकडे पाठविला आहे. ज्याअर्थी अशा प्रकारे मागणी नोटीस बजावली तरी लवादी धकवाकीदार, कर्जदार यांनी कर्ज रकमेचा भरणा विहित मुदतीत व त्यानंतरही केलेला नाही. स्थावर मिळकत जप्ती आदेशाने खाली नमुद केलेली जप्त करण्यात आलेली आहे. सदर मालमत्ता जप्त करण्यापुर्वीही नोटीस दिलेली आहे. या नोटीसव्दारे सावध करण्यात येते की, खालील तपशिलाच्या स्थावर मालमत्तेसंबंधी कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास चैतन्य ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित तांदुळवाडी ता. बारामती ता. बारामती जि. पुणे या संस्थेच्या कर्ज योज्याची रक्कम आणि त्यावरील व्याज याला अधिन रहावे लागेल. अशा सर्व स्थावर मालमत्तेचा कागदोपत्री ताबा घेण्यासाठी खालील प्रमाणे कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे.

**ताब्यात घेण्यात येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशील**

| अ. नं. | ज्यांची मालमत्ता ताब्यात घ्यावयाचे आहे त्यांचे नाव व पत्ता | ताब्यात घेण्यात येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशील गाव गट नं./ मिळकत नं. / वर्णन | वसुल दाखवल्याप्रमाणे वसुलपात्र रक्कम |
| --- | --- | --- | --- |
| १ | कर्जदार/लवादी थकबाकीदार / जामिनदार / सहकजदार / मिळकतदार श्री. नेत्रपाल महादेव गावडे मु. पो. काटेवस्ती गुनवडी ता. बारामती, जि. पुणे | मौजे बारामती ता. बारामती जि. पुणे यांसी गट नं. ३२/२/ब/१ क्षेत्र १५ आर.00 चौ. मी . 00 चौ. सें. मी. यांसी आकार १५० रू.00 पैसे | मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था बारामती यांनी म. स. का. क. १०१ (१) अन्वये दिलेले प्रमाणपत्र येणे रक्कम रू. ३१,००,३५६/- व दि. २६/०४/२०१८ पासून पुढे दसादशे १५% व्याजदराने सर्व रक्कम वसुल होईपर्यंत व्याज, इतर खर्च |

ज्याअर्थी संबंधीत मिळकतीचे जप्ती आदेश देवूनही संबंधीत कर्जदाराने कर्ज रकमेचा भरणा न केल्याने संबंधीत मिळकतीची जाहिर लिलावाने विक्री करणे आवश्यक आहे. त्यासाठी खाली सही करणार यांनी संबंधीत मिळकतीचे मुल्यांकन करून घेण्याचे ठरविले असून मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था बारामती /गा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (ग्रामीण) यांचेकडून सदर मिळकतीचे व ही मुख्य वाजवी मुल्य निर्धारीत करण्यासाठी प्रस्ताव दाखल केला आहे. ज्याअर्थी खाली सही करणार यांनी संबंधीत कर्जदाराची / जामीनदाराची स्थावर मालमत्ता जप्त करूनही कर्ज रकमेचा भरणा केला नसल्याने सदर स्थावर मिळकतीचा ताबा घेऊन तिची रितसर विक्री करणे अनिवार्य झाले आहे. त्याअर्थी आपणांस नोटीस देण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्थां अधिनियम १९६१ मधील नियम क्र. १०७ (११) (ड) (१) १ अन्वये आपल्यावर नमुद केलेल्या जप्त मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी खाली सही करणार वसुली अधिकारी यांना दि. २८/०१/२०२५ वार. मंगळवार रोजी सकाळी ८.०० ते सायं. ६.00 वा. पर्यंत प्रत्यक्ष जागेवर हजर राहून ताबा घेणार आहे. तरी सदरच्या वेळेत आपण उपस्थित राहून सहकार्य करावे. अन्यथा मा. जिल्हा अधिकारी कार्यालय पुणे / मा. तहसिलदार कार्यालय बारामती यांचे मार्फत व पोलिस बंदोबस्तामध्ये सदरचा ताबा रितसर कायदेशीर कारवाई ने करण्यात येईल याची नोंद घ्यावी

सदरची ताबा नोटीस आज दि. ०३/०१/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

शिक्का

सही/-
**वसुली अधिकारी**
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६व महाराष्ट्र सहकारी संस्थांचा नियम १९६१ चे कलम १०७ (५) अन्वये बारामती ता. सह. पत. फेडरेशन मर्या., बारामती, ता. बारामती, व्दारा : चैतन्य ग्रा. वि. सह. पतसंस्था मर्या. तांदुळवाडी

संपादकीय विशेष

# भय नको, बेफिकिरी नको

कोरोनानंतर अलिकडेच चीनमधून आणखी एक विषाणू भारतात आला. त्याचे नाव 'ह्युमन मेटापन्यूमोव्हायरस'. त्याला लोक 'एचएमपीव्ही'म्हणून ओळखतात. भारतात गेल्या आठवड्यापासून त्याची चर्चा सुरू होती. त्याचा पसरण्याचा वेग, मुले आणि वृद्धांवर जास्त परिणाम होण्याची शक्यता आदींबाबत माध्यमांतून रकानेच्या रकाने भरून येऊ लागले; परंतु या विषाणूबाबत वेगवेगळे दावे, प्रतिदावे केले जात असल्याने सामान्यांच्या मनात साशंकता होती. भारतात या व्याधीची एकाच दिवशी पाचहून अधिक प्रकरणे आढळल्याने चिंतेचे वातावरण होते. केंद्र आणि राज्य सरकारे यामुळे 'अलर्ट मोड'वर आली. कोरोनाचा अनुभव पाठिशी असल्याने सरकार कोणतेही निर्णय घाईघाईत घेणार नाही. मार्गदर्शक सूचनांचा लगेच भडीमारही करणार नाही. प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू करतानाही फार घाबरून काही करायची सरकार आणि लोकांचीही मानसिकता नाही. असे असले, तरी संवेदनशील असलेल्या भांडवली बाजाराने भारतात या विषाणूचे रुग्ण आढळल्याने लोटांगणच घातले. त्यामुळे गुंतवणूकदार 11 लाख कोटी रुपयांना झोपले; अर्थात त्यामागे हेच एकमेव कारण नव्हते, हे ही खरेच. एकूण गुंतवणूकदारांनी आता गुंतवणूक करताना जशी काळजी घ्यायची आवश्यकता आहे, तशीच सार्वजनिक जीवनात वावरताना आपणा सर्वांनाही सार्वजनिक भान ठेवण्याचीही गरज आहे. कुणी काही बंधने आणण्याची वाट न पाहता खबरदारी घेऊन वागल्यास अशा संसर्गजन्य आजारांवर आपल्याला मात करता येईल.



कोरोनाच्या साथीच्या काळात जग घाबरून घरात बसले असताना तैवान आणि न्यूझिलंडच्या दोन राष्ट्रप्रमुख महिलांनी केलेल्या उपाययोजना लक्षात घेतल्या असता यासंदर्भात दिशा मिळू शकते. मुले आणि वृद्धांना जपण्याचा त्यांचा मूलमंत्र आताही तितकाच उपयुक्त आहे. या दोन घटकांची प्रतिकारशक्ती अन्य वयोगटातील लोकांपेक्षा कमी असल्याने काळजी घेतली पाहिजे. एक वयोगट आपला संचित आहे, तर दुसरा भविष्य आहे, याचे भान ठेवले पाहिजे. एचएमपीव्ही नवीन नाही; परंतु कोरोनानंतर उद्भवलेल्या परिस्थितीबद्दल सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. हा विषाणू हिवाळ्यात आणि थंड हवामानात वाढतो. भारतात त्याची काही प्रकरणे समोर आली. 'आयसीएमआर'कडून मिळालेल्या माहितीनुसार चेन्नई, गुजरात, कर्नाटक या तीन राज्यांमध्ये असे रुग्ण आढळले. त्यातही लहान बाळांचे प्रमाण अधिक आहे. परदेशात न जाताही त्यांना 'एचएमपीव्ही'ची लागण कशी झाली, हा आता स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने एक इशारा देताना म्हटले आहे की, भारत श्वसन रोगांच्या संभाव्य वाढीला सामोरे जाण्यासाठी सज्ज आहे. भारतासह जगभरात 'एचएमपीव्ही' आधीच प्रचलित आहे. 'एचएमपीव्ही'संबंधित श्वसन रोगांची प्रकरणे अनेक देशांमध्ये नोंदवली गेली आहेत. 'आयसीएमआर' वर्षभर 'एचएमपीव्ही' अभिसरणातील ट्रेंडचे निरीक्षण करणे सुरू ठेवेल.

अहमदाबाद आणि बंगळुरूच्या दोन्ही मुलांना 'ब्रॉन्कोप्न्यूमोनिया' नावाचा न्यूमोनियाचा इतिहास होता. तो फुफ्फुसाचा एक प्रकारचा संसर्ग आहे. 'ब्रोन्कोप्न्यूमोनिया' फुफ्फुस आणि श्वासनलिकांमधील अल्व्होलीवर परिणाम करते. केंद्रीय आरोग्य मंत्रालय या प्रकरणावर लक्ष ठेवून आहे. 'एचएमपीव्ही' प्रथम 2001 मध्ये आढळला आणि श्वसन सिंसिटिअल व्हायरस (आरएसव्ही) सह न्यूमोव्हिरिडे कुटुंबाचा एक भाग मानला गेला. 'एचएमपीव्ही'शी संबंधित लक्षणांमध्ये सामान्यतः खोकला, ताप, नाक बंद होणे आणि श्वास घेण्यात अडचण यांचा समावेश होतो. या आजारामुळे वृद्ध आणि अगदी लहान मुलांमध्ये फ्लू सारखी लक्षणे दिसू शकतात. खोकला आणि सर्दी असेल तर संबंधिताने अनेक लोकांच्या संपर्कात येणे टाळावे. त्यामुळे संसर्ग पसरणार नाही. खोकताना आणि शिंकण्यासाठी वेगळा रुमाल किंवा टॉवेल वापरावा. 'एचएमपीव्ही' सर्व वयोगटातील लोकांना संक्रमित करू शकत असला, तरी सामान्यतः लहान मुले, वृद्ध आणि कमकुवत रोगप्रतिकारक प्रणाली असलेल्या लोकांमध्ये त्याचा संसर्ग वेगाने होतो. 'एचएमपीव्ही'मुळे इतर श्वसन विषाणूंप्रमाणेच अनेक गुंतागुंती होऊ शकतात. विशेषतः वरच्या आणि खालच्या श्वसनमार्गामध्ये संसर्ग होऊ शकतो. 'एचएमपीव्ही' संसर्ग सौम्य सर्दीसारख्या लक्षणांपासून गंभीर न्यूमोनिया किंवा 'ब्रॉन्कायलाइटिस'पर्यंत असू शकतो.

'एचएमपीव्ही' च्या संसर्गाची लक्षणे इतर श्वसनाच्या आजारांसारखी असू शकतात. दरम्यान, 'एचएमपीव्ही'मुळे कोरोनाच्या काळासारखी परिस्थिती चीनमध्ये पुन्हा निर्माण होऊ लागली. रुग्णालये आणि स्मशानभूमीत गर्दी वाढत असल्याच्या बातम्या आणि 'सोशल मीडिया'वर व्हायरल करणाऱ्या व्हिडीओमुळे जगभराची झोप उडाली. त्याची वस्तुस्थिती किती आणि फेक न्यूज किती याचा कोणीच विचार केला नाही. त्यामुळे जगावर भीतीचे सावट आले. मानवी मेटापन्यूमोव्हायरस हा नवीन विषाणू नसला, तरी त्याचे स्वरूप आणि संसर्गजन्यता दिसून येत असल्याने हा संसर्ग नियंत्रित केला न गेल्यास पाच वर्षांमध्ये आणखी एक जागतिक महामारी होऊ शकते, असा इशारा अनेक तज्ज्ञांनी दिला आहे. 20-25 दिवसांमध्ये 'एचएमपीव्ही'ने चीनसह जगभरातील आरोग्य संस्थांना निद्रानाशाचा विकार दिला. 'एचएमपीव्ही'च्या जागतिक धोक्याच्या पार्श्वभूमीवर आरोग्यतज्ज्ञांनी सर्व लोकांना प्रतिबंध करण्यासाठी उपाय योजणे सुरू ठेवण्याचा सल्ला दिला आहे. दुसरीकडे हा फारसा गंभीर विषाणू नाही. त्याने संक्रमित झालेल्यांपैकी बहुतेक लोकांमध्ये फ्लू सारखी लक्षणे दिसून येतात. यामुळे दमा किंवा ब्राँकायटिसची समस्या उद्भवू शकते.

चीनमध्ये मानवी मेटाप्न्युमोव्हायरसचे प्रमाण वाढण्याचे आणि मोठ्या प्रमाणात लोकांवर परिणाम होण्याचे मुख्य कारण म्हणजे कोविडच्या काळात तेथे लागू करण्यात आलेली झिरो-कोविड पॉलिसी. मार्च 2020 मध्ये टाळेबंदी करण्यात आली, ती डिसेंबर 2023 पर्यंत अत्यंत कठोरपणे सुरू होती. या काळात जन्मलेली मुले ना शाळेत गेली, ना त्यांचा इतर लोकांशी फारसा संवाद किंवा संपर्क झाला. यामुळेच अशा मुलांमध्ये नैसर्गिक प्रतिकारशक्ती निर्माण होऊ शकली नाही. त्यामुळे तेथील मुलांना या नवीन उत्परिवर्तित विषाणूंचा सध्या जास्त फटका बसताना दिसत आहे. भारतासारख्या देशात मुलांची प्रतिकारशक्ती वेळेत चांगली विकसित होते, त्यामुळे 'एचएमपीव्ही'पसरण्याची शक्यता नाही. भारतात त्याला रोखण्यासाठी विशेष उपायांची गरज नाही.

# करमहसुलात समाधानकारक वृद्धी

**करमहसूल लक्षणीयरीत्या वाढणे ही स्वागतार्ह बाब आहे. अप्रत्यक्ष करांऐवजी प्रत्यक्ष करांमधून मिळणारा महसूल वाढणे, ही अधिक चांगली बाब आहे. अलिकडेच अग्रिम करसंकलन 21 टक्क्यांनी वाढून साडेसात लाख कोटी रुपयांवर गेले. महसूल विभागाची कार्यक्षमता वाढल्याचे हे लक्षण आहे. तसेच आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचाही फायदा होत आहे. मात्र सामान्यांना वाढत्या करबोज्यातून दिलासा देण्याचे धोरण हवे.**

परामर्श
हेमंत देसाई,
ज्येष्ठ पत्रकार



देशाचे निव्वळ प्रत्यक्ष करांचे संकलन 17 डिसेंबर 2024 पर्यंत वार्षिक तुलनेत 16 टक्क्यांनी वाढून जवळपास 16 लाख कोटी रुपयांवर गेल्याची माहिती केंद्रीय अर्थखात्याने दिली आहे. करमहसूल लक्षणीयरीत्या वाढणे, ही स्वागतार्ह बाबच आहे. अप्रत्यक्ष कर हे सामान्य लोकांना झळ पोहोचवणारे असतात. त्याऐवजी प्रत्यक्ष करांमधून मिळणारा महसूल वाढणे, ही अधिक चांगली बाब आहे. प्राप्तिकराच्या अग्रिम कराचा तिसरा हप्ता भरला गेल्याने, एकूण करमहसूल वाढला आहे. 15 डिसेंबरला या तिसऱ्या हप्त्याद्वारे अग्रिम करसंकलन 21 टक्क्यांनी वाढून साडेसात लाख कोटी रुपयांवर गेले आहे. यंदा वैयक्तिक प्राप्तिकराचे असे प्रमाण जवळपास आठ लाख कोटी रुपये तर कंपन्यांकडून साडेसात लाख कोटी रुपये भरले गेले आहेत. कंपनी करात यंदा 8.6 टक्के तर वैयक्तिक प्राप्तिकर संकलनात उत्तम, म्हणजे 22 टक्क्यांची वाढ झाली आह भांडवली बाजारातील रोखे उलाढाल कराच्या माध्यमातून 40 हजार कोटी रुपयांची भर पडली आहे, ज्यात वार्षिक तुलनेत 85 टक्के अशी सणसणीत वृद्धी नोंदवण्यात आली आहे. या कालावधीत प्राप्तिकर विभागाने तीन लाख 39 हजार कोटी रुपयांचा परतावा दिला असून, त्यात वार्षिक 42 टक्क्यांची वाढ झाली आहे. कंपनी कर, वैयक्तिक प्राप्तिकर आणि एसटीटी यासह एकूण प्रत्यक्ष करसंकलन 19 लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. ते 1 एप्रिल 2023 ते 17 डिसेंबर 2023 या दरम्यान झालेल्या संकलनापेक्षा 20 टक्क्यांनी वाढले आहे. महसूल विभागाची कार्यक्षमता वाढल्याचे हे लक्षण आहे. तसेच आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचाही फायदा होत आहे.

केंद्र सरकारने विद्यमान आर्थिक वर्षासाठी 22 लाख कोटी रुपयांचे प्रत्यक्ष कर संकलनाचे लक्ष्य निर्धारित केले आहे. आतापर्यंत संकलनात झालेली वाढ पाहता, निर्धारित लक्ष्य निश्चितच गाठले जाईल, असे केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे अध्यक्ष रवी अग्रवाल यांनी म्हटले आहे. त्यांच्या म्हणण्यात नक्कीच तथ्य आहे. गेल्या अर्थसंकल्पात करदात्यांना मोठा दिलासा देत, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी प्रमाणित वजावटीची मर्यादा 50 हजार वरून 75 हजार रुपये केली होती. नवीन करप्रणाली अंतर्गत हा बदल करण्यात आला. त्यामुळे सरकारला सात हजार कोटी रुपयांचा महसूल गमवावा लागला असून, चार कोटी पगारदारांना त्याचा फायदा होत आहे, अशीही माहिती त्यांनी दिली होती. अर्थसंकल्पात टॅक्स स्लॅबमध्ये बदल करण्यात आले. 15 लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असल्यास 30 टक्के कर लागू केला गेला. नवीन करपद्धतीत पगारी कर्मचाऱ्यांची 17 हजार 500 रुपयांपर्यंत वार्षिक बचत होत आहे. मागील अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांमधून केंद्र सरकारला सर्वाधिक, म्हणजे 63 टक्के उत्पन्न मिळाले. याशिवाय 27 टक्के रक्कम कर्ज आणि इतर दायित्वामधून येणार होती. तर नऊ टक्के रक्कम निर्गुंतवणुकीसारख्या गैरमहसुलातून आले. केंद्राला अप्रत्यक्ष करांमध्ये वस्तू आणि सेवा कर, म्हणजे जीएसटीमधून 18 टक्के उत्पन्न मिळाले. याशिवाय उत्पादन शुल्कातून पाच टक्के व सीमा शुल्क आकारणीतून चार टक्के उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले होते. कॉर्पोरेट आणि वैयक्तिक आयकारासह प्रत्यक्ष करातून एकूण 36 टक्के उत्पन्न मिळणार आहे. त्यामध्ये आयकरातून 19 टक्के तर कॉर्पोरेट करामधून 17 टक्के उत्पन्न येईल, असे मागच्या अर्थसंकल्पात नमूद करण्यात आले होते.

धर्मादाय संस्था, परदेशी जहाज कंपन्या यासाठी नवी कररचना प्रस्तावित केल्यानंतर, कॉर्पोरेट टॅक्स कर कमी करण्यात आला आहे. कारण सरकारला अधिक गुंतवणूक आहे हवी आहे, असा युक्तिवाद करण्यात आला. परदेशी कंपन्यांवरील कॉर्पोरेट कर 40 वरून 35 टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला. परंतु एवढे असूनही परदेशी गुंतवणूकदारांनी सप्टेंबरअखेरपासून भारतीय समभागांमधून अंदाजे एक लाख 20 हजार कोटी रुपये काढून घेतले आहेत. केवळ नोव्हेंबर 2024 मध्येच त्यांनी 28 हजार कोटी रुपये मूल्यांच्या समभागांची विक्री केली आहे. परकीय गुंतवणूकदारांच्या निधीचे निर्गमन हे कशामुळे झाले? एक तर डोनाल्ड ट्रम्प यांचे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी पुनरागमन झाल्याने रुपयाच्या तुलनेत अमेरिकी डॉलर अधिकाधिक मजबूत होत आहे. ट्रम्प यांच्या 'अमेरिका प्रथम' धोरणाचा परदेशी गुंतवणूक आणि व्यापारावर नेमका काय परिणाम होऊ शकतो, याबद्दल अद्याप अनिश्चितता आहे. अमेरिकी रोखे ही जगातील सर्वात सुरक्षित गुंतवणूक मानली जाते. सध्या दहा वर्षे मुदतीच्या अमेरिकी रोख्यांवरील परताव्याचा दर पाच टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे भारतासारख्या उदयोन्मुख बाजारपेठेत परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी समभाग विक्रीचा मारा सुरू ठेवला आहे. या जोडीला चीनच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी तेथील सरकारच्या नवनवीन योजनांमुळे परदेशी गुंतवणूकदार हा भारतीय भांडवल बाजारच्या तुलनेत स्वस्त असलेल्या चिनी बाजाराकडे आकर्षित होत आहे. त्यामुळे आता शेअर बाजाराची आशा देशांतर्गत म्युच्युअल फंडांवरच अवलंबून आहे.

म्युच्युअल फंड संस्थांमधील व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्ता सप्टेंबर 2024 अखेर 67 लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे तर एकूण इक्विटी म्युच्युअल फंडातील मालमत्ता 31 लाख कोटी रुपयांवर गेली आहे. देशाचा करमहसूल वाढत आहे, ही चांगलीच गोष्ट आहे. परंतु तो वाढवण्यासाठी आणखीही काही उपाय आहेत. अधिकाधिक भांडवली खर्च करण्यासाठी उत्पन्न वाढणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे देशाचे उत्पादन क्षेत्र विस्तारण्यासाठी परदेशी भांडवल गुंतवणुकीची गरज आहे. केवळ शेअर बाजारातच नाही, तर थेट कारखान्यांमध्ये भांडवल गुंतवणूक वाढणे अत्यंत आवश्यक आहे. कर गोळा करणे हा देशांसाठी सार्वजनिक महसूल मिळवण्याचा मुख्य मार्ग आहे. त्यामुळे मानवी भांडवल, पायाभूत सुविधा आणि व्यवसायांसाठी सेवांच्या तरतुदींमध्ये गुंतवणुकीसाठी वित्तपुरवठा करणे शक्य होते. तरीही अनेक संकटांमुळे विकसनशील देशांच्या महसुलात घट झाली असून अलिकडच्या वर्षांमध्ये त्यांचा खर्च वाढला आहे. सध्या जीडीपीच्या 15 टक्क्यांपेक्षा कमी कर जमा करणाऱ्या देशांमध्ये महसूल संकलन वाढवण्याची गरज आहे. कर आकारणीचा हा स्तर राज्याला व्यवहार्य बनवण्यासाठी आणि विकासाच्या मार्गावर आणण्यासाठी एक महत्त्वाचा टिपिंग पॉइंट आहे. करप्रणाली न्याय्य आहे, याची खात्री करून सरकारांनी महसूल जमा करणे, शाश्वत वाढ आणि अनुपालन खर्च कमी करणे यासारख्या उद्दिष्टांमध्ये संतुलन राखणे आवश्यक आहे.

कर आणि करेतर उत्पन्न वाढवून सार्वजनिक खर्च भागवणे आवश्यकच असते. आर्थिक मंदी वा कोरोनासारखी संकटे असोत, त्या काळात सरकारी महसूल घटतो, म्हणूनच तर कोरोनाच्या काळात हे गुणोत्तर भारतात दहा टक्यांपर्यंत खाली आले होते. प्रगत देशांमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांचे प्रमाण अनुक्रमे 65 टक्के आणि 35 टक्के असे असते, तर भारतात ते आहे, अनुक्रमे 48 टक्के आणि 52 टक्के. याचा अर्थ भारतात तुलनेने सधन आणि उच्च मध्यमवर्गीय गटावर कमी भार असून गोरगरीब आणि निम्न मध्यमवर्गीयांवर अधिक भार आहे. गरिबांवर कमी भार आणि श्रीमंतांवर जास्त भार, हेच आर्थिक न्यायाचे तत्त्व असते. आर्थिक विषमता कमी करून अर्थव्यवस्था समतेच्या दिशेने नेण्यासाठी प्रत्यक्ष कर वाढवणे आणि अप्रत्यक्ष कर कमी करणे, हा खरा उपाय आहे. भारतातील 83 टक्के लोक हे असंघटित किंवा अनौपचारिक क्षेत्रात काम करतात. ते प्रत्यक्ष करांच्या कक्षेत येतच नाहीत. भारतात जेमतेम तीन टक्के लोक कर भरतात. भारताच्या एकूण उत्पन्नात खालच्या 50 टक्के लोकांचा वाटा फक्त 15 टक्के आहे. यावरून देशात आर्थिक विषमता किती टोकाची आहे, हे लक्षात येते. बेहिशेबी व्यवहार, हवाला, काळा पैसा अशा मार्गाने विशिष्ट वर्ग प्रचंड श्रीमंत होत आहे. उलट वाढत्या महागाईमुळे गरिबांचा खिसा रिता होत आहे. भारतात सरासरी 20 मतदारांमागे एक मतदार कर भरणारा असतो. हे प्रमाण नक्कीच वाढू शकते.

कर दर वाढवून उत्पन्न वाढवण्यापेक्षा करप्रणालीत सुगमता आणणे, संगणकीकृत पद्धतींचा वापर वाढवणे आणि करदात्यांवर अधिक विश्वास टाकणे, आवश्यभक आहे; मात्र अजूनही लाचखोरी आणि भ्रष्टाचाराची कीड नष्ट झालेली नाही. त्यासाठी ठोस प्रयत्न करण्याची गरज आहे. पूर्वीच्या काळात सर्वसामान्य करदात्यांना कर अधिकाऱ्यांच्या सतावणुकीला सामोरे जावे लागत असे. तंत्रज्ञानामुळे हे प्रमाण कमी झाले असून स्वतःदेखील रिटर्न भरणे सोपे झाले आहे; मात्र प्रत्यक्ष कराच्या कक्षेत जास्तीत जास्त करदाते येतील, हे बघणे आवश्यक असून प्रत्यक्ष करमहसूल जेवढा वाढेल, तेवढा देशाच्या अर्थव्यवस्थेला त्याचा उपयोग होऊन, विकासासाठी तो पैसा खर्च करता येईल.

## भटकंती

### नितांतसुंदर शहर

दोस्तांनो, या थंडीच्या मोसमात मस्तपैकी भटकंतीचा बेत आखत असाल तर नितांतसुंदर रांचीचा पर्याय अवश्य विचारात घेण्याजोगा आहे. झारखंडची राजधानी असलेलं रांची सुंदर शहर आहे. इथे हिमालय पर्वतापेक्षाही प्राचीन डोंगर आहे. रांची बुरू या नावाने हा डोंगर ओळखला जातो. या डोंगरावर पहाडी बाबा म्हणजे साक्षात भगवान शिवशंकर विराजमान आहे. या डोंगराच्या माथ्यावरून रांची शहराचं अत्यंत विहंगम दृश्य दिसतं. रांचीच्या पश्चिमेकडे मोहराबादी परिसरात एक टेकडी आहे. आज हे स्थान टागोर हिल म्हणून ओळखलं जातं. रवींद्रनाथ टागोर यांचे ज्येष्ठ बंधू ज्योतिंद्रनाथ टागोर इथेच रहायचे. म्हणून ही टेकडी टागोर हिल म्हणून ओळखली जाते. रांची रेल्वे स्थानकापासून काही किलोमीटर अंतरावर योगदा सत्संग आश्रम आहे. परमहंस योगानंद यांनी १९१७ मध्ये रांचीमध्ये योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडियाची स्थापना केली होती. या ठिकाणी योगाची दीक्षा दिली जाते. इथे डोंबारी बुरू नावाचं स्थान आहे. इंग्रजांनी या भागात मुंडा समाजाच्या लोकांची क्रूरपणे हत्या केली होती. याच टेकडीवर बिरसा मुंडा यांना अटक करण्यात आली. आता डोंबारी बुरूपर्यंत रस्ता बांधण्यात आला आहे. या टेकडीवर स्तंभ बांधण्यात आला आहे. इथल्या राज्य वस्तूसंग्रहालयात प्राचीन वस्तू पहायला मिळतात.



## खेचाखेची

### उपमा

**रामराव :** नवऱ्याला घरात किती किंमत असते हे आपल्याला माहीत आहे. असं असताना नवऱ्याने घरात कोणत्याही बाबतीत आपलं मत मांडल्यास तुम्ही त्याला कशाची उपमा देऊ शकता?

**श्यामराव :** याला टो करून नेत असलेल्या गाडीच्या ड्रायव्हरने गाडीत जीपीएस यंत्रणा सुरू करण्याच्या कृतीची उपमा देता येईल. नाही का हो...

## वेगळे काही

नेदरलँडस, फुलांच्या लहरत्या वाफ्यांनी सजलेला एक देश. यातील झुन्डेर्ट हे गाव तर फुलांच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध. या गावातील प्रत्येक व्यक्ती कुठल्या ना कुठल्या मार्गानं फुलांच्या शेतीशी संबंधित आहे. अशा टवटवीत गावात फुलांचा उत्सव न होता तरच नवल! दर वर्षी इथे एक भव्यद्विव्य परेड होते, पण ती असते फुलांनी सजलेली. फुलांच्या सजावटीतून साकारलेले पुतळे प्रत्येकाचं लक्ष वेधून घेतात. या महोत्सवात अशा जवळपास २५ फ्लॉवर परेड साकारल्या जातात. यासाठी हजारो टन फुलांचा वापर होतो. या सुगंधी दरवळापासून कोण बरं दूर राहू शकेल?




## राशीभविष्य

- **मेष** : अनावश्यक खर्च टाळायला हवा. कामं प्रलंबित राहतील. आज प्रवास शक्यतो टाळायला हवा.
- **वृषभ** : कौटुंबिक चिंता राहील. नवे करार तुर्तास करू नयेत. विद्यार्थ्यांच्या गुणांना पुरेसा वाव मिळेल.
- **मिथुन** : आर्थिक प्रश्नांचा ताण वाढेल. व्यवसायात पुरेशी काळजी घ्यावी. पित्ताचे विकार उद्भवू शकतात.
- **कर्क** : रखडलेली कामं बऱ्यापैकी मार्गी लागतील. आत्मविश्वास वाढेल. विवाहाचे प्रश्न मार्गी लागतील.
- **सिंह** : अपेक्षित प्राप्तीत अडचणी येतील. खर्चावर नियंत्रण ठेवावं. शिक्षण क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **कन्या** : अधिक फळाची अपेक्षा करू नका. आजचा दिवस धावपळीचा राहील. अचानक धनलाभ संभवतो.
- **तूळ** : थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. उसनवार व्यवहार टाळावे. बोलण्यातून गैरसमज होऊ शकतात.
- **वृश्चिक** : व्यवसायात अपेक्षित उलाढाल होईल. नव्या योजनांना गती मिळेल. मित्रांचा सल्ला मोलाचा ठरेल.
- **धनु** : भावनेपेक्षा कर्तव्य महत्त्वाचं ठरणार आहे. कामं मनासारखी होतील. दूरचा प्रवास घडू शकेल.
- **मकर** : सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. आध्यात्मिकतेकडे ओढा राहील. प्राप्तीनं समाधानी व्हाल.
- **कुंभ** : व्यवसायात कामाचा ताण वाढेल. भेटी लांबणीवर पडतील. स्थापत्य क्षेत्रात संधी लाभतील.
- **मीन** : 'हाती घ्याल ते तडीस न्याल'ची प्रचिती येईल. आव्हानं उभी रहतील. मानसिक स्वास्थ लाभेल.

## सल्ला मोलाचा

### शिका चांगल्या गोष्टी

माणूस म्हटला की, त्याच्यात काही गुण तर काही अवगुण असणार. मात्र, यातील अवगुण प्रत्येकजण मान्य करतोच असं नाही. खरं तर स्वत:चे दोष लपवण्यात, स्वचुकांवर पांघरुण घालण्यात, आपण कसे सर्वगुणसंपन्न आहोत हे भासवण्यात बराच काळ आणि बरीच शक्ती खर्ची पडत असते. त्यापेक्षाही धोक्याचं म्हणजे या अहंगडामुळे कळत-नकळत अनेक बहुमोल संधी निसटून जातात. त्यामुळेच आपल्यापेक्षा श्रेष्ठ आणि ज्येष्ठ व्यक्तींमधील गुणांची कदर ठेवत त्यांचा सन्मान करणं तसंच ते गुण धारण करण्यासाठी स्वत:ला सज्ज करणं या बाबी गरजेच्या ठरतात. अर्थात, असं असूनही आपल्यातल्या त्रुटींचं, अवगुणांचं कायम स्मरण ठेवायला हवं. इथं कोणीही सर्व गुणांनी संपन्न असू शकत नाही, हे लक्षात घ्यायला हवं. प्रत्येकात गुण-दोष असतात. परंतु ते मान्य करुन दोष सुधारण्याची एक संधी देणं गरजेचं असतं. अशा स्थितीत प्रसंगी आपल्यापेक्षा लहानांकडून चार गोष्टी शिकतो तो वेगाने पुढे जातो.

## दिनविशेष

### ८ जानेवारी

- १९०४: पोप दहावा पायसने चर्चमध्ये आखूड झगे घालून येण्यास बंदी घातली.
- १९१४: आयबीएम या संगणकनिर्मात्या कंपनीचे संस्थापक थॉमस वॉटरसन यांचा जन्म.
- १९२६ : प्रसिद्ध ओडिसी नर्तक केलुचरण महापात्रा यांचा जन्म.
- १९७३: सकाळचे संस्थापक, संपादक ना. भि. परुळेकर यांचं निधन.
- १९९५: ज्येष्ठ विचारवंत मधु लिमये यांचं निधन.
- २०१४ : संशोधकांना सौदी अरेबियामध्ये डायनासोरचे जीवाश्म सापडले.

## महत्त्वपूर्ण काही...

### निर्मिती अचूक घड्याळाची

आजकाल बदलत्या आणि आधुनिक युगात जीवनशैलीत बरेच बदल दिसून येत आहेत. यात पेहराव तसंच ॲक्सेसरीजचा समावेश होतो. अगदी घड्याळांचं उदाहरण घ्यायचं तर त्यातही बरेच बदल पहायला मिळत आहेत. अर्थात, पारंपरिक घडय़ाळांचं आधुनिक घडय़ाळांत रूपांतर होण्यासाठी दाबविद्युत (पिझोइलेक्ट्रिक) परिणाम कारणीभूत ठरला. तापमानातील बदलामुळे स्फटिकात निर्माण होणाऱ्या विद्युतदाबावर संशोधन करताना जॅक्स आणि पियरे या क्यूरी बंधूंना हा शोध लागला. तांब्याच्या दोन पट्टय़ांमध्ये ठेवलेल्या स्फटिकांवर दाब दिल्यानंतर विद्युतदाबाची निर्मिती होत असल्याचं त्यांना आढळलं. हा शोध ८ एप्रिल १८८० रोजी फ्रेंच सोसायटी ऑफ मिनरोलॉजी संस्थेला सादर करण्यात आला. एका वर्षातच क्यूरी बंधूंनी याच्या उलट परिणामही शोधला. त्यानुसार, विद्युतदाबाच्या प्रभावाखाली स्फटिक आकार बदलतात. कालांतराने, या स्फटिकांवर प्रत्यावर्ती (ऑल्टनेटिंग) विद्युतदाब निर्माण केल्यास प्रत्येक स्फटिक एका स्थिर कंपनसंख्येने कंप पावू लागत असल्याचं स्पष्ट झालं. स्फटिकांच्या याच गुणधर्माचा उपयोग करून विसाव्या शतकात अचूक घडय़ाळांची निर्मिती झाली.

## आरोग्यमंत्र

### लाभ पायांच्या मसाजाचे

संपूर्ण शरीराच्या हालचालींमध्ये बऱ्याच प्रमाणात पायांचा आधार महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे पायांवर ताण येणं साहजिक आहे. विशेषत: दिवसभराच्या धकाधकीत पायांवर असह्य ताण येत असतो. याच ताणाचा परिणाम म्हणजे रात्री पाय सुजतात, दुखतात, ठसठसत राहतात. यावर उपाय म्हणजे पायांना गरम तेलानं मसाज करणं. दररोज रात्री पायांना गरम तेलाचा मसाज करणं हा अनेक दुखणी दूर ठेवण्याचा एक चांगला मार्ग असल्याचं तज्ज्ञांचं मत आहे. दररोज मसाज केल्यानं पायातील वेदना दूर होतात. त्याचप्रमाणे पायांना मजबुती मिळते आणि लवचिकता टिकून राहते. दररोज रात्री गरम खोबरेल तेलानं मसाज केल्यास पायांवरीलच नव्हे तर संपूर्ण शरीरावरील ताण कमी होतो. या उपायानं रक्तप्रवाह सुधारण्यास मदत होते. निद्रानाशाचा त्रास असेल तर तोही कमी होण्यास मदत होते. हे महत्त्वाचे लाभ लक्षात घ्यायला हवेत. पायांना नियमित मसाज केल्यास पोटासंबंधीच्या तक्रारी दूर होण्यासही मदत होते. काहींना सतत डोकं जड असण्याचा, डोकेदुखीचा त्रास संभवतो. पायांना मसाज केल्यानं हा त्रासही कमी होतो. पायांना नियमितपणे मसाज केल्यास मूड स्विंगचं प्रमाण कमी होतं आणि रक्तदाब नियंत्रित होण्यास मदत होते. त्याच बरोबर सांधेदुखी दूर ठेवण्याचाही हा उत्तम मार्ग आहे.



## पंचांग

**बुधवार, ८ जानेवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
पौष शु. ९, नक्षत्र : अश्विनी
चंद्रराशी : मेष, सिद्ध योग
सूर्योदय : ७.१३, सूर्यास्त : ६.१६

## फॉरवर्डस

खरेपणाची ओळख डोळ्यात पाहिल्यावरच होते.

**रख लो आईने हज़ार, तसल्ली के लिए, पर सच के लिए तो, आँखें ही मिलानी पड़ेगी ! खुद से भी और खुदा से भी**

## वाचा तर खरं

✻ तांदळात अळ्या होऊ नये यासाठी मीठ मिसळून ठेवा. ✻ डोसा अथवा इडलीचं पीठ करताना तांदूळ दळतेवेळी मेथीदाणे टाका. यामुळे इडली-डोसा मऊ होईल. ✻ शिजवताना पालकाचा रंग हिरवागार रहावा यासाठी चिमूटभर मीठ मिसळा. ✻ कणीक मळताना पाण्याबरोबर दूध आणि सायीचा वापर केला तर पोळ्या मऊ आणि स्वादिष्ट होतील. ✻ तांदूळ शिजवताना एक चमचा तूप, मीठ, लिंबाचा रस मिसळावा. यामुळे भात मोकळा आणि पांढरा स्वच्छ होतो. ✻ पनीर पाण्यात ठेवल्यास अधिक काळ ताजं राहतं.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### अनधिकृत बांधकामांवर पालिकेची कारवाई...

**वाकड :** महापालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत वाकड येथील प्रभाग क्रमांक २५ व २६ मधील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली.महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून ४५ मीटर रस्ता रुंदीकरण प्रक्रियेमध्ये येणाऱ्या अनधिकृत व्यावसायिक पत्र्याचे शेड, आरसीसी बांधकाम यावर कारवाई करण्यात आली. ही कारवाई महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या आदेशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त १ जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, अतिक्रमण अतिरिक्त आयुक्त मनोज लोणकर, ड क्षेत्रीय अधिकारी श्रीकांत कोळप, बांधकाम परवानगी उपभियंता संजय चव्हाण, कनिष्ठ अभियंता अमोल पडलवार, बीआरटीएस विभागाचे कार्यकारी अभियंता संध्या, कनिष्ठ अभियंता सुनिता पिंजण, नगररचना विभागाचे उपभियंता अशोक कुटे व संजय बंडगर यांचे नेतृत्वात करण्यात आली. कनिष्ठ अभियंता अमोल शिंदे यांच्या अधिपत्याखाली अतिक्रमण कारवाई करण्यात आली.

### रखवालदार नियुक्त...

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने थेरगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा आणि निगडी येथील महाराणा प्रताप यांचा पुतळा आणि स्मारकांच्या सुरक्षेसाठी महापालिकेकडून दिवस-रात्र सुरक्षारक्षक नेमण्यात आले आहेत. तसेच, इतर ठिकाणीही सुरक्षारक्षक नियुक्त केले आहेत.महापुरुषांच्या पुतळ्याच्या सुरक्षेत हयगय न करण्याच्या सक्त सूचना राज्य शासनाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत.

# साहित्यातून सामाजिक एकोपा निर्माण व्हावा

**इंद्रायणी साहित्य संमेलनातून परिसरातील विविध गावांतील ऋणानुबंध अधिकच दृढ झाले आहेत**

**गावकुसाबाहेरील साहित्यिकांना साहित्याच्या मुख्य प्रवाहात सामावून घ्यावे**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



इंद्रायणी साहित्य संमेलन: कवयित्री बहिणाबाई चौधरी साहित्यनगरी, जयगणेश बँक्वेट हॉल, नवीन देहू - आळंदी रस्ता, मोशी येथे केले. इंद्रायणी साहित्य परिषद आयोजित एकदिवसीय इंद्रायणी साहित्य संमेलनात भूमिपुत्र २०२४ पुरस्कार प्रदान करताना डॉ. माधव सानप

**पिंपरी:** "साहित्यातून सामाजिक एकोपा निर्माण व्हावा!" असे आवाहन निवृत्त पोलीस महानिरीक्षक डॉ. माधव सानप यांनी रविवार, दिनांक ०५ जानेवारी २०२५ रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी साहित्यनगरी, जयगणेश बँक्वेट हॉल, नवीन देहू - आळंदी रस्ता, मोशी येथे केले. इंद्रायणी साहित्य परिषद आयोजित एकदिवसीय इंद्रायणी साहित्य संमेलनात भूमिपुत्र २०२४ पुरस्कार प्रदान करताना डॉ. माधव सानप बोलत होते. ज्येष्ठ उद्योजक रामदास काकडे, लोकसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रभाकर ओव्हाळ, महाराष्ट्र साहित्य परिषद - पिंपरी चिंचवड शाखाध्यक्ष राजन लाखे, पिंपरी - चिंचवड महापालिका विज्ञान केंद्र संचालक प्रवीण तुपे, संमेलनाध्यक्ष दादाभाऊ गावडे, स्वागताध्यक्ष वंदना आल्हाट, निमंत्रक अरुण बोऱ्हाडे, परिषदेचे अध्यक्ष संदीप तापकीर आदी मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

रामदास काकडे यांनी, "इंद्रायणी साहित्य संमेलनातून परिसरातील विविध गावांतील ऋणानुबंध अधिकच दृढ झाले आहेत!" असे मत व्यक्त केले. प्रभाकर ओव्हाळ यांनी, "गावकुसाबाहेरील साहित्यिकांना साहित्याच्या मुख्य प्रवाहात सामावून घ्यावे!" अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रवीण तुपे यांनी, "इंद्रायणी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून औद्योगिकनगरीत साहित्य अन् सांस्कृतिक बाबींचे अभिसरण होत आहे!" असे गौरवोद्गार काढले; तर राजन लाखे यांनी, "कार्यकर्ते हे कोणत्याही यशस्वी सोहळ्याचे खरे पाठबळ असते!" अशी भावना व्यक्त केली. अरुण बोऱ्हाडे यांनी प्रास्ताविक केले. वंदना आल्हाट यांनी स्वागत केले.

याप्रसंगी प्रदान करण्यात आलेल्या 'भूमिपुत्र पुरस्कार २०२४' मध्ये डॉ. अनिलकुमार रोडे (वैद्यकीय सेवा), संजय गोपाळ शिंदे (प्रशासकीय सेवा), दत्तात्रय दगडू फुगे (इतिहास संशोधन), सुनील तानाजी गिलबिले (अग्निशमन सेवा), स्मिता प्रतीक थोरवे (प्रशासकीय सेवा परीक्षेत यश), अनुज काळुराम गावडे (प्रो कबड्डी), डॉ. मधुरा मल्हारी काळभोर (वैद्यकीय संशोधन), ह. भ. प. विठ्ठल गवळी (युवा कीर्तनकार), ह. भ. प. संग्राम बापू भंडारे (समाज प्रबोधन), ह. भ. प. मंगेश सावंत (युवा प्रवचनकार), दत्तात्रय विघ्नहर अत्रे (साहित्य), कुमार सम्यक राहुल धोका आणि कुमार सिद्धान्त राहुल धोका या जुळ्या भावांना सी. ए. परीक्षेतील यशाबद्दल सन्मानित करण्यात आले. याचबरोबर तिसऱ्या



इंद्रायणी साहित्य संमेलनाच्या यशस्वीतेसाठी योगदान देणाऱ्या महाराष्ट्र गडकिल्ले सेवा संस्था, जयवंत दत्तात्रय फाळके, गणेश बबन सस्ते, परेश भगवंत सस्ते, नीलेश मधुकर नेवाळे, हिरामण निवृत्ती सस्ते, स्वप्निल वासुदेव जाधव, ज्ञानेश्वर दत्तोबा बोऱ्हाडे, गणेश शशिकांत सस्ते, निखिल शिवाजी बोऱ्हाडे या संस्था आणि व्यक्तींचा विशेष सन्मान करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते पहिल्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष संतोष सीताराम बारणे, दुसऱ्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष गणेश साहेबराव सस्ते तिसऱ्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष वंदना हिरामण आल्हाट यांना गौरविण्यात आले.

पुरस्कारार्थींच्या वतीने स्मिता थोरवे, संजय शिंदे, सुनील गिलबिले, विठ्ठल गवळी यांनी मनोगत व्यक्त केले. इंद्रायणी साहित्य परिषदेचे पदाधिकारी आणि मोशी ग्रामस्थ यांनी संयोजनात परिश्रम घेतले. प्रदीप गांधलीकर यांनी सूत्रसंचालन केले. संदीप तापकीर यांनी आभार मानले.

> "इंद्रायणी साहित्य संमेलनातून परिसरातील विविध गावांतील ऋणानुबंध अधिकच दृढ झाले आहेत!"
> — रामदास काकडे, ज्येष्ठ उद्योजक

> "गावकुसाबाहेरील साहित्यिकांना साहित्याच्या मुख्य प्रवाहात सामावून घ्यावे!" — प्रभाकर ओव्हाळ

# मराठी पत्रकार दिन साजरा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेल्या दर्पण या मराठी वृत्तपत्राची सुरुवात 6 जानेवारी 1832 मध्ये केली. हा दिवस महाराष्ट्रात मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या मराठी पत्रकार दिनाच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत पिंपरी चिंचवड शहर पत्रकार संघाच्या वतीने मराठी पत्रकार दिन साजरा करण्यात आला.

या निमित्ताने आचार्य श्री बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी पिंपरी चिंचवड शहर पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष बापू गोरे, पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष सायली कुलकर्णी, उपाध्यक्ष रेहान सय्यद, सचिव संतोष जराड, पत्रकार शबनम सय्यद व पत्रकार श्रद्धा प्रभुणे यांच्यासह पत्रकार अनिल वडघुले पत्रकार रामकुमार शेडगे प्रामुख्याने उपस्थित होते.

# ज्ञानेश्वरी ही काळाची गरज परिसंवाद संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** "'आनंदे भरीन तिन्ही लोक' हेच ज्ञानेश्वरीचे प्रयोजन आहे!" असे प्रतिपादन संतसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक आणि लेखिका डॉ. आरती दातार यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी साहित्यनगरी येथे केले. इंद्रायणी साहित्य परिषद आयोजित एकदिवसीय इंद्रायणी साहित्य संमेलनात 'ज्ञानेश्वरी - काळाची गरज' या परिसंवादात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. आरती दातार बोलत होत्या. संमेलनाध्यक्ष दादाभाऊ गावडे, स्वागताध्यक्ष वंदना आल्हाट, निमंत्रक अरुण बोऱ्हाडे, परिषदेचे अध्यक्ष संदीप तापकीर यांची प्रमुख उपस्थिती होती.

परिसंवादात सहभागी झालेले आळंदी येथील वेदांग सत्संगचे संतसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक ह. भ. प. नारायणमहाराज जाधव यांनी, "ब्रह्मतत्त्व सत्य आहे, हे सांगणारा ज्ञानेश्वरी हा एक विलक्षण ग्रंथ आहे. सर्व दर्शनांचे अधिष्ठान हे ज्ञानेश्वरीत आहे.


## PUBLIC NOTICE

This is for the information of the General Public that MOHAN JAGANNATH MUZUMDAR, R/at -14, Preetam Co Op Housing Society, Sub Way Road, Sautacruz (W), Mumbai-400054 is the owner of Flat No. 4, Building No. S-6, situated on Ground Floor, in the Building No. S-6, in the society known as "SIDDHESHWAR NAGAR CO OP HOUSING SOCIETY LTD", constructed on the land bearing S. No. 39/3/1, Subhash Nagar, Village - Dhanori, Tal. Haveli, District-Pune witin the limits of Pune Municipal corporation (collectively referred as the said "Property" for short), That the Original title documents pertaining to the said property have lost and misplaced [FIR dated 30/09/2024, Complaint Id : 140015-2024, Police Station : Vishrantwadi, Pune] - Original Sale Deed dated 03/01/1998 executed in the office of Sub Registrar Haveli No.08 at Serial No. P10/1998, along with original Registration Receipt and original Index II extract.

That the owner herein intends to mortgage the said property to my client. That the Owner of the said Property has expressly assured my client that the said property is free from any encumbrances, and he has a good, clean and clear marketable title to the same.

I therefore, hereby call upon the public at large that if any person and/or persons has any right, title and interest, in the said Property, in whatsoever manner, the same should be communicated to me along with necessary documentary proof within 15 DAYS from publication of this notice, failing which my client will presume that said Property is free from encumbrances and no other person/s has any right, title and interest in the said Property if there are any claim/s of any person/s in respect of the said Property, the same are waived in favour of my client and under this bonafide presumption, my client will proceed with the above mentioned transaction, which kindly be note. Further, if the said documents are found anywhere, kindly contact on the details mentioned herein below.

Pune
Date: - 08/01/2025

Adv. CHANDRABODHI RAJWANT
Office at –209, 210 & 211, Premlok Plaza,
Near Madhuban Society, Kalas, Pune-411015
Phone- 8149811010.


# उद्धव कानडे स्मृती स्नेहबंध पुरस्काराने अरुण गराडे सन्मानित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी - चिंचवड औद्योगिक परिसरातील ज्येष्ठ कामगारनेते आणि लेखक अरुण गराडे यांना पहिल्या कविराज उद्धव कानडे स्मृती स्नेहबंध पुरस्काराने माधवराव पटवर्धन सभागृह, टिळक रस्ता, पुणे येथे सन्मानित करण्यात आले. लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान - पिंपरी, नारायण सुर्वे साहित्य कला अकादमी आणि प्रतिमा पब्लिकेशन्स आयोजित कै. उद्धव कानडे यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक आणि ८९ व्या अखिल भारतीय



मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस, महाराष्ट्र साहित्य परिषद - पुणे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार, महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभा अध्यक्ष सचिन ईटकर, नारायण सुर्वे साहित्य कला अकादमीचे अध्यक्ष सुदाम भोरे, सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे, श्रीमती रजनी उद्धव कानडे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. सन्मानचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप होते.

प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले की, "अरुण गराडे यांना प्रज्ञावंत कवी उद्धव कानडे यांचा दीर्घकाळ सहवास लाभला. यंत्रावर काम करणाऱ्या हातांनी लिहिते व्हावे अशी कविवर्य नारायण सुर्वे यांची उत्कट इच्छा होती. त्यातून कामगार साहित्य परिषदेची स्थापना करण्यात आली. पिंपरी - चिंचवड परिसरात परिषदेच्या माध्यमातून अनेक साहित्यविषयक उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये सुमारे पस्तीस वर्षांपासून गराडे यांनीदेखील आपले योगदान दिले आहे. त्यांनी लिहिलेल्या 'कॉम्रेड रूपमय दादा चटर्जी' या चरित्रात्मक ग्रंथात याविषयी ऊहापोह करण्यात आलेला आहे. कामगार आणि कष्टकरी श्रमिक यांच्यातील सुप्त प्रतिभा अभिव्यक्त होण्यासाठी असे पुरस्कार निश्चितच प्रेरणादायी ठरतील!" यावेळी ज्येष्ठ कामगार कवी प्रभाकर वाघोले यांना कविराज उद्धव कानडे स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# यमुनानगरचा पाणीपुरवठा २४ तास सुरू करावा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** यमुनानगर परिसरात चोवीस तास पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे करण्यात आली आहे. माजी नगरसेवक प्रा. उत्तम केंदळे, माजी नगरसेविका कमल घोलप यांनी निवेदनाद्वारे ही मागणी केली आहे.

महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग क्रमांक १३ मधील यमुनानगर भागात २०१७ ते २०२२ या कालावधीत चोवीस तास पाणीपुरवठा योजनेंतर्गत अनेक नवीन जलवाहिन्या टाकण्यात आल्या. तसेच, जुन्या जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलण्यात आल्या होत्या. आमदार महेश लांडगे यांच्या सूचनेनुसार अजूनही काही जलवाहिन्या बदलण्याची गरज आहे. त्याचे परीक्षण व पाहणी करण्यासाठी ए-२ झोन चोवीस तास पाणीपुरवठा योजनेच्या सल्लागारांकडे हस्तांतरित करावा. पर्यायाने चोवीस तास पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी सल्लागारांना काम करणे सोपे जाईल. तसेच, हा प्रकल्प लवकर सुरू होण्यास मदत होईल. पाणी ही नागरिकांसाठी मूलभूत सुविधा आहे. तरी, हा प्रकल्प लवकरात लवकर सुरू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

# जमिनीच्या वादातून दोन गटात हाणामारी

**पिंपरी :** जमिनीच्या वादातून दोन गटात हाणामारी झाली. ही घटना रविवारी (दि. 5) दुपारी वाकी खुर्द येथे घडली. याप्रकरणी परस्पर विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याप्रकरणी एका महिलेने फिर्याद दिली आहे. त्यानुसार, श्रीकांत परदेशी, विक्रम श्रीकांत परदेशी, नियती शिंदे आणि इतर 20 ते 25 महिलांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहिती, फिर्यादी यांची वडिलोपार्जित जमीन वाकी खुर्द येथे आहे. जमिनीच्या वादातून आरोपींनी फिर्यादी यांना दगडाने मारहाण करून जखमी केले. मारहाणीत फिर्यादी यांच्या गळ्यातील दीड तोळे वजनाची सोन्याची चेन गहाळ झाली आहे.

पान १ वरून

निलेश कुलकर्णी यांनी सुद्धा भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, "उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेत मागच्या अडीच वर्षात विचारांची तडजोड करण्यात आली. जेव्हा जेव्हा हिंदुत्वाचा विचार आला तेव्हा तेव्हा उद्धव ठाकरे काँग्रेस आणि शरद पवारांसोबत गेले. महाराष्ट्रात कधी नव्हे ती अशी हिंदुत्ववादी विचारांशी तडजोड झाली.

सत्तेसाठी हिंदुत्वाचा विचार सोडण्यात आला. उद्धव ठाकरेंच्या पक्षातील लोकसभेचे खासदार निवडून आल्यानंतर त्यांच्या विजयी रॅलीमध्ये पाकीस्तानचे ध्वज फडकवण्यात आले. वारंवार स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान झाला. मागच्या अडीच वर्षात आपल्याला अशा अनेक

## पुण्यात उबाठा गटाला सुरुंग



घटना पाहायला मिळाल्या. त्यामुळे लहानपणापासूनच हिंदुत्ववादी विचारांनी तयार झालेले कार्यकर्ते विचलित झाले. त्याचा परिणाम म्हणून आज उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाला सोडून मूळ हिंदुत्ववादी विचाराच्या भाजपमध्ये हे पक्षप्रवेश झाले आहेत." "मोदीजींनी विकसित भारताचा आणि देवेंद्रजींनी विकसित महाराष्ट्राचा संकल्प केला आहे. आजचा पक्षप्रवेश हा विकसित भारताच्या संकल्पनेला साथ देण्यासाठी आहे. देवेंद्रजींच्या विकासाच्या व्हिजनला साथ देण्यासाठी आहे. उद्याच्या पुणे शहराच्या विकासात महाराष्ट्र सरकार, केंद्र सरकारचा महत्वाचा रोल असेल. या पक्षप्रवेशामध्ये पुणे शहराचा मोठा विकास दडलेला आहे. त्यामुळे हा पक्षप्रवेश अत्यंत महत्वाचा असून यातून संघटन पर्वाची दिशा ठरत आहे," असे ते म्हणाले.

## नेपाळमध्ये भूकंप

असून, अनेक घरं उद्ध्वस्त झाली आहेत. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीने माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार सकाळी ६:३५ वाजता भूकंप झाला. यानंतर क्रमाने सकाळी ७:०२ वाजता दुसरा आणि ७:०७ वाजता तिसरा भूकंप झाला.नेपाळमधील या भूकंपांच्या मालिकेचा भारतावरही परिणाम झाला आहे. माध्यमांना मिळालेल्या माहितीनुसार पाटणा आणि सारणसह बिहारच्या काही भागांमध्ये भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. दुसऱ्या बाजूला पश्चिम बंगाल आणि आसामच्या काही भागातही भूकंपाचे धक्के जाणवले. नेपाळमध्ये २०२५ची सुरूवात भूकंपाने झालेली आहे.

## आता रणसंग्राम दिल्लीचे....

सुनावले आहे. उद्धव ठाकरे शिवसेना ठाकरे गटाचे औसा मतदारसंघातील उमेदवार दिनकर माने यांच्या प्रचारासाठी गेले असताना निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांकडून त्यांची बॅग तपासण्यात आली . त्यावरुन, उद्धव ठाकरेंनी संताप व्यक्त केला. तसेच, आत्तापर्यंत किती जणांची बॅग तपासली असा सवाल संबंधितांना केला. त्यावर, तुम्हीच पहिले आहात असे उत्तर कर्मचाऱ्यांनी दिले असता, दरवेळेला मीच पहिला गिऱ्हाईक का, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी कर्मचाऱ्यांचा व्हिडिओ स्वत:च शुट केला. हीच घटना सलग तीन दिवस झाली. त्यांनी अधिकाऱ्यांना खडे बोल सुनावले होते. आता राजीव कुमार यांनी नाव न घेता उद्धव ठाकरेंना खडे बोल सुनावले आहेत.

## सात पिढ्यांची आठवण होईल अशी कारवाई !

लोकांना ते परत मिळवण्यासाठी वकिलांची फी भरून आणि कोर्टाच्या चकरा मारून वेळ जातो म्हणून आम्ही ही प्रक्रिया आमच्या बाजूने सुरू केली आहे. लोकांना आर्थिक बोजा येणार नाही, याची खात्री आम्ही घेतली आहे. आज ८० फिर्यादींना २ कोटी रुपयांपेक्षा अधिकचा मुद्देमाल परत करत आहोत.बेवारस वाहनांबाबत आता कारवाई करण्याचा सूचना दिल्या आहेत. त्याचे मालक शोधण्यासाठी सांगितले आहे. इतर बेवारस मुद्देमालसुद्धा तपासामधून त्यांच्या मालकांना शोधण्याचे सूचना दिल्या आहेत. लवकरात लवकर इतर परिमंडळातसुद्धा अशी कार्यवाही होईल, अशी अपेक्षा आहे. बोपदेव घाट प्रकरणातसुद्धा स्थानिक पोलिसांच्या मदतीने आम्हाला आरोपी सापडले. जनता ही खाकीमधील पोलीस नसली तरीसुद्धा तुम्ही एक पोलीस आहात, जेवढे अधिकार आम्हाला आहेत तेवढेच अधिकार तुमच्याकडे आहेत." असेही अमितेश कुमार म्हणाले.

## एकावर कोयत्याने केला वार

क्रीडा संघ चौकात बोलावून घेतले. त्यानंतर आरोपींनी गौरव आणि त्याच्या मित्रावर कोयत्याने वार केले. आरोपींनी केलेल्या हल्ल्यात दोघे जण गंभीर जखमी झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी पसार झालेले आरोपी सक्षम आणि सागर यांना अटक केली. पोलीस निरीक्षक मनोजकुमार लोंढे याप्रकरणाचा तपास करत आहेत.

## आसाराम बापूला जामीन!

केली आहे. आसाराम बापू याने जामिनासाठी सुप्रीम कोर्टात अर्ज दाखल केला होता. त्याची प्रकृती बारी नसल्याने हा जामीन मंजूर केला जावा असं त्यांच्या वकिलाने कोर्टात सांगितले. दरम्यान, आसाराम बापू याच्यावर खटला सुरूच राहणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने आसाराम बापूला तीन पोलिसांची सुरक्षा पुरवण्याचे निर्देश दिले आहेत. आसाराम बापू पुराव्यांशी छेडछाड करणार नाही, अशी अट त्याला घालून देण्यात आली आहे. यासोबतच त्याला अनुयायांना भेटण्यास देखील मनाई करण्यात आली आहे. गुजरातमधील एका बलात्कार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असताना सर्वोच्च न्यायालयाने हा निकाल दिला आहे. मात्र, राजस्थानमध्ये दाखल झालेल्या अशाच एका प्रकरणात आसाराम बापूला अजूनही कोठडीत राहावे लागणार आहे. जानेवारी २०२३ मध्ये सत्र न्यायालयाने आसाराम बापूला २०१३ च्या बलात्कार प्रकरणात दोषी ठरवले होते.


## नगरपरिषद कार्यालय दौंड, जिल्हा पुणे

### खरेदी सूचना

सर्व स्थानिक पुरवठादार यांना कळविण्यात येते कि, नगरपरिषद दौंड, जिल्हा पुणे यांच्याकडून मालमत्ताकर/पाणीकर लकी ड्रॉ योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेचे बक्षीस वितरण करणेकरीता खालीलप्रमाणे बक्षिसांची आवश्यकता आहे.

**साहित्य तपशील**

| | | |
|---|---|---|
| प्रथम बक्षीस | लॅपटॉप | ०१ नग |
| द्वितीय बक्षीस | रेफ्रिजरेटर | ०१ नग |
| तृतीय बक्षीस | स्मार्टफोन | ०१ नग |
| चतुर्थ बक्षीस | पैठणी | ०५ नग |
| पाचवे बक्षीस | कुकर | ०५ नग |
| सहावे बक्षीस | स्मार्टवाच | १० नग |

तरी वरीलप्रमाणे बक्षीसपुरवठा करण्यास इच्छुक पुरवठादारांकडून दरपत्रके आमंत्रित करण्यात येत आहेत. साहित्याचे तपशील व आवश्यक माहिती भांडार विभाग, न.प कार्यालय दौंड इथे पहावयास मिळतील. तरी इच्छुक पुरवठादारांनी आपली दरपत्रके दिनांक १३/०१/२०२५ पर्यंत नगरपरिषद दौंड इथे सादर करावीत.

जावक क्र. दौ.नप/००१६
दिनांक: ०६/०१/२०२५

शिक्का

सही
प्रशासक तथा मुख्याधिकारी
नगरपरिषद दौंड, जि. पुणे



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये नोटीस.**
**जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५**

### जाहीर नोटीस

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक ७४/२०२४-२५
पुणे, दिनांक : १३/०१/२०२५/६१४

**अर्जदार**
"१३३ ऑरेंज ट्री बी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या"
नोंदणी नं. पीएनए / एमएसआय/एचएसजी / (टिसी) / १४३७६/२०२०-२१ दि.३०/०६/२०२०,
पत्ता: स.नं. १३३ + १३४/१/१ + १३४/२, प्लॉट नं. १७ ते २३ आणि १४,
साईरंग गार्डन, मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे - २१
तर्फे अध्यक्ष : श्री. ज्ञानेश्वर बालाजीराव सूर्यवंशी, सचिषः श्री. कपिल शिरीष मोरे

**विरुद्ध**

**जाब देणार**
१) मे. ब्ल्यू पर्ल ऑरेंज नोंदणीकृत भागीदारी संस्था तर्फे भागीदार
अ) श्री. मनिष अण्णासाहेब आंबरे
वयः सज्ञान धंदा व्यवसाय
ब) सौ. रेखा अण्णासाहेब आंबरे
वय : सज्ञान धंदा व्यवसाय
अ.क्र. अं व ब रा. बंगलो नं ३७, किर्ती नगर, नवी सांगवी, पुणे ४११०२७
(अ.क्र.२ ते ९ तर्फे कुलमुखत्यार म्हणून अ.क्र.१) विकसक / जाब देणार नं १
२) श्री. किरण गजानन घोडके
वयः सज्ञान धंदा व्यवसाय रा. १३, प्रशांत सोसायटी, पौंड रोड,
कोथरूड, पुणे ४११०२७
३) श्री. मनिष अण्णासाहेब आंबरे
वयः सज्ञान धंदा व्यवसाय
४) सौ. रेखा अण्णासाहेब आंबरे
वय : सज्ञान धंदा व्यवसाय अ.क्र. ३ व ४ रा. बंगलो नं ३७,
किर्ती नगर, नवी सांगवी, पुणे ४११०२७
५) श्री. विनय सुदाम घुले
रा.स.नं. १३३+१३४/१/१+१३४/२, प्लॉट नं १४,
साईरंग गार्डन, मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे - २१
६) श्री. कुमुद प्रताप
७) श्री. उदय प्रताप जाबदेणार
अ.क्र.6 व 7 रा.स.नं. १३३+१३४/१/१+१३४/२,
प्लॉट नं १७ साईरंग गार्डन, मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे - २१
८) आशा गुप्ता
९) किरण गुप्ता अ.क्र. ८ व ९रा.स.नं. १३३+१३४/१/१+१३४/२,
प्लॉट नं १८, साईरंग गार्डन, मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे - २१
१०) श्री. नितीन साहेबराव देवकर
११) श्री. प्रतिक अनिल एकतपुरे
१२) श्री. महेश विनायक बारगजे अ.क्र. १० ते १२
रा. स.नं. १३३+१३४/१/१+१३४/२, प्लॉट नं २२,
साईरंग गार्डन, मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे - २१
१३) श्री. हर्षल उल्हास देव श. स.नं. १३३+१३४/१/१+१३४/२,
प्लॉट नं २३, साईरंग गार्डन, मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे २१ जागा मालक/संमती देणार /
जाब देणार नं २
१४. १३३ ऑरेंज ट्री ए विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ताः स.नं. १३३+१३४/१/१+१३४/२, प्लॉट नं १७ ते २३ व १४. साईरंग गार्डन,
मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे - २१
१५) १३३ ऑरेंज ट्री सी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्या. पत्ताः स.नं. १३३+१३४/१/१+१३४/२,
प्लॉट नं १७ ते २३ व १४, साईरंग गार्डन, मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे
१६) १३३ ऑरेंज ट्री डी विंग पत्ता स.नं. १३३ + १३४/१/१+१३४/२,
प्लॉट नं १७ ते २३ व १४, साईरंग गार्डन, मौजे सुस, ता. मुळशी, जि. पुणे - २१ जाबदेणार
इतर सहकारी संस्था / इतर इमारत / जाब देणार नं ३.

वरील अर्जदारांनी महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट (मोफा) १९६३ चे कलम १९ अंतर्गत संस्थेच्या मिळकतीचे मानीव अभिहस्तांतरण होणेसाठी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सबब वरील जाब देणार क्रमांक ०१ ते १६ यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या अभिहस्तांतरणाबाबत त्यांचे काही म्हणणे / हरकत असल्यास त्यांनी या कार्यालयात दिनांक १३/०१/२०२५ रोजी दुपारी ४.०० वा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ग्रामीण, पहिला मजला, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत, ५, बी. जे. रोड, पुणे ४११००१ येथे उपस्थित रहावे. सदर दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहील्यास अथवा दिलेल्या मुदतीत आपले काहीही लेखी म्हणणे सादर न केल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील निर्णय घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज दिनांक १६/१२/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

शिक्का

सही/-
प्रकाश ल. जगताप
सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे, (ग्रामीण)

## At a Glance

### केंद्र सरकार भेदभाव करत आहे

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी महाकुंभाच्या तयारीदरम्यान केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. गंगासागर मेळाव्याकडे केंद्र सरकार दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ममता बॅनर्जी यांनी केला आहे. कुंभमेळ्यासाठी केंद्र सरकार कोट्यवधी रुपये खर्च करत आहे, पण गंगासागर तीर्थाकडे पाहतही नाही, असा आरोप त्यांनी केला. दरवर्षी एक कोटीहून अधिक भाविक राज्याला भेट देतात.

### कुंभमेळाविरोधात चिथावणी

**नवी दिल्ली :** प्रयागराजमध्ये कुंभमेळ्याची तयारी सुरू आहे. दरम्यान, खलिस्तानी संघटना 'शीख फॉर जस्टिस'चा म्होरक्या गुरपतवंत सिंग पन्नू याने पुन्हा चिथावणीखोर विधान केले आहे. त्यामधून त्याने हिंदुत्ववादी विचारसरणी संपवण्याचे आवाहन केले आहे. पन्नू याने व्हिडिओमधून विमानतळांवर समर्थकांना खलिस्तान आणि काश्मीरचे झेंडे फडकवण्याचे आवाहन केले आहे.

### कायदेविषयक आढावा घेण्याची गरज

**नवी दिल्ली :** कायद्यांच्या अंमलबजावणीतील कार्यक्षमता आणि त्रुटी तपासण्यासाठी कायद्यांचा वेळोवेळी कायदेविषयक आढावा घेण्यात यावा, असे मत सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी व्यक्त केले. मनेका गांधी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने टिप्पणी केली.

# चीनमधील धरणाचा भारताला धोका

## पूर, दुष्काळासह अनेक धोक्यांची वाढली भीती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ब्रह्मपुत्रा नदीवर चीन जगातील सर्वात मोठा जलविद्युत प्रकल्प सुरू करण्याच्या तयारीत आहे. आता या धरणामुळे भारताला पूर आणि दुष्काळासह अनेक समस्यांना सामोरे जावे लागू शकते, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. मात्र, भारत आणि बांगलादेशवर याचा कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही, असे चीनचे म्हणणे आहे. या नदीला तिबेटमध्ये यारलुंग झांगपो असेही म्हणतात.

तिबेटमधील भारतीय सीमेजवळ ब्रह्मपुत्रा नदीवर यारलुंग झांगबो नावाचे धरण बांधण्याच्या योजनेला चीनने गेल्या महिन्यात मंजुरी दिली होती. या आराखड्यानुसार हिमालयाच्या भागात एका विस्तीर्ण दरीवर भव्य धरण बांधले जाणार आहे, तेथून ब्रह्मपुत्रा अरुणाचल प्रदेश आणि नंतर बांगलादेशात पोहोचते.



धर्मशाला येथील तिबेट पॉलिसी इन्स्टिट्यूटचे संशोधक आणि उपसंचालक टेम्पा ग्यालस्टन यांनी सांगितले की, याचा भारतावर खूप गंभीर परिणाम होईल. ते म्हणाले, २०२० साली जेव्हा या धरणाची कल्पना सुचली तेव्हा मी 'चायनाज सुपर डॅम इन टायबर आणि त्याचे भारतावर होणारे परिणाम' नावाचा लेख लिहिला होता आणि आता त्याला अधिकृत मान्यता मिळाली आहे, म्हणजे बांधकाम होऊ शकते. त्यांनी विशेषतः ईशान्य भारताचा उल्लेख केला आणि म्हणाले, मी काही उदाहरणे देतो. उन्हाळ्यात, जेव्हा परिसरात पाण्याचा प्रवाह जास्त असतो, तेव्हा पाणी साठणाऱ्या धरणातूनही जास्तीचे पाणी सोडले जाते, म्हणजे परिसरात पूर येण्याची शक्यता वाढते. हिवाळ्यात जेव्हा हवामान कोरडे असते, तेव्हा धरण परिसरात वाहणाऱ्या कोणत्याही नद्यांचे पाणी साठवेल, म्हणजे परिसरात कमी पाणी टंचाई असेल. , हे ईशान्येकडील भारतीय समुदायाचे मोठे नुकसान आहे.

ग्यालस्टन म्हणाले, आम्हाला माहित आहे की हिमालयाचा प्रदेश भूकंपाच्या क्रियाकलापांसाठी संवेदनशील आहे आणि हे सिद्ध झाले आहे की मेगा धरणांमुळे भूकंपाच्या हालचाली वाढतात. तिबेट आणि ब्रह्मपुत्रामध्ये आपण ज्याला यारलुंग झांगबो म्हणतो त्यावर चीनने प्रस्तावित केलेले मोठे धरण भारतात प्रवेश केल्यावर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

### चीन गैरवापर करू शकतो

- तिसरा परिणाम राजकीय असू शकतो, कारण चीन या धरणाचा अनेक प्रकारे वापर करू शकतो. चीनचे भारतासोबत चांगले संबंध असतील तर तो त्याचा चांगला उपयोग करू शकतो, पण संबंधात चढ-उतार आले तर... आणि कधीतरी भारत-चीनचे संबंध बिघडले तर चीन सरकार काही बाबतीत त्याचा वापर करेल. इतर मार्गाने धरण वापरू शकता. भारत आणि चीनमध्ये युद्ध झाल्यास ते धरणातून नक्कीच पाणी सोडू शकतात, ज्यामुळे परिसरात पूर येईल किंवा ते पाणी अडवू शकतात, ज्यामुळे दुष्काळ पडू शकतो.

### भारताने व्यक्त केली चिंता

- प्रस्तावित धरणाबाबत ३ जानेवारी रोजी भारताने चीनला विनंती केली होती की, ब्रह्मपुत्रेच्या खालच्या भागातील हितसंबंधांना वरच्या भागातील हालचालींमुळे हानी पोहोचणार नाही, याची काळजी घ्यावी. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिल्लीत माध्यमांशी बोलताना सांगितले की, आम्ही आमच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक पावले उचलत राहू. नुकत्याच आलेल्या अहवालानंतर या गोष्टींचा पुनरुच्चार करण्यात आला आहे. त्याचबरोबर नदीच्या खालच्या भागात असलेल्या देशांशी पारदर्शकता आणि सल्लामसलत करण्याची गरज आहे.

# चुलत भावानेच केली बहिणीची हत्या



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**गुन्हेगारी**

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील वाळूज भागात ऑनर किलिंगची धक्कादायक घटना घडलीय. जालना जिल्ह्यातील एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला तिच्याच चुलत भावानं डोंगरावरून ढकलून दिलं. सुरुवातीला हा आत्महत्येचा प्रकार वाटत असताना काही वेळातच ही हत्या असल्याचं पोलीस तपासात निष्पन्न झालं. ऋषिकेश शेरकर असं आरोपी भावाचं नाव आहे. पोलिसांनी त्याला ताब्यात अटक केली आहे. या प्रकरणात कुटुंबातील इतर सदस्य समाविष्ट आहेत का? याचा सध्या तपास सुरू आहे.

जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील शहागड येथील १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी तिच्या परिचित युवकाच्या प्रेमात पडली. ही बाब कुटुंबीयांच्या लक्षात येताच त्यांनी दोघांची समजूत काढली. इतकंच नाही तर संबंधित युवकाच्या विरोधात पोलिसात तक्रार देऊन त्याच्यावर मुलीशी संबंध तोडण्यासाठी दबाव आणला. तर मुलाच्या कुटुंबीयांनादेखील तशी ताकीद देण्यात आली. तसंच मुलीलादेखील सज्जड दम देण्यात आला. मात्र, त्यानंतर मुलगी घर सोडून गेली. कुटुंबीयांनी सर्वत्र तपास घेतला. मात्र, ती आढळून आली नाही. घरच्यांकडून जीवाला धोका असल्याची तक्रार मुलीनं शहागड पोलिसांना दिली होती. त्यानंतर तब्बल दहा ते पंधरा दिवसांनी ती घरी परतली. त्यावेळी तिची समजूत काढण्यासाठी तिला छत्रपती संभाजीनगरमध्ये वाळूज येथे काकांकडं पाठवण्यात आलं. आरोपी भाऊ ऋषिकेश याला एम.आय.डी.सी वाळूज पोलिसांनी ताब्यात घेतलं.

### असा घडला गुन्हा

- अल्पवयीन मुलगी गेल्या ८ दिवसांपासून वाळूज येथील काका तानाजी यांच्याकडं राहण्यास आली होती.
- सोमवारी दुपारी ऋषिकेश बहिणीला गोड बोलून खावडा डोंगरावर घेऊन आला.
- तिच्याशी बोलता-बोलता त्यानं तिला २०० फूट दोंगरावरून खाली ढकलून दिलं. सुरुवातीला मुलीनं आत्महत्या केली असल्याचा अंदाज व्यक्त केला जात होता.
- प्रत्यक्षदर्शींनी या घटनेसंदर्भात माहिती दिली असता हा खून असल्याचं निष्पन्न झालं. घटना घडली तेव्हा तिथं क्रिकेट खेळत असलेल्या युवकांनी घडलेल्या घटनेची माहिती पोलिसांना दिली.

# डॉ.नीलम गोऱ्हेंनी घेतले श्रीअंबाबाईचे दर्शन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवसेना नेत्या तथा विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मंगळवारी करवीर निवासिनी श्री अंबाबाई देवीला कुंकुमार्चन अभिषेक करुन विधिवत पूजा केली. यावेळी पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीकडून त्यांचे स्वागत करण्यात आले तसेच देवीची मूर्ती भेट म्हणून दिली. यावेळी कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश क्षीरसागरही उपस्थित होते.



नववर्षानिमित्त करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. परंतु या सर्व गर्दीमध्ये जन्मदिनी खूप चांगले सहकार्य देऊन अतिशय प्रेमाने डॉ. नीलमताई गोऱ्हे यांचे स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

"हे नवीन वर्ष महाराष्ट्रसह देशाला सुख समाधानचे, शेतकऱ्यांना न्याय देणारे असावे, त्यासोबतच सर्वांना आरोग्य सौख्य योजने विजय लक्ष्मी प्राप्त व्हावी", अशी प्रार्थना यावेळी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी करवीर निवासीनी अंबाबाई देवीच्या चरणी केली.

# अजित पवार ॲक्सिडेंडल नेते

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बीड सरपंच हत्या प्रकरणात सातत्याने मंत्री धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे. मात्र, मुंडेंविरोधात कुठलाही पुरावा नसताना त्यांचा राजीनामा घेणार नसल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी सांगितले असल्याची माहिती पुढे आली आहे. यावर संजय राऊतांनी अजित पवार हे ॲक्सिडेंटल नेते आहेत, अशी टीका केली.

संजय राऊत म्हणाले की, अजित पवारांना आणखी कोणते पुरावे हवे आहेत? ते हतबल आहेत. अजित पवार हे नेते नाहीत ॲक्सिडेंटल नेते आहेत.

# सलमान खानच्या घराभोवती बुलेटप्रुफ काच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अभिनेता सलमान खानने त्याच्या निवास्थानाची सुरक्षा वाढवल्याचे दिसत आहे. सलमानने त्याच्या वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटच्या बाल्कनीमध्ये नवीन बुलेटप्रुफ काच बसली आहे. तसेच हाय रिझॉल्होशन असणारे सीसीटीव्ही कॅमेरे देखील बसवले आहेत. काळवीट शिकार प्रकरणावरून लॉरेन्स बिश्नाई टोळीकडून सलमानला जीवे मारण्याच्या धमक्या येत आहेत. ऑक्टोबर मध्ये बाबा सिद्दकी यांची हत्या झाल्याच्या घटनेनंतर सलमानच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे.



१४ एप्रिला रोजी सलमान खान याच्या गॅलेक्सी अपार्टमेंच्या इथे फायरिंग झाल्याची घटना समोर आली होती. या घटनेनंतर सलमान खान याच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणात बिश्नाई टोळीचा संबंध असल्याचे समोर आले होते. गेल्या काही वर्षांपासून सलमान खानला बिश्नाई टोळी टार्गेट करताना दिसत आहे. सलमानला आणि त्याच्या घरातील सदस्यांना धमकीचे फोन येत आहेत. यामुळे सलमानने त्याच्या अपार्टमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने बुलेटप्रुफ काच, सीसीटीव्ही कॅमेरे आदी गोष्टी बसवलेल्या आहेत.

बिग बॉस १८ च्या शोच्या शूटला सलमान खानच्या सुरक्षेसाठी ६० पेक्षा जास्त सिक्युरिट गार्ड आहेत. त्याच्या बहुचर्चित सिकंदर या चित्रपटाच्या सेटवरही सलमानला वाय+ सुरक्षा पुरवण्यात येत आहे.

# दाट धुक्याचा रेल्वे गाड्यांना फटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दाट धुक्यामुळे देशाच्या अनेक भागात गाड्यांना उशीर झाला आहे. उत्तर भारतातील बहुतांश भागात मंगळवारी धुक्याचा दाट थर पसरला. धुक्यामुळे अयोध्या रेल्वेवरील अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत किंवा त्यांचा मार्ग बदलण्यात आला आहे. ओडिशातील मयूरभंजमध्ये धुक्याची दाट चादर पसरली असून गाड्या वेळेवर धावू शकल्या नाहीत. त्यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. बिहारहून प्रयागराजला जाणारे प्रवासी सुमित कुमार यांनी सांगितले की, माझी ट्रेन उशीर झाली आहे. धुक्यामुळे ही गाडी एक ते दोन तास उशिराने धावत आहे. रेल्वे रुळांवर दृश्यमानता खूपच कमी असल्याने रेल्वेचा वेग मंदावला आहे.

निशा नावाच्या एका महिला प्रवाशाने सांगितले की, हिवाळ्यात सर्व गाड्या उशिराने धावत असतात. आमची गैरसोय होते, पण आपण काय करू शकतो? थंडीमुळे येथे बसणेही कठीण झाले आहे. सुमारे २५ गाड्या नियोजित वेळेपेक्षा उशिराने धावत असल्याचे अहवालात म्हटले आहे. यामध्ये पूर्वा एक्स्प्रेस, विक्रमशिला एक्स्प्रेस, आरजेपीबी तेजस एक्स्प्रेस, पाताळकोट एक्स्प्रेस, मेवाड एक्स्प्रेस आदींचा समावेश आहे. अशा तऱ्हेने प्रवाशांनी रेल्वे स्थानकावर जाण्यापूर्वी ट्रेनची रनिंग स्टेटस तपासून घ्यावी, असा सल्ला देण्यात आला आहे. अन्यथा, आपल्याला आपल्या ट्रेनसाठी कित्येक तास थांबावे लागू शकते.

# अजमेर शरीफला साकडे

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



पुणे

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अजमेर शरीफ दर्ग्यावर चादर चढवण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी ही चादर सरचिटणीस आमेर जेतपुरवाला यांना सुपूर्त केली.

# कॅनडाच्या पंतप्रधानांनी दिला राजीनामा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला आहे. यासोबतच, त्यांनी लिबरल पार्टी ऑफ कॅनडाचं नेतेपद देखील सोडले आहे. ट्रूडो हे २०१५ मध्ये कॅनडाचे पंतप्रधान झाले होते. त्यानंतर सलग ९ वर्ष ते सत्तेत होते. अखेर, पक्षांतर्गत नसलेला पाठिंबा व अल्पमतातील सरकार यामुळे त्यांना पंतप्रधानपद सोडावे लागले आहे.

कॅनडामध्ये ऑक्टोबर महिन्यात निवडणुका होण्याची शक्यता आहे. सर्वेक्षणामध्ये या निवडणुकीत ट्रूडो यांच्या पक्षाचा पराभव होऊ शकतो, असे समोर आले आहे. याशिवाय, आर्थिक धोरणांमुळेही त्यांच्यावर टीका होत होती. त्यामुळे राजीनामा देण्याचा दबाव वाढत गेला. नवीन नेत्याची निवड होईपर्यत ट्रूडो हे पंतप्रधान म्हणून काम पाहत राहण्याची शक्यता आहे.

आता ट्रूडो यांच्यानंतर कॅनडाचा नवीन पंतप्रधान कोण होणार, याविषयी चर्चा सुरू झाल्या आहेत. पंतप्रधानपदाच्या शर्यतीत भारतीय वंशाच्या खासदाराचे नावे पुढे आहेत. हे नाव नाव अनिता आनंद यांचे आहे. भारतीय वंशाच्या ५७ वर्षीय अनिता आनंद या सध्या सरकारमध्ये परिवहन मंत्री म्हणून कार्यरत आहेत. त्या उच्चशिक्षित आहेत. त्यांच्या आई-वडिलांचा तामिळनाडू आणि पंजाबशी संबंध आहे. महामारीच्या काळात केलेल्या त्यांच्या कामगिरीचे विशेष कौतुक झाले होते.

# अलमट्टी प्रकरणी सर्वोच्च न्यायालयातही जाऊ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आंतरराज्य**

**कोल्हापूर :** अलमट्टी धरणाच्या पूररेषेबाबत सरकार लक्ष ठेवून आहे. त्यासाठी समितीही स्थापन करण्यात आली आहे. समितीचा अहवाल अंतिम टप्प्यात आला आहे. शासनाचा प्रयत्न पूरस्थिती नियंत्रणात आणण्याचा आहे. त्यासाठी आवश्यकता पडल्यास सर्वोच्च न्यायालयात जाऊ, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते नांदणी मठातील पंचकल्याण प्रतिष्ठा महामस्तकाभिषेक महोत्सव सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी नांदणी येथील 'स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी संस्थान' मठाला लवकरच तीर्थक्षेत्र 'अ' दर्जा देऊन मठासाठी आवश्यक सोयीसुविधा देणार असल्याची घोषणा केली. वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर, आमदार सर्वश्री डॉ. राजेंद्र पाटील-यड्रावकर, राहुल आवाडे, अमल महाडिक, अशोक माने, शिवाजी पाटील, माजी मंत्री सुरेश खाडे, माजी खा. निवेदिता माने, माजी खासदार राजू शेट्टी, माजी आ. प्रकाश आवाडे, जैन समाजातील आचार्य विशुद्ध सागर महाराज, मठाधिपती, दहा आचार्य महाराज, सात मुनी महाराज आदी या सोहळ्याला उपस्थित होते.

# न्यायाधीशपदी अल्पसंख्यांकांना संधी देण्याची मागणी

**कायदा**

**ज्या उमेदवारांचे आई-वडील किंवा जवळचे नातेवाईक सध्या सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालयांचे न्यायाधीश आहेत किंवा पुन्हा भूतकाळात राहिले आहेत, अशा उमेदवारांची शिफारस टाळण्यासाठी सर्वोच्च न्यायालय कॉलेजियम उच्च न्यायालयाच्या कॉलेजियमला निर्देश देण्याचा विचार करू शकते. यामुळे पहिल्या पिढीतील वकिलांना संधी मिळेल आणि घटनात्मक न्यायालयांमध्ये विविध समुदायांचे प्रतिनिधित्व वाढेल.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चेन्नई :** तामिळनाडू आणि पुद्दुचेरी बार कौन्सिलने भारताचे सरन्यायाधीश आणि न्यायाधीशांची निवड करणाऱ्या कॉलेजियमच्या न्यायाधीशांना पत्र लिहून मद्रास उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून पदोन्नती आणि नियुक्तीच्या बाबतीत मुस्लिम, ख्रिश्चन आणि समाजातील इतर घटकांसह अल्पसंख्याकांच्या उमेदवारांचा विचार करण्याची विनंती केली आहे. वकिलांच्या संघटनेने आपल्या पत्रात म्हटले आहे की, न्यायाधीशांची निवड कायदेशीर कौशल्य, सचोटी आणि बुद्धिमत्तेवर



आधारित असावी जेणेकरून सामाजिक-आर्थिक न्याय आणि सामाजिक विविधतेला चालना देण्यासाठी उच्च न्यायालयांमध्ये योग्य प्रतिनिधित्व सुनिश्चित होईल.

समाजातील विविध घटकांचे वैविध्य लक्षात घेऊन जात, धर्म, लिंग, प्रदेश किंवा कोणत्याही प्रकारच्या आधारावर भेदभाव न करता सर्वांना समान संधी दिली जावी, हे लोकशाहीचे सार आहे. बार अँड बेंचनुसार, बार कौन्सिलने सरन्यायाधीश आणि कॉलेजियमला विनंती केली आहे की, उच्च न्यायालयात न्यायाधीशांची नेमणूक किंवा पदोन्नती करताना, बारमध्ये उपस्थित असलेल्या सर्व वकिलांपैकी ज्यांची अशी पात्रता आणि अनुभव आहे जे न्यायपालिकेत समाजाचे वैविध्य आणि न्याय प्रदान सुनिश्चित करू शकतात हे लक्षात घेतले पाहिजे.

उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठांमध्ये सामाजिक विविधता यावी यासाठी हे पाऊल उचलणे आवश्यक असल्याचे या पत्रात म्हटले आहे. अलीकडच्या काळात कॉलेजियमच्या शिफारशींबाबतचा वाद पुन्हा एकदा चिघळला आहे. दरम्यान, सूत्रांच्या हवाल्याने असे वृत्त आहे की, सर्वोच्च न्यायालयाचे कॉलेजियम उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या जवळच्या नातेवाईकांच्या नियुक्तीविरोधातील प्रस्तावावर विचार करू शकते. वरिष्ठ न्यायमूर्तींनी हा प्रस्ताव मांडला असून त्याची अंमलबजावणी झाल्यास न्यायालयीन नियुक्त्यांमध्ये अधिक समावेशकता येऊ शकेल आणि गुणवत्तेपेक्षा कुटुंबाला प्राधान्य देण्याची धारणा बदलू शकेल, असे सांगण्यात येत आहे.

» Selected

## अभंग संस्कृती उपासक संत काशिबा महाराज पुण्यतिथी



**पुरंदर :** राज्यातील श्री संत सावतामाळी संतांच्या अभंगवाणी आपल्या लेखन साहित्यानं शब्दबद्ध करणारे साहित्यिक संत काशिबा महाराज यांच्या पुण्यतिथी मंदिरा संस्कृति उपासाक गुरव समाजाच्या वतीन नुकतीच साजरी करण्यात आली. यात राज्यांतील विविध जिल्ह्यातील गुरव बंधू भगिनी सहभाग दर्शविला. पुरंदर खंडाळा सीमेलगत असलेल्या सूखेड येथे अभंग कीर्तन आणि पुष्प वृष्टी कऱण्यात आली. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून युवा नेते मिलिंद पाटिल, परिवहन अधिकारी ज्योती गुरव, सार्वजनिक फेडरेशन देवस्थान अध्यक्ष विजय कुमार पवार, राष्ट्रीय उपाध्यक्ष गुरव समाज प्रतापराव गुरव. गोरीहर गुरव उपस्थित होते. सामाजिक, सांस्कृतीक, धार्मिक, पत्रकारिता, उद्योजक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना समाजरत्न पुरस्काराने यावेळी सन्मानीत करण्यात आले. यात ख्यातनाम ज्योतिषतज्ञ प्रवीण राजगुरू, राष्ट्रीय गुरव समाज अध्यक्षा अनुपमा गुरव, पत्रकार विजयकुमार हरिश्चंद्रे, नितीन शिर्के, प्रसिध्द महिला शंख आणि तुतारी वादक कविता गुरव, मोहन भांडलवकर आदींचा समावेश होता. या कार्यक्रमा करीता सातारा जिल्हा आणि फलटण खंडाळा गुरव समाज कार्यकर्त्यांनी विषेश परिश्रम घेतले.

## दर्पणकार जांभेकर यांना प्रशासनाकडून अभिवादन



**बारामती :** मराठी पत्रकार दिनानिमित्त दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर यांनी उप माहिती कार्यालय, नवीन प्रशासकीय भवन येथे पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमास अपर पोलीस अधीक्षक गणेश बिराजदार, तहसीलदार गणेश शिंदे, सहायक मोटार वाहन निरीक्षक प्रियंका सस्ते, प्रज्ञा ओमासे, उप माहिती कार्यालयातील कर्मचारी, पत्रकार उपस्थित होते. यावेळी नावडकर व बिराजदार यांनी पत्रकारांना शुभेच्छा दिल्या.

## संरक्षक भिंतीसाठी ७० लाखांचा निधी



**नीरा :** पुरंदर तालुक्यातील नीरा येथील महात्मा गांधी विद्यालयास रयत शिक्षण संस्थेकडून पश्चिम विभाग शालेय भौतिक सुविधा निधीचे वितरण करण्यात आले. या अंतर्गत महात्मा गांधी विद्यालयाच्या संरक्षकभिंत बांधकामासाठी ७० लाख रूपयांचा निधी मंजुर करण्यात आला. त्या निधी पैकी पंधरा लाख रुपयांचा पहिला हप्त्याचा धनादेश बारामती येथील शाहू हायस्कूल मध्ये झालेल्या कार्यक्रमात सदाशिव सातव यांच्या हस्ते देण्यात आला. हा धनादेश स्थानिक स्कुल कमिटीचे सदस्य लक्ष्मणराव चव्हाण, संतोषकुमार गांधी तसेच महात्मा गांधी विद्यालयाचे प्राचार्य अर्जुन कोकरे यांनी स्वीकारला. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे पश्चिम विभागाचे विभागीय अधिकारी संजय मोहिते, हनुमंतराव वाबळे,गणपत तावरे, सुभाष लकडे, अर्जुन मलगुंडे उपस्थित होते.

## शेतकऱ्याला दमदाटी, ६ जणांविरोधात विविध कलमानुसार गुन्हा दाखल

**जुन्नर :** जुन्नर शहरालगतच्या कबाडवाडी येथील एका शेतकऱ्याला तुम्ही ही जमीन करायची नाही, बांधावरून जायचे नाही अशी दमदाटी करीत तेथे येऊन आरडाओरडा, शिवीगाळ केल्याप्रकरणी फिर्यादी दाखल केल्यानंतर सहा जणां विरोधात विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाबाजी कबाडी या शेतकऱ्याने फिर्याद नोंद केली असून, पोलिसांनी या प्रकरणी गणेश बुट्टे, मोनिका बुट्टे, हरिभाऊ बुट्टे, शांताबाई बुट्टे, अर्जुन बुट्टे, निलम बुट्टे यांच्या विरोधात विविध कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे. बाबाजी हे आपल्या शेतामध्ये टोमॅटो बांधणी करीत असताना, या शेतातील तारा गणेश व त्याची पत्नी यांनी तोडून टाकल्या. याबाबत विचारणा केली असता, या सहा जणांनी तेथे येऊन ही शेती करायची नाही बांधावरून जायचे नाही, अशी दमदाटी देऊन शिवीगाळ केली, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. सहायक फौजदार भगवान गिजरे पुढील तपास करीत आहेत.

# उद्योजकांशी समन्वय वाढवणार

## नवनियुक्त प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील यांची ग्वाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती दौंड इंदापूर व पुरंदर तालुक्यातील एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रातील उद्योजक व भूखंड धारकांच्या सोयीसाठी महामंडळाने नव्यानेच स्वतंत्र बारामती प्रादेशिक कार्यालयाची निर्मिती केली आहे. या परिसरातील उद्योजकांचे प्रश्न जाणून त्यांच्याशी अधिक समन्वय वाढवून लोकाभिमुख कामकाज करू, अशी ग्वाही नवनियुक्त प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील यांनी दिली.




एमआयडीसीच्या बारामती प्रादेशिक कार्यालयाचा प्रादेशिक अधिकारी म्हणून हनुमंत पाटील यांनी नुकताच पदभार स्वीकारल्यानंतर बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनचे अध्यक्ष धनंजय जामदार, एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता विजय पेटकर, रियल डेअरीचे चेअरमन मनोज तुपे, बिडा असोसिएशनचे उपाध्यक्ष मनोहर गावडे, सचिव अनंत अवचट, खजिनदार अंबीरशाह शेख वकील, सदस्य महादेव गायकवाड, संभाजी माने, खंडोजी गायकवाड, हरिश्चंद्र खाडे, राजन नायर, अभिजीत शिंदे, उद्योजक विकास शेळके, विकास गायकवाड, सुधीर सूर्यवंशी, नितीन तुपे, संदेश मोदी आदी मान्यवरांनी त्यांची सदिच्छा भेट घेऊन संवाद साधला.

धनंजय जामदार म्हणाले बारामती मध्ये एमआयडीसीचे नवीन स्वतंत्र प्रादेशिक कार्यालय मंजूर करावे यासाठी बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनच्या माध्यमातून गेली अनेक वर्ष सातत्याने प्रयत्न करण्यात येत होते. दिनांक २१ फेब्रुवारी रोजी मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या समवेत बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. त्यामध्ये एमआयडीसीचे बारामतीला स्वतंत्र प्रादेशिक कार्यालय स्थापन करावे, असा निर्णय झाला व आता सदर कार्यालय कार्यान्वित होत आहे. या कार्यालयामुळे उद्योजकांचे पुण्याचे हेलपाटे थांबणार असून आर्थिक पिळवणूक व मानसिक त्रास बंद होणार आहेत असे अध्यक्ष धनंजय जामदार म्हणाले.

बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनच्या पाठपुराव्यामुळे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व उद्योगमंत्री उदय सामंत यांनी बारामतीसाठी नवीन स्वतंत्र प्रादेशिक कार्यालय मंजूर केल्याबद्दल व उद्योजकांची एक मोठी गैरसोय कायमची दूर केल्याबद्दल बारामती परिसरातील उद्योजक समाधान व्यक्त करून अजित पवार यांना धन्यवाद देत आहेत.

## तेजेवाडीत घरफोडी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** जुन्नर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तेजेवाडी येथील एका बंद राहत्या घराचा दरवाजा तोडून अनोळखी चोरट्यांनी कपाटातील २५ हजाराची रोख रक्कम आणि १० साड्या चोरून नेल्या आहेत. अंकुश बोऱ्हाडे (सध्या रा. कोथरूड, मूळ राहणार तेजेवाडी, जुन्नर) यांनी घरफोडीची फिर्याद नोंद केली आहे. त्यांच्या बंद राहत्या घराच्या दरवाजाची कडी अनोळखी चोरट्यांनी तोडून घरातील कपाटामधील २५ हजाराची रोख रक्कम आणि १० सहावारी साड्या चोरून नेलेल्या आहेत. अनोळखी चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अंमलदार सागर शिंदे पुढील तपास करीत आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी गुरुवारी आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** येथील नगरपालिका व राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने भारतीय संविधानाचे निर्माते महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या काढून टाकण्यात आलेल्या पुतळ्याचे काम, नवीन जागेत शासनाच्या खर्चाने तात्काळ सुरु करण्यात यावे या मागणीसाठी, पुरंदर तालुक्यातील शिव शाहू फुले आंबेडकर प्रेमी व विविध सामाजिक पक्ष संघटनेच्या वतीने गुरुवारी (दि. ९) सकाळी ११ वाजता, जेजुरी नगरपरिषद कार्यालय, जेजुरी येथे जाहीर निदर्शने आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती जेष्ठ नेते विष्णुदादा भोसले यांनी दिली.



याबाबत पुरंदर तालुक्यातील शिव शाहू फुले आंबेडकर प्रेमी यांच्या व भिमानुयायी यांच्या वतीने आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते विष्णूदादा भोसले , यांच्यासह जेजुरी नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष अविनाश भालेराव, रिपब्लिकन पक्षाचे तालुकाध्यक्ष बळीराम सोनवणे, समताकृतीचे संपादक दि. चि. कदम (गुरुजी) बहुजन सामाजिक विकास प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष नामदेव नेटके, कोषाध्यक्ष सुनील जगताप, व सामाजिक कार्यकर्ते तानाजी भालेराव, यांनी जेजुरी नगरपालिकेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांना निवेदन दिले आहे.

दि. १४ जून २०२४ रोजी पुरंदर तालुक्यातील महसूल, पोलीस प्रशासन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी संगनमताने जेजुरी येथील मुख्य चौकातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा रस्ता रुंदीकरणाच्या नावावर कुणालाही विश्वासात न घेता हलविण्यात आला होता. या घटनेला जवळपास ७ महिने होत आले आहेत, तरी आजतागायत प्रशासनाने पुतळ्याचे काम सुरु केलेले नाही. त्यामुळे जेजुरी नगरपरिषद प्रशासनाने शासकीय खर्चातून घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे काम नवीन जागेत तात्काळ सुरु करण्यात यावे, या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे.

या आंदोलनात पुरंदर तालुक्यातील शिव शाहू फुले आंबेडकर चळवळीत काम करणाऱ्या सर्व सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, भिमसैनिक मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होणार आहेत, हे आंदोलन पुतळ्याचे काम नवीन जागेत तात्काळ सुरु करण्यात यावे, या मागणीसाठी आहे. त्यामुळे पुरंदर तालुक्यातील शिव शाहू फुले आंबेडकर, संत शिरोमणी रोहिदास महाराज,आद्य क्रांतिवीर उमाजी राजे नाईक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, राजमाता अहिल्यादेवी होळकर, समाज सेविका फातिमा शेख , यांच्या विचार धारेवर काम करणाऱ्या सर्व अनुयायांनी या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन विष्णूदादा भोसले यांनी केले आहे.

## ओतूर येथे बिबट्या जेरबंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ओतूर :** जुन्नर तालुक्यातील ओतूर हद्दीतील डुंबरे मळा येथे लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्याची मादी रविवारी (दि. ५) जेरबंद करण्यात आली असून, तिचे वय ६ वर्षे इतके आहे. वारंवार होणाऱ्या बिबट्याच्या दर्शनामुळे या भागात दहशत पसरली होती. त्यामुळे ओतूर वनविभागाने डुंबरे मळा परिसरात पिंजरा लावण्यात आला होता. उपसरपंच प्रशांत डुंबरे व स्थानिक ग्रामस्थांनी पिंजरा लावण्याची मागणी केली होती.

बिबटा पिंजऱ्यात अडकल्याची माहिती मिळताच ओतूर वनपरिक्षेत्र अधिकारी लहू ठोकळ यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल सारिका बुट्टे, वनरक्षक विश्वनाथ बेले, किसन केदार, गणपत केदार, गंगाराम जाधव आदींनी घटनास्थळी धाव घेतली. बिबट्यास ताब्यात घेऊन माणिकडोह बिबट निवारा केंद्र येथे दाखल केले.

जयप्रकाश डुंबरे, प्रकाश डुंबरे, सागर डुंबरे, विकास डुंबरे, संभाजी डुंबरे, संजय डुंबरे या ग्रामस्थांनी रात्री विबटप्रवण क्षेत्रातून वाहन घेऊन जाताना हॉर्न मोठ्याने वाजवावा. जेणेकरून रस्त्याच्या आजूबाजूला दबा धरून बसलेले वन्यप्राणी बाजूला सरकतील. रात्री शेतीचे कामे करीत असताना हातात काठी किंवा बॅटरी असावी. शक्यतो समूहाने शेतात काम करावे, असे आवाहन वनविभागाने केले आहे.

## शॉर्टसर्किटने ऊस खाक

**नारायणगाव :** जुन्नर तालुक्यातील येडगाव येथे उसाच्या शेताजवळून गेलेल्या वीज वाहिनीच्या तारांमध्ये घर्षण झाल्याने ठिणग्या पडून ३ शेतकऱ्यांच्या ६ एकरातील उसाच्या पिकाला आग लागल्याची घटना घडली आहे. तसेच या आगीत ठिबक सिंचन व पीव्हीसी पाइप, आंब्याची व नारळाची झाडे जळून अंदाजे १५ लाख रुपयांपेक्षा अधिकचे नुकसान झाले. ही घटना शुक्रवारी दुपारी ४ च्या सुमारास घडली.

या आगीत बापूसाहेब कोल्हे, राजाराम कोल्हे व सोपानराव कोल्हे या तीन शेतकऱ्यांचा प्रत्येकी २ एकर याप्रमाणे एकूण ६ एकर ऊस जळाला. शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा आरोप करत नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी या शेतकऱ्यांनी केली आहे.याबाबत वीज महावितरणला कळविण्यात आले असून अधिकाऱ्यांनी पंचनामा केला.

## उसाचे पाचट पेटवल्याने शेजारील शेताला आग

**शिक्रापूर :** सरदवाडी येथील एका शेतकऱ्याने शेतातील उसाचे पाचट पेटवल्याने शेजारील शेतामध्ये आग लागून शेतातील एक एकर ऊसासह पाईप लाईन व ठिबक संच खाक झाल्याची घटना घडली. राहुल आश्राम पळसकर याचे विरुद्ध शिरुर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सरदवाडी ता. शिरुर येथील राहुल पळसकर या शेतकऱ्याच्या शेतातील ऊस कारखान्याने नेल्याने राहुल यांनी शेतातील ऊसाचे पाचट जाळल्याने शेजारी असलेल्या दशरथ पळसकर यांच्या शेतातील ऊसासह शेतातील पाईपलाईन व ठिबकच्या पाईपला आग लागली. या आगीमध्ये दशरथ पळसकर यांच्या एक एकर ऊसासह पाईप लाईन व ठिबक संच खाक झाल्याने अंदाजे एक लाख रुपयाचे नुकसान झाले. याबाबत दशरथ भिमाजी पळसकर यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली.

## जुन्नरमध्ये बेशिस्त वाहन चालकांवर कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** जुन्नर परिसरातील ४,६२९ बेशिस्त आणि वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्या वाहन चालकांवर गेल्या वर्ष भरात जुन्नर वाहतूक विभाग पोलिस पथकाने नियमानुसार कारवाई करीत ३९ लाख १२ हजार ५०० रुपये दंड रकमेची कारवाई केलेली आहे.

पोलीस निरीक्षक किरण अवचर यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतुक पोलीस अंमलदार दिपक वनवे , दादा पावडे , गणेश शिंदे ,ट्रॅफिक वार्डन बाळकृष्ण खंडागळे आणि आरसीपी पथकाच्या मदतीने जुन्नर परिसरात वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्या बेशिस्त वाहन चालकांवर वाहतूक नियमानुसार दंड रकमेची कारवाई करण्यात आली आहे. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीत दुचाकीवर ट्रिपल सीट, फॅन्सी नंबर प्लेट, जादा आवाजाचे सायलेंसर, विना परवाना वाहन चालविणे, दारू पिऊन वाहन चालविणे, प्रमाणापेक्षा जास्त प्रवासी वाहतूक, काळी काच, दादा, मामा, बाबा आदी नावाच्या नंबर प्लेट, जादा आवाजाचे हॉर्न, विना सीटबेल्ट, तुटलेल्या नंबर प्लेट, विना हेल्मेट आदी वाहतूक नियमांचे पालन न करणाऱ्या ४६२९ बेशिस्त वाहन चालकांवर नियमानुसार असलेली दंड रकमेची कारवाई करण्यात आली. ही रक्कम ३९ लाख १२ हजार ५०० रुपये इतकी आहे.

बेशिस्त आणि वाहतुकीच्या विविध नियमांचे पालन न करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई सक्तीने होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## भरकटलेले हरिण वनविभागाच्या स्वाधीन

**सासवड :** पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील नायगाव येथे आलेल्या भरकटलेल्या हरणाला शेतक- यांनी राखलेल्या प्रसंगावधनाने या भरकटलेल्या हरणाला वनविभागाच्या ताब्यात देण्यात आले.शेतकरी रवींद्र उत्तम ठवाळ त्यांच्या शेतात जात असताना शेताजवळ हरीण आढळले. त्यांनी नायगाव सोसायटीचे संचालक चंद्रकांत चौंडकर यांना फोन वरून संपर्क साधला. चंद्रकांत चौंडकर यांनी वनखात्याचे कर्मचारी काळूराम शेंडगे यांच्याशी संपर्क करून त्यांना हरीण असलेल्या ठिकाणी बोलविले. तो पर्यंत शेतकरी रवींद्र ठवाळ व त्यांचे वडील उत्तम ठवाळ, भाऊ गणेश ठवाळ त्या हरणाची देखरेख करीत होते. हे हरीण वन खात्याचे कर्मचारी काळुराम शेंडगे, सूर्यकांत कुंजीर, शिवरत्न जाधव यांच्या ताब्यात देण्यात आले.

## पुणे जिल्हा टीडीएफच्या अध्यक्षपदी सोमनाथ भंडारे,सचिवपदी तानाजी झेंडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** पुणे जिल्हा शिक्षक लोकशाही आघाडीची अर्थात टीडीएफची सर्वसाधारण सभा नुकतीच संपन्न झाली असून यावेळी संघटनेच्या २०२५ ते २०२८ या त्रैवार्षिक काळासाठी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून पुणे जिल्हा शिक्षक लोकशाही आघाडीची अर्थात टीडीएफच्या अध्यक्षपदी सोमनाथ भंडारे तर सचिवपदी तानाजी झेंडे यांची निवड करण्यात आली आहे.



शिक्षक लोकशाही आघाडीची अर्थात टीडीएफची बैठक नुकतीच महाराष्ट्र राज्य शिक्षक लोकशाही आघाडीचे सचिव केरुभाऊ ढोमसे यांच्या अध्यक्षतेखाली ही निवडणूक पार पडली, यावेळी निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून महाराष्ट्र राज्य शिक्षक लोकशाही आघाडीचे अध्यक्ष गोरक्षनाथ थोरात, पुणे विभाग शिक्षक लोकशाही आघाडीचे अध्यक्ष शिवाजीराव कामथे यांनी काम पाहिले. याप्रसंगी पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघटनेचे मावळते अध्यक्ष वसंतराव ताकवले, उपाध्यक्ष अशोकराव दरेकर, पुणे जिल्हा शिक्षक लोकशाही आघाडीचे मुरलीधर मांजरे, महिला संघाच्या अध्यक्ष स्वाती उपार, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आजीव सभासद अनिल साकोरे, शिक्षक नेते जितेंद्रकुमार थिटे यांसह आदी मान्यवर उपस्थित होते.

# लोणी प्राथमिक शाळा प्रथम



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** पुणे जिल्हा परिषद व आंबेगाव तालुका पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने तालुका स्तरिय यशवंतराव चव्हाण कला क्रीडा महोत्सव सन रविवारी व सोमवारी लांडेवाडी (ता.आंबेगाव) येथे संपन्न झाल्या. सदर स्पर्धेत पुणे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोणी या शाळेने मुलींचा (पहिली ते चौथी) लहान गट लेझीम स्पर्धेमध्ये विशेष प्राविण्यसह प्रथम क्रमांक पटकावला. ट्रॉफी व प्रशस्तीपत्र भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्याक्ष अॅड. प्रदीप वळसे पाटील व पंचायत समितीचे माजी सदस्य रविंद्र करंजखेले, गट विकास अधिकारी प्रमिला वाळुंज यांच्या हस्ते देण्यात आले. या वेळी गट शिक्षणाधिकारी उषा मसळे, विस्तार अधिकारी चिमा रामा बेंडारी, केंद्र प्रमुख भगवंत टाव्हरे व तालुक्यातील विविध शाळांचे विद्यार्थी व शिक्षक यावेळी उपस्थित होते. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष सर्व सदस्यांनी विद्यार्थी व मार्गदर्शन करणारे सर्व शिक्षक मुख्याध्यापक अनिता भूमकर, प्रशिक्षक प्रविण पोखरकर यांचे अभिनंदन केले. जिल्हास्तरिय क्रीडा स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

### भरमसाट करआकारणीच्या नोटीसा घेतल्या मागे

# ग्रामस्थांच्या दणक्याने मंचर नगर पंचायत वरमली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगाव :** मंचर शहरातील मालमत्ताधारकांना नगरपंचायतीने भांडवली मूल्यांवर आधारित भरमसाट करआकारणीच्या नोटिसा बजाविल्या होत्या. त्याविरुद्ध माजी ग्रामपंचायत सदस्य वसंतराव बाणखेले आणि अॅड. अमर कराळे यांनी आवाज उठविला होता. यानंतर नागरिकांनी करवाढीविरोधात आक्षेप नोंदविले. विविध राजकीय पक्षांनी देखील कररचनेला विरोध केला. त्या हरकतींवर मंचर नगरपंचायतीने सुनावणी घेऊन भरमसाट वाढविलेले कर कमी करण्यात आले. त्यामुळे करदात्यांसह ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

मंचर नगरपंचायतीने करयोग्य भांडवली मूल्यावर पूर्वी ०.२२ टक्के करआकारणी केली होती. अवास्तव करवाढीमुळे ग्रामस्थांच्या आक्रमक भूमिकेमुळे कर कमी करून ०.१८ टक्के करण्यात आला आहे. घरापुढील व इमारतीपुढील मोकळी जागा, इमारतीचे पोटमाळे, घरासमोरील शेतजमीन, खुल्या जागा, जनावरांचे गोठे, शेतीसाहित्य ठेवण्याकरिता बांधलेली पत्राशेड, तात्पुरते पत्राशेड, कांदा बराखी या बाबी कररचनेतून वगळण्यात आल्या आहेत.

स्वच्छता कर पूर्णपणे रद्द करण्यात आला, तसेच भांडवली मूल्यावर आधारित वृक्षकर, शिक्षण कर, रोजगार हमी उपकरात घट झाली आहे. संकलित करावर आधारित अग्निशमन करही कमी झाला आहे. तसेच, उपयोगिता शुल्काचे कमर्शिअल दर (प्रत्येक वर्षी ३६० रुपये) व रेसिडेन्शिअल दर (प्रतिवर्षी १८० रुपये) वेगवेगळे आकारले आहेत.




### सामान्य पाणीपट्टी मालमत्ताकरात समायोजित

● सर्वसाधारण पाणीपट्टी करामध्ये कोणतीही वाढ केलेली नाही. त्याचप्रमाणे सर्वाधिक तक्रारी असणारा मुद्दा हा सामान्य पाणीपट्टीचा होता. सामान्य पाणीपट्टी ही ग्रामपंचायत काळापासून प्रत्येक मालमत्तेवर आकारण्यात येत होती. त्यामुळे ज्या मालमत्ताधारकांकडे नळकनेक्शन नसणाऱ्यांना देखील सामान्य पाणीपट्टी ५०० रुपये प्रतिवर्षी आकारण्यात येत होती. ही सामान्य पाणीपट्टी कमी करण्याची मागणी वसंतराव बाणखेले आणि अॅड. अमर कराळे यांनी केली होती. त्यामुळे ही सामान्य पाणीपट्टी मालमत्ताकरात समायोजित करण्यात आली आहे.

» Selected

## पारगाव परिसरात जिओची सेवा विस्कळीत



**रांजणी :** पारगाव (ता. आंबेगाव ) परिसरात गेल्या सात आठ दिवसां पासून मोबाईलच्या जिओ कंपनीची सेवा विस्कळीत झाल्याने ग्राहकांची मोठी गैरसोय होत आहे. नागरिकांच्या हातातील मोबाईलला रेंज येत नाही. त्यामुळे ते त्रस्त झाले असून, जिओ कंपनीने सेवा सुरळीत करावी, अशी मागणी माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे व ग्राहकांनी केली आहे. आंबेगाव तालुक्यातील पारगाव ही पूर्व भागातील मोठी बाजारपेठ आहे. येथे जिओ कंपनीचा गावठाणात टॉवर उभा आहे. बहुतेक नागरिकांनी जिओ कंपनीचे सिम कार्ड विकत घेतले आहे. मात्र, गेल्या सात ते आठ दिवसापासून जिओ कंपनीची सेवा विस्कळीत झाली आहे. मोबाईलला रेंज नसते. फोन लागत नाहीत अथवा येतही नाही, अशा तक्रारी ग्राहकांमधून ऐकायला मिळत आहेत. जिओ कंपनीने दोन दिवसांत सेवा सुरळीत करावी, अशी मागणी ग्राहकांनी केली आहे.

## समाज विकासात पत्रकारांचे योगदान कौतुकास्पद



**आळंदी :** राज्यातच नव्हे तर देशाच्या विकासात पत्रकारांचे योगदान वाखाणण्यासारखे असून ते कौतुकास्पद असल्याचे मत भाजपचे एससी मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस तसेच आळंदी नगरपरिषदेचे माजी नगरसेवक अशोकराव उमरगेकर यांनी व्यक्त केले. येथील हॉटेल अशोक मध्ये महाराष्ट्र राज्य एससी मोर्चाचे वतीने आयोजित पत्रकार दिनानिमित्त सत्कार समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी राज्यमंत्री तसेच अण्णाभाऊ साठे महामंडळाचे अध्यक्ष दिलीप कांबळे होते. दिलीप कांबळे यांच्या हस्ते हुतात्मा राजगुरू पत्रकार संघाचे पदाधिकारी, पत्रकार यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी भाजपचे शहराध्यक्ष किरण येळवंडे, माजी नगरसेविका सुनीता रंधवे, रुख्मिणी कांबळे, संगीता फफाळ, उज्ज्वला पेठकर, संघाचे अध्यक्ष अर्जुन मेदनकर, उपाध्यक्ष सोमनाथ बेंडाले, सचिव गौतम पाटोळे, जिल्हा प्रतिनिधी अमर गायकवाड, भागवत काटकर, बाबासाहेब भंडारे, मिनीनाथ मेमाणे, कैवल्य टोपे, अनिल जोगदंड, देवानंद गोराडवार, हनुमंत घोंगडे,राजेश नागरे आदी मान्यवर उपस्थित होते. भागवत काटकर यांनी सूत्रसंचालन केले. अशोका इव्हेंट्स यांनी पत्रकार दिनाचे कार्यक्रमाचे संयोजन केले.

## पोलीस वर्धापन दिनानिमित निरगुडसर विद्यालयात कार्यक्रम



**लोणी-धामणी :** निरगुडसर (ता. आंबेगाव) येथील नेहरू माध्यमिक व वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालयात पोलिस वर्धापन दिना निमित्त पारगाव-शिंगवे पोलीस स्टेशनच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये शस्त्र व दारूगोळा, सायबर गुन्हे, महिला अत्याचार, वाहतूक नियमन, बाल लैंगिक अत्याचार, डॉग पथक या संदर्भात विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक नेताजी गंधारे, पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब लोहकरे, सहायक पोलीस उपनिरीक्षक मारूती गोफणे, पोलीस नाईक रमेश इचके, पोलीस हवालदार देवानंद किर्वे, दत्तात्रय जठर, संजय साळवे, निशा गुळवे, शितल पोखरकर, सुजाता जाधव व अन्य पोलीस कर्मचारी उपस्थित होते. आलेल्या सर्व पोलीस कर्मचाऱ्यांचे विद्यालयाचे प्राचार्य कांताराम टाव्हरे यांनी स्वागत केले, विनायक जोशी यांनी सूत्रसंचालन केले, तर पर्यवेक्षक संतोष वळसे यांनी आभार मानले.

## बलुतेदार संघटनेच्या उपाध्यक्षपदी अनिकेत काळे



**सासवड :** १८ पगड, १२ बलुतेदार संघटनेच्या पुरंदर तालुका युवक संघटनेच्या उपाध्यक्षपदी नाझरे सुपे येथील युवक कार्यकर्ते अनिकेत काळे यांची निवड करण्यात आल्याची घोषणा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब भांडवलकर यांनी केली. या संघटनेच्या वतीने १८ पगड, १२ बलुतेदार यांच्या अडीअडचणी सोडवणूक करण्याचे काम केले जाते. संघटनेच्या युवक कार्यकर्त्यांनमधून अनिकेत काळे यांची निवड करण्यात आली. यावेळी संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब भांडवलकर, सचिव अतुल पवार, उपाध्यक्ष राजेंद्र धोत्रे, मंगेश जाधव, निलेश पवार, नाझरे सुपे सरपंच भाऊसो दत्तात्रय कापरे, अनिल कांबळे, विमल काळे आदी उपस्थित होते.

# राज्य सरकार विरोधात सुप्रियाताईंचा एल्गार!

## शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी होम पिचवरुन आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** मागील काही काळापासून कांदा व दूध दर सातत्याने घसरत आहेत. कांद्याला हमीभाव व दुधाला रास्त दर मिळावा म्हणून, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे व युगेंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली बारामती मधून जनआक्रोश आंदोलनाची ठिणगी मंगळवारी बारामतीत पडली.

कांद्याला आणि दुधाला हमीभाव मिळावा या मागणीसाठी खासदार सुप्रिया सुळे रस्त्यावर उतरल्या. बारामतीतल्या तीन हत्ती चौकात खासदार सुप्रिया सुळे यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी ठिय्या मांडला. त्यांच्या समवेत युवा नेते युगेंद्र पवार यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

गेल्या आठवड्यात सुप्रिया सुळे यांनी ग्रामीण भागात दौरा केला होता. यावेळी बहुतांश गावांमध्ये शेतकऱ्यांनी कांद्याच्या दराचा प्रश्न उपस्थित केला होता. तसेच दुधाला उत्पादन खर्चाच्या तुलनेत योग्य भाव मिळत नसल्याच्या तक्रारी केल्या होत्या. त्याचीच दखल घेऊन खासदार सुप्रिया सुळे यांनी आपल्या होम पिचवर राज्य सरकार विरोधात आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. मंगळवारी प्रत्यक्षात खासदार सुप्रिया सुळे यांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले. हाताला काळ्याफिती बांधून सुप्रिया सुळे यांनी आंदोलनात सहभाग घेतला. बळीराजाचे राज्य येऊ दे, जगाचा पोशिंदा जगला पाहिजे. शेतकरी बचाव, देश बचाव अशा विविध घोषणांनी आंदोलन कार्यकर्त्यांनी परिसर दणाणून सोडला.

केंद्र सरकारने कांद्यावर निर्यात शुल्क लागू केल्यामुळे मागील दीड ते दोन वर्षांपासून कांद्याचे दर सातत्याने खाली येत आहेत. तसेच दूध दराबाबत देखील केंद्र व राज्य सरकारने सातत्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांची उपेक्षाच केली आहे. दूध व्यवसायावर अनेक ग्रामीण तरुण सध्या अवलंबून आहेत. मात्र, दुधाला कमी दर मिळत असल्याने ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती घटली आहे. परिणामी ग्रामीण भागातील अर्थचक्र थंडावले असून दुधाला रास्त दर मिळाला तर हे चक्र पुन्हा एकदा धावू लागेल. जिरायती व बागायती क्षेत्रामध्ये देखील शेतकरी कांदा लागवड करत असतात. मात्र कांद्यावर निर्यात शुल्क लागू केल्यामुळे व्यापारी कांदा निर्यात करू शकत नाहीत. कांदा भारतीय बाजारात पडून राहिल्यामुळे कांद्याचे दर कमालीचे घसरले आहेत. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पक्षाच्या वतीने बारामती मधून जन आक्रोश आंदोलन छेडण्यात आले आहे. या मोर्चाला दूध उत्पादक, शेतकरी, महिला, युवक व युवती यांनी हजर लावली.



पुणे बारामती : कांद्याला आणि दुधाला हमीभाव मिळावा या मागणीसाठी खासदार सुप्रिया सुळे रस्त्यावर उतरल्या. बारामतीतल्या तीन हत्ती चौकात खासदार सुप्रिया सुळे यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी ठिय्या मांडला.

### कौटुंबिक विषय उंबरठ्याच्या आत...

● उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीत एक विधान केलं होतं. ताटात पडलं काय आणि वाटीत पडलं काय... असं म्हणत पवार कुटुंबाचे मनोमिलनाचे संकेत दिले होते. यावर खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, पवार कुटुंबाबाबत माझ्या मनात काल, आज आणि उद्याही मनभेद आणि मतभेद कधीच नव्हते, हे सर्वांना माहिती आहे. आणि समाजातील जबाबदाऱ्या उंबरठ्याच्या बाहेर अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. खासदार सुप्रिया सुळे मंगळवारी बारामती दौऱ्यावर होत्या. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

# श्रीराम चौक बसथांबा शेड वापराविना

## नागरिक, शाळकरी मुलांना निवारा नसल्याने गैरसोय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** कारफाटा, रांजणी (ता. आंबेगाव ) येथील श्रीराम चौकात बस स्थानक शेड वापराविना पडून आहे. बस स्थानक फ्लेक्स, होर्डिंग लावायचे ठिकाण बनले आहे. त्यामुळे त्याचा प्रवासी, नागरिक, शाळकरी विद्यार्थ्यांना वापर होत नाही. चौकात कोणताही निवारा नसल्याने प्रवासी, शाळकरी विद्यार्थ्यांचे हाल सुरू आहेत.

रांजणी गावात कारफाटा येथे श्रीराम चौक आहे. येथून मंचर, नारायणगाव, बेल्हा, शिरुरकडे जाता येते. येथील चौकात सतत वाहने, प्रवाशांची वर्दळ असते. येथे पूर्वी बांधलेले बसस्थानक शेड हे वापराविना पडून आहे. त्याचा वापर होत नसल्याने त्यासमोर सतत फ्लेक्स, होर्डिंग लावले जातात. फ्लेक्स, होर्डिंग लावण्याचे ते ठिकाणच बनले आहे. त्यामुळे श्रीराम चौकातील बस स्थानक शेड हे असून अडचण नसून खोळंबा बनले आहे.

येथून ओझर ते रांजणगाव गणपती हा अष्टविनायक महामार्ग जातो. या महामार्गाचे नुकतेच नव्याने काम झालेले आहे. महामार्गावर अनेक ठिकाणी छोटी बसस्थानक शेड उभारण्यात आलेली आहेत. श्रीराम चौकात देखील शेडसाठी जागा निश्चित करून तेथे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यात आले आहे. परंतु तेथे अद्यापही शेड उभारण्यात आलेले नाही. जे पूर्वीचे शेड आहे, ते वापराविना आहे. त्यामुळे सध्या शाळकरी विद्यार्थी, प्रवासी, यांची मोठी गैरसोय होत आहे.





आंबेगाव कारफाटा: येथील श्रीराम चौकात बसस्थानक शेड वापराविना पडून आहे. दुसऱ्या छायाचित्रात प्रवाशांना निवारा नसल्याने त्यांचे हाल होत आहेत.

# लॉन्ड्री व्यावसायिकांची बैठक संपन्न



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिरुर तालुक्यातील लॉन्ड्री व्यावसायिकांना पीएम विश्वकर्मा योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी भारतीय जनता पार्टी उद्योग आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय पाचंगे यांच्या पुढाकाराने आयोजित बैठकीत तब्बल पन्नास लॉन्ड्री व्यावसायिकांची नोंद झाली आहे.

शिरुर तालुक्यातील लॉन्ड्री व्यावसायिकांना पीएम विश्वकर्मा योजनेची माहिती व योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी भारतीय जनता पार्टी उद्योग आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय पाचंगे यांच्या पुढाकाराने व भारतीय जनता पार्टीचे माजी तालुकाध्यक्ष रामचंद्र निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठक प्रसंगी भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते गणपतराव फराटे, भारतीय जनता पार्टी उद्योग आघाडीचे पुणे जिल्हाध्यक्ष रवींद्र गायकवाड, माजी सरचिटणीस माऊली भैरट, रांजणगाव गणपती देवस्थानचे सचिव तुषार पाचुंदकर पाटील, किसान मोर्चाचे अध्यक्ष अनिल नवले, बाबुराव दौंडकर स्मारक समितीचे संचालक विठ्ठलराव वाघ, माजी सरपंच रामदास पऱ्हाड, शिरूर तालुका परिट संघटनेचे अध्यक्ष विकास अभंग, भाजपचे शहर सरचिटणीस विजय नरके, काळुराम अभंग, धनराज अभंग, रुपेश खेडकर यांसह आदी उपस्थित होते. दरम्यान भारतीय जनता पार्टी उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर यांनी ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन केले, दरम्यान पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी छोट्या व्यवसायिकांना आर्थिक मदत व स्वावलंबी बनविण्यासाठी पीएम विश्वकर्मा योजना सुरू केली. मात्र, सदर योजनेचा लाभ कसा घ्यायचा याबाबत व्यावसायिक अनभिज्ञ असून बँकेकडुन प्रतिसाद मिळत नसल्याने सदर बैठक आयोजित करण्यात आली होती.

# लष्करी शस्त्रे पाहण्याची विद्यार्थ्यांना संधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुण्यातील रेसकोर्स मैदानावर नुकत्याच पार पडलेल्या "जाणून घ्या तुमचे लष्कर" हे लष्करी युद्ध सामग्रीचे प्रदर्शन पाहण्याची संधी पुरंदर तालुक्यातील चांबळी येथील कृषी औद्योगिक विद्यालयातील सुमारें पन्नास विद्यार्थ्यांनी अनुभवली. सामाजिक उत्तरदायित्व जपणाऱ्या सासवड येथील स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानच्या माध्यमातून मुलांना हि सुसंधी उपलब्ध करून दिली.प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप यांसह शाळेच्या मुख्याध्यापिका हसीना आत्तार, शिक्षिका ऋतुजा कुंभार, प्रियांका उबाळे व शिवानी कामठे व पन्नासहून अधिक मुलामुलींनी हा संस्मरणीय क्षण अनुभवला.

सदरच्या प्रदर्शनात स्वीडन बनावटीची बोफोर्स तोफ, पिनाका मल्टी बैरेल रॉकेट लॉन्चर, इंन्सास रायफल, ड्रॉन जॅमर सिस्टीम, के ९ वज्र, अत्याधुनिक स्वयंचलित तोफा इत्यादि शस्त्रे रणगाडे, चिलखती व पायदळी वाहने इत्यादी पाहता आले. यातील बरीच शस्त्रे व वाहने हि कारगिल युध्दात वापरली गेली होती याचे मुलांना अप्रूप वाटले जवानांच्या चित्तथरारक कसरती, मर्शल आर्ट, मल्लखांब व अन्य युद्धकौशल्य मुलांसाठी खास पर्वणी ठरली. तेथे उपस्थित अधिकाऱ्यांनी मुलांना शस्त्रे, उपकरणे, वाहने याविषयी उत्तम मार्गदर्शन केले. देशाच्या लष्करी पराक्रमाची महिती देणारे हे प्रदर्शन मुलांसाठी ऊर्जा देणारे ठरले.

## जाणून घ्या तुमचे लष्कर

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



सासवड चांबळी: पुण्यातील रेसकोर्स मैदानावर नुकत्याच पार पडलेल्या "जाणून घ्या तुमचे लष्कर" हे लष्करी युद्ध सामग्रीचे प्रदर्शन पाहण्याची संधी चांबळी येथील कृषी औद्योगिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी अनुभवली.

# सोमेश्वर देणार दोन हजार आठशे रूपयांची पहिली उचल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** बारामती तालुक्यातील सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने चालू गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये गाळप झालेल्या ऊसाला पहिली उचल प्रति मे.टन. दोन हजार आठशे रूपये जाहीर केली असल्याची माहिती चेअरमन पुरुषोत्तम जगताप यांनी दिली.

संचालक मंडळाच्या नुकत्याच झालेल्या मासिक सभेत हा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत गाळपाठी आलेल्या ऊसाची पहिली उचल १० जानेवारी २०२५ रोजी सभासदांच्या खात्यावर वर्ग करण्यात येणार आहे.

'सोमेश्वर कारखान्याची अंतिम एफआरपी अंदाजे ३ हजार १५० च्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. उर्वरित अंदाजे ३५० रुपये हंगाम संपल्यानंतर दिले जाणार असल्याचे जगताप यांनी सांगितले.

'सोमेश्वरचे चेअरमन पुरुषोत्तम जगताप म्हणाले की, सद्या गाळप झालेल्या पहिल्या उचलीपोटी प्रति मे.टनाला २ हजार ८०० रुपये देत आहोत. कारखान्याचा हंगाम संपल्यानंतर अंदाजे एफआरपी ३२० ते ३५० रुपये उर्वरित फरक राहिल. तो दिला जाणार आहे. हा दर देत असताना दरवर्षी प्रमाणे सोमेश्वर कारखाना राज्यातील इतर कारखान्याच्या तुलनेत अंतिम दराबाबत कुठेही कमी पडणार नसल्याची ग्वाही दिली.



## पिंपळे जगतापच्या अपघाताने ग्रामस्थ आक्रमक

# पंधराशे नको सुरक्षा द्या, महिलांचा आक्रोश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** पिंपळे जगताप येथे शिक्रापूर चाकण रस्त्यावर ६ जानेवारी रोजी शाळेमध्ये मुलाला सोडायला चाललेल्या इसमासह दोन बालकांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडल्याने, पिंपळे जगताप ग्रामस्थ आक्रमक झाले. ग्रामस्थांनी शोकसभा घेत सदर रस्त्याच्या सुधारणेसाठी शिक्रापूर चाकण रस्त्यावर रास्तारोको आंदोलन करत शासनाचे लक्ष वेधले. ग्रामस्थांनी सदर दुर्दैवी घटनेमुळे गावची येणारी यात्रा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

पिंपळे जगताप येथे शिक्रापूर चाकण रस्त्यावर वारंवार अपघात होत असताना, प्रशासनाकडे वारंवार रस्ता सुधारणेची मागणी केली आहे. मुलाला शाळेमध्ये सोडायला चाललेल्या गणेश खेडकर यांच्यासह त्यांच्या तन्मय व शिवम या दोन बालकांचा अपघातात मृत्यू झाल्याने ग्रामस्थ आक्रमक झाले. गावामध्ये मंगळवारी शोकसभा घेत, रास्तारोको आंदोलनाचा निर्णय त्यांनी घेतला. यावेळी सरपंच सोनाली नाईकनवरे, अशोक जगताप, ग्राहक पंचायतचे रमेश टाकळकर, पोलीस पाटील वर्षा थिटे, भाजपा किसान आघाडीचे प्रदेश सचिव जयेश शिंदे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष भगवान शेळके, चंदन सोंडेकर, भाजपा युवा मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष अशोक शेळके, माजी उपसरपंच सागर शितोळे, महेश जगताप, ज्ञानेश्वर शितोळे, अक्षय सोंडेकर, स्वप्नील शेळके, रामदास सोंडेकर, शिवाजी जगताप, निलेश फडतरे, सविता थिटे, स्वाती वळसे, मनीषा तांबे निर्मला वळसे यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.



शिक्रापूर पिंपळे जगताप : येथील अपघातानंतर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रास्तारोको आंदोलन करताना संतप्त ग्रामस्थ
छायाचित्र - शेरखान शेख

### पंधराशे नको, सुरक्षा द्या!

● पिंपळे जगताप येथील आंदोलना दरम्यान संतप्त आक्रमक महिलांनी पुढारी फक्त मते मागायला येतात, असे सांगत आम्हाला शासनाचे पंधराशे नको, मात्र सुरक्षा हवी अशी विनंती शासनाकडे केली आहे.

#रा




# प्रथिनांसह कर्बोदकंही हवी

**आहारतंत्र**

वजन कमी करण्यासाठी प्रथिनयुक्त पदार्थ खाण्याचा सल्ला दिला जातो. या प्रक्रियेत कर्बोदकांचं प्रमाण कमी केलं जातं. मात्र कर्बोदकांमुळे शरीराला ऊर्जा मिळत असल्याने प्रथिनं आणि कर्बोदकांचा समतोल साधला जाणं गरजेचं आहे. प्रथिनांसोबतच कर्बोदकांच्या सेवनाने वजन कमी होण्यास मदत होते. प्रथिनं आणि कर्बोदकांचा समतोल कसा साधायचा, याविषयी...

✻ चिकनमध्ये भरपूर प्रथिनं असतात. चिकन उकडून, भाजून किंवा ग्रील करून खाता येतं. चिकन शिजवताना लाल तिखट घातल्याने शरीराला कर्बोदकं मिळू शकतील. १०० ग्रॅम लाल तिखटात ५० ग्रॅम कर्बोदकं आणि ३५ ग्रॅम डाएटरी फायबर असतं. यामुळे प्रथिनं आणि कर्बोदकं यांचा समतोल साधता येतो.



✻ कर्बोदकं आणि क जीवनसत्त्वाने समृद्ध भोपळी मिरची आणि प्रथिनयुक्त अंडं यांचं एकत्रित सेवन करता येईल. अंड्यामुळे चयापचय क्रिया सुधारते तर भोपळी मिरची चरबी कमी करण्याचं काम करते. जेवणात आमटी आणि पोळी खाता येईल. ओटमील, पेरु आणि कठीण कवचाची फळं एकत्र खाता येतील.

# देशातील ५५ टक्के लोकांना प्रदूषणाचा फटका

**आरोग्यवेध**

देशात सध्या प्रदूषणाचा प्रकोप प्रचंड वाढला आहे. त्यामुळे नागरिकांना विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे. या भयंकर प्रदूषणामुळे देशातील अर्ध्याहून अधिक लोकांना घसा, नाक आणि कानाची समस्या उद्भवली आहे. एका अहवालात याबाबत गौप्यस्फोट करण्यात आला आहे. देशातील प्रदूषणावर एक संशोधन करण्यात आले. त्यात देशातील ५५ टक्के लोक नाक, कान आणि घशाच्या आजाराने ग्रासलेले असल्याचं आढळून आले आहे. देशातील काही महत्त्वाच्या शहरात अभ्यास करण्यात आला. त्यातून ही आकडेवारी आली आहे. 'प्रिस्टिन केअर' नावाच्या आरोग्य संस्थेने हे सर्वेक्षण केले. दिल्ली, मेरठ, फरिदाबाद, नोएडा, गाझियाबाद, रोहतक, चंदीगड, कानपूर आदी शहरात ५६ हजार६ ७६ लोकांवर आधारित हे संशोधन केले गेले. यातून प्रदूषणामुळे ४१ टक्के लोकांना नेत्रविकार असल्याचे आढळून आले आहे. डोळ्यात पाणी येणे आणि डोळ्यात जळजळ होणे या समस्या या लोकांना जाणवत आहेत.



**✻ मास्क घालूनच फिरा**

हवेचे वाढते प्रदूषण ही चिंतेची गोष्ट आहे. प्रदूषणामुळे सर्वाधिक फटका लहान मुलांना बसत आहे. प्रदूषित हवा नाक आणि कानाच्या संवेदनशील श्लेष्मा आवरणात त्रास निर्माण करू शकते. त्यामुळे नाक आणि कानांच्या अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. अनेक भागात प्रदूषण अजूनही अत्यंत जास्त आहे. त्यामुळे लोकांनी त्यांच्या आरोग्याची काळजी घेऊन मास्क घालणे अत्यंत आवश्यक आहे,

**✻ डोळे जपा**


प्रदूषणाचा परिणाम फक्त नाक आणि कानांवरच नाही, तर डोळ्यांवरदेखील झाला आहे. अनेक लोकांना डोळ्यांत जळजळ होणे, पाणी येणे, डोळे लाल होणे, चुरचुरणे अशा समस्या जाणवू लागल्या आहेत. त्यामुळे सर्वांनीच डोळ्यांच्या आरोग्यालाही विशेष महत्व दिले पाहिजे. प्रदूषण आणि त्याच्या परिणामांनी आरोग्यावर होणारा हानीकारक प्रभाव सहज लक्षात घेतला पाहिजे, असा सल्लाही तज्ज्ञ देत आहेत.

**✻ गरोदर महिलांनी काळजी घ्या**

डोळे, कान, नाक आणि घशाचा त्रास होत असेल तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या. या बाबतीत बेसावध राहणे धोक्याचे ठरू शकते. प्रदूषणामुळे लोक त्रस्त आहेत. वृद्ध व्यक्ती, मुले आणि गरोदर महिलांना यापासून संरक्षणासाठी विशेष काळजी घ्यावी लागेल. ज्यांची रोग प्रतिकारक शक्ती कमी आहे, त्यांना प्रदूषणाचा धोका अधिक आहे. म्हणूनच प्रदूषणापासून वाचण्यासाठी काळजी घ्या. बाहेर पडताना पूर्ण खबरदारी घ्या. नाक, कान, घशाचा संसर्ग असलेल्यांच्या संपर्कात येऊ नका.

# कर्करोगाच्या उपचारात नवीन शोध उपयुक्त

भारतातील प्रमुख संशोधन संस्था 'एम्स' (ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस) च्या शास्त्रज्ञांनी एक मोठा शोध लावला आहे. तो कॅन्सरच्या उपचारात आणि निदानासाठी उपयुक्त ठरू शकतो. हे संशोधन 'एम्स'च्या बायोकेमिस्ट्री विभागाचे डॉ. शुभदीप कुंडू (पीएच. डी संशोधक) यांनी डॉ. अशोक शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली केले आहे. हे संशोधन मॅमेलियन जीनोम (स्प्रिंगर नेचर पब्लिकेशन) मध्ये प्रकाशित करण्यात आले आहे.



या अभ्यासात असे आढळून आले आहे, की बी-प्रकारचे लॅमिन्स, विशेषतः लॅमिन बी१ आणि लॅमिन बी२, कर्करोगाच्या प्रगतीवर आणि रुग्णांच्या जगण्याच्या शक्यतांवर खोल परिणाम करतात. 'लॅमिन्स' हे प्रथिने आहेत, ते पेशीच्या केंद्रकांना स्थिरता प्रदान करतात. 'एम्स'च्या शास्त्रज्ञांनी, विविध प्रकारच्या कर्करोगात 'आरएनए सिक्वेन्सिंग' तंत्रज्ञानाचा वापर करून असे निरीक्षण केले, की लॅमिन बी१ आणि लॅमीन बी२ चे उच्च पातळीचे उत्पादन कर्करोगाच्या रुग्णांना धोका निर्माण करू शकते. ज्या रूग्णांमध्ये लॅमिन बी १ आणि लॅमीन बी२ दोन्हीचे प्रमाण जास्त होते, त्यांचे आयुष्य लक्षणीयरीत्या कमी असल्याचे आढळून आले. जेव्हा हे दोन लॅमिनिन मोठ्या प्रमाणात एकत्रितपणे तयार होतात, तेव्हा कर्करोग अधिक घातक होण्याची शक्यता वाढते.

संशोधनात असेही समोर आले आहे, की लॅमिन बी १ आणि लॅमीन बी २ कर्करोगाच्या ट्यूमर सूक्ष्म वातावरणाशी संबंधित आहेत. लॅमिन बी१ थेट सीडी+ टी-सेल्स आणि टाइप-२ टी-हेल्पर सेल्स (टीएच२) शी संबंधित आहे. हे सूचित करते, की ते रोगप्रतिकारक पेशींच्या सहभागावर आणि कर्करोगाच्या प्रतिसादावर परिणाम करू शकतात. लॅमिन बी २ देखील काही प्रमाणात या रोगप्रतिकारक पेशींशी संबंधित असल्याचे आढळले; परंतु त्याचा प्रभाव लॅमिन बी १ पेक्षा कमी होता.

**✻ नऊ प्रोटिन्सची ओळख**

संशोधकांनी कॅन्सरमध्ये लॅमिन बी २ शी संबंधित नऊ प्रोटीन्स ओळखले आहेत, जे सेल डिव्हिजन आणि साइटोकिनेसिसवर परिणाम करतात. या शोधाने हे स्पष्ट केले आहे, की बी-टाइप लॅमिन्स केवळ कर्करोगाच्या वाढीसाठी जबाबदार नाहीत, तर ते बायोमार्कर म्हणूनदेखील वापरले जाऊ शकतात जे रुग्णाची स्थिती किती गंभीर आहे हे दर्शवतात.

**✻ बी-टाइप लॅमिन्स कॅन्सरच्या उपचारात उपयुक्त**

बी-टाइप लॅमिन्स कर्करोगाच्या उपचारात नवीन लक्ष्य म्हणून काम करू शकतात. लॅमिनिनवर आधारित औषधे आणि थेरपी विकसित करणे ही एक महत्त्वाची पायरी असू शकते. जर या प्रथिनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पद्धती विकसित केल्या गेल्या, तर ते कर्करोगाच्या रुग्णांना चांगले उपचार देऊ शकतात. हा शोध कर्करोग रुग्ण आणि वैद्यकीय समुदाय दोघांसाठी आशेचा किरण आहे. जर लॅमिनिन्सची भूमिका अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता आली, तर कर्करोगाचे निदान आणि उपचारांसाठी ते 'गेम चेंजर' ठरू शकते.

# का असतात सहा बोटं?

**वेगळं काही**

माणसाच्या दोन्ही हातांना मिळून दहा बोटं असतात. मात्र काहींच्या एका हाताला किंवा पायाला एखादं जास्तीचं बोट असतं. तुमच्याही संपर्कात अशी काही माणसं आली असतील. हात किंवा पायाला सहा बोटं असणं हा दैवी चमत्कार मानला जातो. पण खरंच असं असतं का? असा दैवी चमत्कार मोजक्याच लोकांच्या बाबतीत का घडतो, हा विचार कधी तुमच्या मनाला शिवला आहे का? खरं पाहता सहावं बोट हा कोणताही दैवी चमत्कार नाही तर तो एक विकार आहे. त्याला पॉलिडॅक्टिली असं म्हटलं जातं. ही व्याधी जडलेल्या माणसांना जन्मजात एक किंवा दोन अतिरिक्त बोटं असतात. हे अतिरिक्त बोट एका किंवा दोन्ही हातांना अथवा पायांना असू शकतं.

पॉलिडॅक्टिली हा अनुवंशिक विकार आहे. त्यामुळे एकाच कुटुंबातल्या अनेकांना ही समस्या असू शकते. हा विकार पुढच्या पिढ्यांमध्येही दिसून येतो. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होणाऱ्या या विकाराला फॅमिलियल पॉलिडॅक्टिली असं म्हटलं जातं. पॉलिडॅक्टिली अनुवंशिक नसेल तर आईच्या गर्भात असताना बाळाच्या जनुकांमध्ये होणारे बदल याला कारणीभूत ठरतात.

व्याधीच्या प्रकारावरून त्यावरच्या उपायांची दिशा ठरते. अनेकदा बोटांच्या जागी एखादा मांसल भाग दिसतो. या भागाला हाड नसतं. यामुळे रुग्णाला फारसा त्रास होत नाही. त्याच्या दैनंदिन आयुष्यावरही याचा परिणाम होत नाही. त्यामुळे यावर उपचार घेण्याची गरज नसते. मात्र हा भाग फार विचित्र दिसत असेल तर काही उपचार घेता येतात. हाड नसलेलं बोट पटकन काढता येतं. मात्र पूर्ण वाढ झालेलं किंवा वापरात असणारं अतिरिक्त बोट काढण्यासाठी शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेणं योग्य ठरतं. अर्थातच हे बोट काढावं की नाही याचा निर्णय सर्वस्वी तज्ज्ञांचा असतो. तपासणीअंती ते हा निर्णय घेतात.



अतिरिक्त अंगठ्यावरचे उपचार काहीसे गुंतागुंतीचे ठरू शकतात. यामुळे मूळ अंगठ्याच्या कार्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे ही शस्त्रक्रिया अत्यंत काळजीपूर्वक करावी लागते. सेंट्रल पॉलिडॅक्टिली या प्रकारात मधल्या, पहिल्या किंवा अनामिकेलाच अतिरिक्त बोट जोडलेलं असतं. अशा परिस्थितीत डॉक्टर अतिरिक्त बोट कायम ठेवतात. मात्र दुष्परिणाम टाळण्यासाठी लिगामेंट्स आणि स्नायूबंध काढून टाकले जातात. इतकंच नाही, तर शस्त्रक्रियेद्वारे दोन्ही बोटं काढून त्या जागी नवं बोटही बसवलं जातं. इतर काही जनुकीय कारणांमुळे पॉलिडिक्टिलीची समस्या उद्‌भवली असेल तर रुग्णाला इतर वैद्यकीय उपचारांची गरज पडू शकते. त्यामुळे हात किंवा पायाला असणाऱ्या अतिरिक्त बोटाकडे फक्त दैवी चमत्कार म्हणून बघू नये. हा एक विकार आहे. त्यामुळे ही समस्या असणाऱ्यांनी त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणं गरजेचं आहे.

## धोका स्टॅटिन्सचा

**नवसंशोधन**

कोलेस्टेरॉलचं प्रमाण कमी करणारी औषधं म्हणजेच स्टॅटिन्स घेणाऱ्यांना टाईप २ मधुमेह होण्याचा धोका दुपटीने वाढतो, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. स्टॅटिन्स या औषधांच्या प्रकारामुळे रक्तातलं कोलेस्टेरॉल कमी होतं तसंच उच्च रक्तदाबावरही नियंत्रण मिळवता येतं. या औषधांमुळे हृदयविकार आणि स्ट्रोकचा धोकाही कमी होत असल्याने अनेकांची स्टॅटिन्सला पसंती असते. त्यामुळे संशोधकांनी स्टॅटिन्सच्या परिणामांचा अभ्यास केला. तेव्हा ही औषधं घेणाऱ्यांना ती न घेणाऱ्यांच्या तुलनेत मधुमेह होण्याचा धोका दुपटीने अधिक असल्याची बाब समोर आली. कोलेस्टरॉल कमी करणारी ही औषधं दोन वर्षांपेक्षा अधिक काळ घेणाऱ्यांमध्ये मधुमेहाचा धोका तिपटीने वाढण्याची शक्यता असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.




## टूथपेस्टमुळे ऑस्टिओपॉरॉसिस?

**दंतारोग्य**


टूथपेस्टसह साबण आणि विविध प्रकारच्या क्रीम्समध्ये वापरल्या जाणाऱ्या ट्रायक्लोसॅन नामक रसायनामुळे ऑस्टिओपॉरॉसिसचा धोका वाढू शकतो, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. त्यातही महिलांना हा धोका अधिक प्रमाणात असतो, असंही हे संशोधन सांगत. टूथपेस्टमध्ये हे रसायन असू शकतं. यासोबतच शरीराच्या स्वच्छतेसाठी वापरल्या जाणाऱ्या उत्पादनांमध्येही ते असतं. ट्रायक्लोसॅन आणि हाडांचं आरोग्य यांचा संबंध तपासण्यासाठी १८४८ महिलांचा अभ्यास करण्यात आला.




# टाकून द्या या वस्तू

**आपण कुठे चुकतो?**

एखाद्या विकाराचा उगम आपल्या घरातूनच होऊ शकतो. वापरात असणाऱ्या असंख्य वस्तूंमधली रसायनं विविध व्याधींना आमंत्रण देतात तर काही वस्तू ताण वाढवणाऱ्या ठरु शकतात. इच्छा असूनही आपण काही वस्तू टाकून देणं टाळत रहातो. घरातल्या कोणत्या वस्तू हानिकारक ठरतात हे जाणून घेऊ या.



✻ प्लास्टिकच्या दुष्परिणामांबद्दल आपण बरंच काही वाचतो, ऐकतो. पण वापरायला सुलभ आणि वजनानं हलकं प्लास्टिक वापरातून लवकर बाद होत नाही. मात्र पीसी ही अक्षरं छापलेले प्लास्टिकचे डबे खूप घातक असतात हे जाणून घ्यायला हवं. पीसी म्हणजे पॉलिकार्बोनेट. यात बिल्फेनॉल नामक रसायन असू शकतं. हे रसायन शरीरात गेल्याने श्वसनविकार, हृदयविकार, उच्च रक्तदाब यासारख्या समस्या निर्माण होतात.

✻ एअर फ्रेशनर्समधली रसायनं आरोग्यासाठी हानिकारक ठरतात. म्हणूनच फ्रेशनर्सचा वापर टाळावा.

✻ जुने, खराब झालेले टूथब्रश घरात ठेऊ नका. या ब्रशवर बॅक्टेरियांचा वास असतो. यामुळे रोगांना निमंत्रण मिळतं.

✻ जुने, घट्ट होणारे कपडे तुमचा ताण वाढवतात. त्यामुळे असे कपडे देऊन टाका.

# तुळस आहे गुणकारी

**आयुर्वेद आणि विकार**

हिंदू धर्मात तुळशीचं महत्त्व आहेच शिवाय आयुर्वेदानुसारही ही अत्यंत गुणकारी अशी औषधी वनस्पती आहे. म्हणूनच विविध विकारांवर उपचार करताना तुळशीची पूड वापरली जाते. हृदयविकार, कीटकदंश, ताप, श्वसनाचे विकार, त्वचाविकार अशा असंख्य व्याधींवर तुळस गुणकारी ठरते. तुळशीच्या औषधी गुणधर्मांविषयी...



✻ तुळशीत जीवाणू, विषाणू तसंच रोगांना कारणीभूत ठरणाऱ्या विविध जंतूंचा नाश करणारे गुणधर्म असतात. तापाला कारणीभूत ठरणाऱ्या जंतूसंसर्गाचा प्रभाव कमी करण्याची क्षमता तुळशीत असल्याने ताप तसंच सर्दी, खोकल्यावर हा रामबाण उपाय ठरू शकतो.

✻ तुळशीतल्या औषधी तेलांमुळे स्वादुपिंडाचं कार्य सुरळीत सुरू राहण्यास मदत होते. यामुळे इन्शुलिनची निर्मिती योग्य प्रमाणात होऊन मधुमेहाला आळा घालता येतो. तुळशीच्या सेवनाने रक्तातली साखर नियंत्रणात ठेवता येते.


✻ तुळस शरीरातल्या युरिक ॲसिडची पातळी कमी करते. तुळशीतल्या औषधी घटकांमुळे मूत्रमार्गातले खडे विरघळू शकतात.

✻ तुळशीमुळे रोगप्रतिकारकशक्ती वाढते. सर्दी-खोकल्यासा त्रास कमी होतो. दाह कमी करण्याच्या क्षमतेमुळे श्वसनाच्या विकारांना आळा घालता येतो.

## 'मॅक्युलर डिजनरेशन'विषयी...

**डोळ्यांचं आरोग्य**

'मॅक्युलर डिजनरेशन' हा प्रौढांना होणारा नेत्रविकार आहे. कोरडा आणि ओला असे याचे दोन प्रकार आहेत. हा विकार पूर्णपणे बरा होऊ शकत नसला तरी भविष्यातलं डोळ्यांचं नुकसान टाळता येतं. योग्य औषधोपचारांनी रुग्ण सर्वसामान्य जीवन जगू शकतो. या विकाराला प्रतिबंध करण्यासाठी धूम्रपान सोडायला हवं. डोळ्यांची नियमित तपासणी करणंही गरजेचं आहे. डोळ्यांवर मधुमेहासारख्या विकाराचा विपरीत परिणाम होतो. त्यामुळे मधुमेह नियंत्रणाचे उपाय करणंही गरजेचं आहे. हा विकार प्रौढांना होत असला तरी तरुणांनीही योग्य ती खबरदारी घ्यायला हवी.



# ल्युकेमियाची लक्षणं

**व्याधी विचार**

ल्युकेमिया म्हणजे रक्तपेशी किंवा बोन मॅरोचा कर्करोग. याला रक्ताचा कर्करोग असंही म्हटलं जातं. शरीरातल्या पांढऱ्या रक्तपेशींच्या निर्मितीतले अडथळे या विकाराला कारणीभूत ठरतात. भारतात दर वर्षी जवळपास एक दशलक्ष लोकांना रक्ताच्या कर्करोगाचं निदान होतं. कॅन्सरग्रस्त रक्तपेशींवरून रक्ताच्या कर्करोगाचा प्रकार ठरतो. प्राथमिक टप्प्यात या विकाराचं निदान झालं तर रूग्ण वाचण्याची शक्यता असते. म्हणूनच या विकाराची लक्षणं जाणून घेणं गरजेचं आहे.

फारसे शारीरिक श्रम न करता थकवा येत असेल तर रक्ताची तपासणी करायला हवी. वारंवार येणारा थकवा शरीरातल्या लाल रक्तपेशींच्या कमतरतेकडे अंगुलीनिर्देश करतो. ॲनिमियामुळेही असं होऊ शकतं. मात्र लाल रक्तपेशींची कमतरता रक्ताच्या कर्करोगाला निमंत्रण देऊ शकते.

एकसारखी धाप लागणं हे ल्युकेमियाचं लक्षण असू शकतं. श्रमामुळे शरीर अशक्त होऊ शकतं. परिणामी, धाप लागू शकते. यामुळे चार जिने चढणंही कठीण होऊन बसतं. जिने चढल्यानंतर प्रचंड दमणूक होते.



कोणत्याही दुखापतीशिवाय जखम होत असेल किंवा शरीराचा एखादा भाग काळानिळा पडत असेल तर आरोग्य तपासणी करून घ्यायला हवी कारण हे ल्युकेमियाचं लक्षण असू शकतं. प्लेटलेट्स कमी होणं, रक्त साकळणं अशा कारणांमुळे ही समस्या निर्माण होते. शरीराच्या विविध भागांवर काळपट-निळसर डाग दिसतात. त्यातही पाय आणि हातांवर ते अधिक प्रमाणात दिसून येतात.

प्रत्येक वेळी तोंडाच्या अस्वच्छतेमुळेच हिरड्या सुजतात असं नाही तर हे तोंडाच्या कर्करोगाचं लक्षणही असू शकतं. हिरड्यांचा आकार वाढण्याच्या त्रासाला शास्त्रीय भाषेत गिंगायव्हल हायपरप्लेसिया असं म्हणतात. ल्युकेमियामुळे ही समस्या निर्माण होते.

वरचेवर येणारा ताप हे जंतूसंसर्ग आणि रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्याचं लक्षण असतं. रक्ताच्या कर्करोगमुळे असं होऊ शकतं.

झोपेत घाम येणं ही सुद्धा सर्वसाधारण बाब नाही. वारंवार उद्‌भवणारी डोकेदुखी रक्ताच्या कर्करोगाचं किंवा डोक्यातल्या रक्तस्रावाचं लक्षण असू शकते.

## लाभ दुधाचे

**आजीबाईंचा बटवा**


दूध आरोग्यासाठी लाभदायी असतं. यातले नऊ पोषक घटक विविध आजारांपासून आपला बचाव करतात. दुधात कॅल्शियम आणि प्रथिनांसह पोटॅशियम, फॉस्फरस, ड, बी १२, अ आणि बी २ ही जीवनसत्त्वं आणि नियासिन असतं. कॅल्शियममुळे हाडं आणि दात बळकट होतात. प्रथिनांमुळे स्नायूंना शक्ती मिळते. पोटॅशियममुळे रक्तदाबावर नियंत्रण मिळवता येतं. शरीराला फॉस्फरसचीही गरज असते. बी २ हे जीवनसत्त्व अन्नाचं रूपांतर ऊर्जेत करायला मदत करतं तर नियासिनमुळे चयापचय क्रिया सुधारते. अ जीवनसत्त्व डोळ्यांच्या आरोग्यासाठी गरजेचं असतं. त्यामुळे पोषणमूल्यांचा स्रोत असणारं दूध दररोज प्यायला हवं.





### अभिषेक बच्चन बनला युरोपियन T20 प्रीमियर लीगमधील संघाचा सहमालक!

● अभिनयाच्या जगासोबतच अभिषेक बच्चनला खेळातही रस आहे. क्रीडाविश्वातही अभिनेता अनेकदा पैसे गुंतवतात दिसला आहे. तसेच आता त्याने युरोपियन T20 प्रीमियर लीग (ETPL) मध्ये पैसे गुंतवले आहेत. अभिषेक या लीगचा सहमालक बनला आहे. ही लीग यावर्षी जुलैपासून सुरू होणार आहे. या लीगमध्ये अभिषेक बच्चनची गुंतवणूक हे जागतिक क्रीडा क्षेत्रातील योगदानाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. यावर त्यांनी आनंद व्यक्त केला आहे. आणि चाहत्यांना 'ही माझी सुरुवात आहे' असे सांगितले आहे.



# बुमराहला पर्याय कोण?

## चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये त्याच्या खेळण्यावरही प्रश्नचिन्ह

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मालिकेत सर्वाधिक ३२ विकेट्स घेतलेला जसप्रीत बुमराह दुखापतग्रस्त झाला. त्याला ऑस्ट्रेलियाविरुद्ध सिडनीमध्ये पाचवा कसोटी सामना खेळताना पाठीची दुखापत झाली.

त्यामुळे या सामन्यातील दुसऱ्या डावात त्याने गोलंदाजीही केली नाही. आता यामुळे भारताचे टेन्शन वाढले आहे. कारण २२ जानेवारीपासून भारतीय संघ इंग्लंड विरुद्ध टी२० आणि वनडे मालिका खेळणार आहे.

त्यानंतर १९ फेब्रुवारीपासून चॅम्पियन्स ट्रॉफी खेळण्यासाठी भारतीय संघ युएईला जाणार आहे. म्हणजेच चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी आता जवळपास केवळ एक महिन्याचा कालावधी भारतीय संघाकडे आहे. अशात भारतीय संघाला बुमराहच्या दुखापतीची चिंता सतावत आहे.

सध्या तरी बुमराहची दुखापत किती गंभीर आहे, याबाबत माहिती समोर आलेली नाही. पण त्याची दुखापत ग्रेड वनची असेल तर साधारण दोन ते तीन आठवड्यांनंतर तो खेळू शकतो. पण ग्रेड टूची असेल, तर मात्र सहा आठवडे त्याला क्रिकेट खेळता येणार नाही.

ग्रेड थ्रीची दुखापत असेल, तर तो किमान तीन महिने क्रिकेट खेळू शकणार नाही. म्हणजेत भारतीय संघाला हीच आशा करावी लागेल की त्याची दुखापत गंभीर नसावी.

मात्र,जर त्याला या दुखापतीमुळे चॅम्पियन्स ट्रॉफी खेळता आली नाही, तर त्याच्याऐवजी भारताला दुसऱ्या पर्यायाचा विचार करावा लागेल. यादरम्यान हे देखील लक्षात घ्यावे लागेल की मोहम्मद सिराज आणि अर्शदीप सिंग हे भारताच्या मर्यादीत षटकांमधील नियमित खेळाडू असल्याने ते चॅम्पियन्स ट्रॉफी खेळण्याचीच दाट शक्यता आहे.

याशिवाय मोहम्मद शमीच्या दुखापतीवर त्याचे पुनरागमन अवलंबून आहे.

**हर्षित राणा**



● ऑस्ट्रेलिया दौऱ्यातून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणारा हर्षित राणा हा एक पर्याय ठरू शकतो. सध्या त्याला भारतीय संघात मिळणारी संधी पाहाता त्याच्याकडे बुमराहसाठी एक पर्याय म्हणून पाहिले जाऊ शकते. तो अर्शदीप सिंग आणि सिराजसाठी बॅकअप पर्याय चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी ठरू शकतो.

**यश दयाल**



● डावखुरा वेगवान गोलंदाज यश दयालचेही नाव गेल्या काही महिन्यांपासून भारतीय क्रिकेट वर्तुळाच चर्चेत आहे. त्याला राखीव खेळाडूंमध्येही भारताच्या संघात स्थान मिळत आहे. त्याची देशांतर्गत क्रिकेटमधीलही कामगिरी चांगली होत आहे. अशात त्याचाही विचार चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी केला जाऊ शकतो. त्याने लिस्ट ए क्रिकेटमध्ये २३ सामन्यांमध्ये ५४ विकेट्स घेतल्या आहेत.

**मुकेश कुमार**



● बंगालचा वेगवान गोलंदाज मुकेश कुमार बुमराहच्या जागेवर भारतीय संघाच चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये खेळण्यासाठी एक चांगला पर्याय ठरू शकतो. त्याने भारतासाठी ३ कसोटी आणि ६ वनडे, तर १७ टी२० सामने खेळले आहेत. त्याने कसोटीत ७, वनडेत ५ आणि टी२०मध्ये भारतासाठी २० विकेट्स घेतल्या आहेत.

**आवेश खान**



● भारताचा वेगवान गोलंदाज आवेश खान याने भारतासाठी ८ वनडे आणि २५ टी२० सामने खेळलेत. त्याने यात अनुक्रमे ९ आणि २७ विकेट्स घेतल्या आहेत. तो नुकताच नोव्हेंबर २०२४ मध्ये दक्षिण आफ्रिका दौऱ्यातही टी२० मालिकेत खेळला होता. तो देखील मर्यादीत षटकांसाठी भारतीय क्रिकेटमधील चर्चित नाव असलेल्या खेळाडूंपैकी एक आहे.

**प्रसिद्ध कृष्णा**



● ऑस्ट्रेलियाविरुद्ध सिडनी कसोटीत प्रसिद्ध कृष्णाने चांगली गोलंदाजी केली होती. त्याने ६ विकेट्स घेतल्या होत्या. त्याच्याकडे चांगला वेग आहे.

## १३ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत एके स्पोर्टस संघ अंतिम फेरीत



समिक सावंत



यश भिक्यागोलू

**पुणे :** चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक 13 वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत एके स्पोर्टस संघाने आपली विजयी मालिका कायम ठेवत अंतिम फेरीत प्रवेश केला. धायरी येथील सहारा क्रिकेट अकादमी व स्टार क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत समिक सावंत(5-22 व नाबाद 17) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर एके स्पोर्टस संघाने ब्रिलियंट्स स्पोर्टस अकादमी संघाचा 33 धावांनी पराभव करून तीन विजयासह अंतिम फेरी गाठली. अन्य लढतीत यश भिक्यागोलू (नाबाद 63धावा) याने केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर ओएसिस क्रिकेट क्लब संघाने टीएलबी रत्नागिरी क्रिकेट अकादमी संघाचा 7 गडी राखून पराभव करत पहिला विजय मिळवला. विजेता टीम चे सामनावीर - समिक सावंत, यश भिक्यागोलू.

## ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमी, ट्रिनिटी स्पोटर्स ॲकॅडमी उपांत्य



भुजंग धुळगुंडे



स्वरा गाडे

**पुणे :** एसए-आरके ॲकॅडमी तर्फे आयोजित 'एसए-आरके अजिंक्यपद करंडक' १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब क्रिकेट (२५ षटके) स्पर्धेत ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमी आणि ट्रिनिटी स्पोटर्स ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून उपांत्य फेरी गाठली.

मांजरी येथील पीजी क्रिकेट मैदान आणि हांडेवाडी येथील एसए-आरके ॲकॅडमी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत स्वरा गाडे हिने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमीने क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीचा ८ गडी राखून सहज पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीचा डाव ८० धावांवर गडगडला. ब्रिलीयंट्सच्या स्वरा गाडे हिने ५ धावांमध्ये ३ गडी बाद करून सुरेख गोलंदाजी केली. तिला दुसऱ्या बाजुने प्रणय आवळे याने साथ दिली. त्याने १७ धावांमध्ये ३ गडी टिपले. हे लक्ष्य ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमीः १२.२ षटकात व २ गडी गमावून पूर्ण केले. रूद्र पाबळे याने ३६ धावांची आणि रितम सेन याने नाबाद २५ धावांची खेळी करून संघाला सहज विजय मिळवून दिला. भुजंग धुळगुंडे याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे त्रिनिटी स्पोटर्स ॲकॅडमीने एस्क्वेअर स्पोर्ट्स ॲकॅडमीचा ३८ धावांनी सहज पराभव करून अंतिम चार संघांमध्ये आपले नाव निश्‍चित केले. पहिल्यांदा खेळणाऱ्या त्रिनिटी स्पोटर्स ॲकॅडमीने २५ षटकामध्ये १६३ धावा धावफलकावर लावल्या. यामध्ये विहान हुगे (३८ धावा), गुरू राजोळे (२९ धावा), भुजंग धुळगुंडे (२६ धावा) आणि युवराज चौंडकर (२० धावा) यांनी संघाला धावा जमवून दिल्या. या लक्ष्याचा पाठलाग करताना एस्क्वेअर स्पोर्ट्स ॲकॅडमीचा डाव १२५ धावांवर मर्यादित राहीला. इझान इनामदार याने ३५ धावांची आणि शौर्य तावरे याने ३० धावांची खेळी केली. परंतु यांच्याशिवाय खेळपट्टीवर कोणताही फलंदाज धावा करू शकला नाही. अर्णव धावरे आणि सुजल राणे या दोघांनी प्रत्येकी दोन तर, भुजंग धुळगुंडे याने एक गडी बाद करून संघाचा विजय सोपा केला.

## लक्ष्य सेन आणि पीव्ही सिंधू करणार भारतीय संघाचे नेतृत्व

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**मुंबई :** पीव्ही सिंधू आणि लक्ष्य सेन – इंडिया ओपन सुपर 750 बॅडमिंटन स्पर्धा 14 जानेवारीपासून नवी दिल्ली येथे सुरू होत आहे. त्याच वेळी, भारताच्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या संघाचे नेतृत्व लक्ष्य सेन आणि पीव्ही सिंधू करणार आहेत. या स्पर्धेत ऑलिम्पिक चॅम्पियन व्हिक्टर एक्सेलसेन, अॅन से यंग आणि जगातील नंबर 1 खेळाडू शी युकी सारखे सुपरस्टार आपली जादू पसरवताना दिसणार आहेत. इंडिया ओपन सुपर 750 बॅडमिंटन स्पर्धेचे सामने इंदिरा गांधी स्टेडियम आणि केडी जाधव इनडोअर हॉलमध्ये खेळवले जाणार आहेत. याशिवाय या स्पर्धेत भारताचे एकूण २१ खेळाडू असतील.

'जागतिक मंचावर भारतीय बॅडमिंटनची वाढ आणि उदय..'

त्याचवेळी भारतीय बॅडमिंटन संघटनेचे सरचिटणीस संजय मिश्रा यांनी एक प्रसिद्धी जारी केली आहे. ज्यामध्ये असे म्हटले आहे की सुपर 750 स्पर्धेत भारतीय बॅडमिंटनचा किती विकास झाला आहे हे लक्षात येते. जागतिक स्तरावर भारतीय बॅडमिंटनच्या वाढीचे आणि उदयाचे हे एक उल्लेखनीय लक्षण आहे. ते पुढे म्हणाले की ही फक्त सुरुवात आहे. 2025 असे वर्ष असेल ज्यामध्ये मोठ्या नावांसह आणखी नावांचा समावेश असेल. या स्पर्धेच्या मागील आवृत्तीत भारतातील 14 खेळाडूंनी भाग घेतला होता,

पीडीएफए युथ लीग

## फोर लायन्स् ॲकॅडमी, यंग ब्ल्युज् एलिट पुणे, संघांची विजयी कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** 'पीडीएफए युथ लीग' फुटबॉल स्पर्धेत सिटी एफसी पुणे संघाने दिड डझन गोल मारून वर्चस्व गाजवले. फोर लायन्स् फुटबॉल ॲकॅडमी, यंग ब्ल्युज् एलिट पुणे आणि स्टॅलियन्स् पुणे एफसी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

कात्रज येथील भारती विद्यापीठ मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत सिटी एफसी पुणे संघाने जुन्नर तालुका एफसी संघाच्या सामन्यात १८ गोल मारून वर्चस्व गाजवले. यामध्ये महेश राठोड याने १० गोल नोंदविले. याशिवाय प्रियांशु के. याने ४ गोल, पार्थ घोडके याने २ गोल तर, तन्मय एम. आणि सोहम जाधव यांनी प्रत्येकी एकेक गोल केला. दुसऱ्या सामन्यामध्ये फोर लायन्स् फुटबॉल ॲकॅडमीने स्टॅलियन्स् पुणे एफसी (अ) चा ७-१ असा सहज पराभव केला. फोर लायन्सकडून आरूष ठाकरे, रूग्वेद मुसळे आणि आर्यमन अरविंद यांनी प्रत्येकी दोन गोल केले. तन्मय एस. याने एक गोल नोंदविला. स्टॅलियन्स् पुणे एफसीकडून आरव भारव्दाज याने एक गोल केला.

यंग ब्ल्युज् एलिट पुणे संघाने साई फुटबॉल ॲकॅडमीचा ५-२ असा पराभव केला. यंग ब्ल्युज् एलिट पुणे संघाकडून रणवीर पाटील आणि दर्शिल यादव यांनी प्रत्येकी दोन गोल केले. आर्यवर्धन काकडे याने एक गोल नोंदविला. साई फुटबॉल ॲकॅडमीकडून वीर मांगुडकर व हर्ष अवरत्नमणी यांनी प्रत्येकी एकेक गोल केला. स्टॅलियन्स् पुणे एफसी ब संघाने स्पोर्टीव्ह फुटबॉल ॲकॅडमीचा ६-१ असा पराभव केला. स्टॅलियन्स् पुणे एफसीकडून नीरज कारळे आणि आयुष जुन्नरकर यांनी २ गोल केले. साहील जैस्वाल आणि अजिंक्य श्रीपाद यांनी यांनी प्रत्येकी एकेक गोल करून संघाची आघाडी वाढवली.

## ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी शूटिंग स्पर्धेसाठी 'सूर्यदत्त'च्या रोहित राजेंद्र वाघ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** चंदीगड येथील पंजाब विद्यापीठात होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी शूटिंग स्पर्धेसाठी सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड मास कम्युनिकेशनमध्ये (एसआयएमएमसी) एमबीएच्या प्रथम वर्षातील विद्यार्थी रोहित राजेंद्र वाघ याची निवड झाली आहे. रोहित २५ मीटर रॅपिड फायर पिस्टल प्रकारात पुण्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. बालेवाडी शूटिंग रेंज येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत रोहितने चौथे स्थान मिळवले.

काही दिवसांपूर्वी चेन्नईमध्ये (तामिळनाडू) आयोजित ३३ व्या ऑल इंडिया जी. व्ही. मावळणकर शूटिंग स्पर्धेत ५० मीटर प्रकारात रोहितने कांस्यपदक पटकविले होते. नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडियातर्फे (एनआरएआय) दिल्ली येथे डॉ. करणी सिंग शूटिंग रेंजवर होणाऱ्या ६७ व्या राष्ट्रीय शूटिंग स्पर्धेत सहभागी होणार आहे. शिवछत्रपती पुरस्कार विजेते शिवराज ससे आणि सविता मताने यांच्या मार्गदर्शनाखाली रोहित यशस्वी कामगिरी करत आहे.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा सुषमा चोरडिया यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक व पालकांच्या वतीने रोहित वाघ याचे अभिनंदन करण्यात आले. तसेच त्याला राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "सूर्यदत्तमध्ये नेहमीच खेळ आणि फिटनेसला प्रोत्साहन दिले जात आहे.

## 'सोलारीस करंडक' वरिष्ठ पुरूष राष्ट्रीय टेनिस स्पर्धेचे आयोजन

### स्पर्धेत ३०० खेळाडूंचा सहभाग; एकूण सव्वा सहा लाख रूपयांची पारितोषिके

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यामध्ये सलग अकराव्या वर्षी 'सोलारीस करंडक' वरिष्ठ पुरूष राष्ट्रीय टेनिस २०२५ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून ही स्पर्धा सोलारीस लब, मयुर कॉलनी येथे दि. १७ ते २३ जानेवारी २०२५ या कालावधीत होणार आहे. आपापल्या काळातील राष्ट्रीय विजेते आणि देशातील विविध राज्यांमध्ये प्रशिक्षक असणारे दिग्गज् वरिष्ठ खेळाडू स्पर्धेमध्ये सहभागी झाले आहेत.

तब्बल सव्वा-सहा लाख रूपये पारितोषिक रक्कम असलेल्या या स्पर्धेचे आयोजन सोलारीस लब आणि ग्लोबल वरिष्ठ टेनिस संघटना (जीएसटीए) आणि रविंद्र पांड्ये टेनिस ॲकॅडमी (आरपीटीए) यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. स्पर्धेत सुमारे ३०० खेळाडू सहभागी होणार आहे.

स्पर्धेबाबत अधिक माहिती सांगताना सोलारीचे संचालक जयंत पवार म्हणाले की, सलग दहाव्या वर्षी ही स्पर्धा पुण्यात आयोजित करण्यात येत असून पुण्यामध्ये सोलारीस क्लबला या स्पर्धेचा आयोजनाचा मान सलग अकराव्यांदा मिळाला आहे.

ही स्पर्धा ३५ वर्षावरील, ४५ वर्षावरील, ५५ वर्षावरील, ६५ वर्षावरील आणि ७० वर्षावरील अशा पाच गटात होणार आहे. ही स्पर्धा एकेरी आणि दुहेरीमध्ये होणार आहे. जीएसटीए या संघटनेच्या मान्यतेखाली स्पर्धेचे आयोजन होत आहे.

स्पर्धेमध्ये सुमारे ३०० खेळाडू सहभागी झाले असून याही वर्षी या स्पर्धेतील सामने चुरशीचे होतील, असा विश्वास हृषीकेश भानुशाली यांनी व्यक्त केला. स्पर्धेत महाराष्ट्रासह विशाखापट्टणम, तामिळनाडू, राजस्थान, गुजरात, आंध्रप्रदेश, कर्नाटक, ओरिसा, दिल्ली, मध्यप्रदेश व गोवा या राज्यातील खेळाडू सहभागी होणार आहेत. येणार आहे.

माजी आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय अव्वल मानांकित पुरूष गटातील मानांकित खेळाडू व पुण्यातील नितीन किर्तने, तसेच प्रशिक्षक रविंद्र पांड्ये, केतन धुमाळ, मंदार वाकणकर, अजय कामत, अभिषेक ताम्हाणे, संदीप किर्तने, जयंत कढे, नीलकंठ डाबरे तसेच नाशिकचे श्रीकांत पारेख, गुजरातच्या अजय लखोटीया आणि मुंबईच्या किशोर सबनानी, नीरज आनंद, भुषण अकूट असे मानांकित खेळाडू स्पर्धेत झुंझणार आहेत.

## मुलांसाठी क्रिकेट निवड चाचणीचे आयोजन खेळाडूंना मोफत प्रशिक्षण देण्यात येणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या वतीने राज्यभरातील खेळाडूंसाठी पीवायसी क्रिकेट अकादमीची येत्या 10 व 11 जानेवारी 2025 रोजी 14 वर्षाखालील मुलांसाठी क्रिकेटची निवड चाचणी घेण्यात येणार आहे.

याविषयी पीवायसी हिंदू जिमखाना क्लबचे अध्यक्ष कुमार ताम्हाणे आणि सह सचिव सारंग लागू, दोशी इंजिनियर्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित दोशी यांनी सांगितले की, पुण्यातील नामांकित क्लबपैकी एक असलेल्या पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या वतीने राज्यभरातील गुणवान व उदयोन्मुख खेळाडूंसाठी क्रिकेटची निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. या निवड चाचणीतून निवड झालेल्या खेळाडूंना माजी रणजीपटू निरंजन गोडबोले, इंद्रजीत कामतेकर, पराग शहाणे व चारुदत्त कुलकर्णी या अनुभवी प्रशिक्षकांतर्फे वर्षभर मोफत प्रशिक्षण दिले जाणार असून पुण्यात होणाऱ्या विविध स्पर्धातही त्यांना सहभागी होता येणार आहे. विशेष म्हणजे या निवड झालेल्या खेळाडूंना प्रशिक्षक, फिजिओ, आहारतज्ञ यांचेदेखील प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

तसेच, 1 सप्टेंबर 2011 तारखेनंतर जन्मलेल्या खेळाडूंना या निवड चाचणीत सहभागी होता येणार आहे. याशिवाय फक्त 14 वर्षाखालील खेळाडूंना या निवड चाचणीत सहभागी होता येणार आहे. या निवड चाचणी संदर्भात खेळाडूंनी 10 व 11 तारखेला सकाळी साडेआठ वाजता पीवायसीच्या मैदानावर इंद्रजीत कामतेकर यांच्याशी संपर्क साधावा.

तसेच, या निवड चाचणीत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या खेळाडूंना नावनोंदणी करणे बंधनकारक असून नावनोंदणी व अधिक माहितीसाठी श्री इंद्रजीत कामतेकर, मोबाईल क्रमांक 9309275864 या क्रमांकावर अथवा www.pycgymkhana.com या संकेत स्थळावर भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### पीवायसी एचटीबीए-अमनोरा कप जिल्हा सुपर-५०० मानांकन बॅडमिंटन

## चैतन्य खरात, अस्मिता शेडगे यांना अग्रमानांकन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** चैतन्य खरात, अस्मिता शेडगे यांना योनेक्स सनराईज पीवायसी एचटीबीए-अमनोरा कप जिल्हा सुपर-५०० मानांकन बॅडमिंटन स्पर्धेत अनुक्रमे पुरुष आणि महिला एकेरीत अग्र मानांकन मिळाले आहे.

मानांकन यादी - पुरुष एकेरी - १. चैतन्य खरात २. वसीम शेख ३. जयंत कुलकर्णी ४. अथर्व खिस्ती ५. सुजल लखारी ६. ओंकार लिंगेगौडा ७. अथर्व चव्हाण ८. आदित्य ओक ९. निनाद कुलकर्णी १०. सिद्धेश पालवे.

महिला एकेरी - १. अस्मिता शेडगे २. श्रुती कुलकर्णी ३. गायत्री केंजळे ४. पायल पाटील.

पुरुष दुहेरी - १. अक्षय सासे - रोहन जाधव २. नरेंद्र पाटील - वरद गजभिये ३. देबाद्युती डे - शशी सावळे

महिला दुहेरी - १. अस्मित शेडगे - योगिता साळवे २. आरती चौगले - सानिया तापकीर

मिश्र दुहेरी - १. नरेंद्र पाटील - सानिया तापकीर २. राजू ओव्हळ - मृदुला कांबळे ३. हकिमोद्दीन अन्सारी - योगिता साळवे.



११ वर्षांखालील मुले - १. अर्चित खांदेशे २. वेदांत मोरे ३. कृष्णा सावंत ४. अर्हम अचलिया ५. कबीर देसाई ६. श्रीयळ सोनावणे ७. कबीर कुलकर्णी ८. आगम अचलिया ९. अर्णव गद्रे १०. आर्यंश लोंढे

११ वर्षांखालील मुली - १. अग्रिमा राणा २. निधी गायकवाड ३. केयारा साखरे ४. राजलक्ष्मी थेऊरकर

१३ वर्षांखालील मुले - १. जतिन सराफ २. खुशी दीक्षित ३. दिविक गर्ग ४. वेदांत मोरे ५. आनंद खरचे ६. रितेष सावरला ७. प्रथमेश जगदाळे ८. पार्थ शिंदे ९. ईशान ठकार १०. अभिनव भोंडवे

१३ वर्षांखालील मुली - १. कायरा रैना २. गार्गी कामठेकर ३. ध्रुवी कुंबेफाळकर ४. शौर्यतेजा पवार ५. निधी गायकवाड ६. अग्रिमा राणा ७. अवनी हार्डे

१५ वर्षांखालील मुले - १. माधव कामत २. चिन्मय फणसे ३. समीहन देशपांडे ४. सिबटेनरझा सोमजी ५. विहान कोल्हाडे.

१५ वर्षांखालील मुली - १. शरयू रांजणे २. सोयरा शेलार ३. शर्वरी सुरवसे ४. ख्याती कत्रे ५. सान्वी पाटील.

१७ वर्षांखालील मुले - १. देवांश सकपाळ २. तनिष्क डे ३. ओजस जोशी ४. विहान मूर्ती ५. श्रेयस मासळेकर

१७ वर्षांखालील मुली - १. शरयू रांजणे २. मनीषाकुमार ३. सफा शेख ४. एस. डाखणे ५. नाव्या रांका

१९ वर्षांखालील मुले - १. सुदीप खोराटे २. कोनार्क इंचेकर ३. कृष्णा जसूजा ४. ओजस जोशी ५. निक्षेप कात्रे

१९ वर्षांखालील मुली - १. युतिका चव्हाण २. जिया उत्तेकर ३. यशस्वी काळे ४. सफा शेख